20-03-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A.1

SGB/ AKN/ ST/ 11:00

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

**पृ.शी./मु.शी.:** तोंडी उत्तरे

**मुंबई शहरातील हजारो इमारतीमध्ये असणाऱ्या उद्वाहनांची तांत्रिक तपासणी करणाऱ्या निरीक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(१) * ३२८४ श्री.अनंत गाडगीळ, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत हजारो उंच इमारती आहेत, ज्यावर उद्वाहन (लिफ्ट) बसविली गेली आहे, गेल्या काही महिन्यात लिफ्ट अडकल्याच्या अनेक घटना निदर्शनास आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उद्वाहनांचे तांत्रिक विश्वासर्हता तपासण्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाचे असते, हे काम तपासणाऱ्या निरीक्षकांची संख्या अत्यंत कमी असल्याने उद्वाहनाची (लिफ्टची) वेळेत तपासणी होवू शकत नसल्याने मुंबईतील इमारतींच्या उद्वाहनाबाबत अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उद्वाहनांची तांत्रिक विश्वासर्हता तपासण्याचे काम करणा-या निरीक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत व अशा घटना घडू नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, त्याचा तपशील काय आहे,
(५) सदर तपशील उपलब्ध नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.प्रवीण पोटे-पाटील, श्री. चंद्रकांत पाटील यांच्याकरिता :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) निरीक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही चालू आहे. तसेच लिफ्ट अडकण्यासारख्या घटना घडू नयेत यासाठी मुंबई व पुणे येथील उद्वाहन कंपन्या व उद्वाहन ठेकेदार यांना उद्वाहनात अतिरिक्त भारयंत्रणा आणि स्वयंचलित आपत्कालीन सहाय्य यंत्रणेचा वापर बंधनकारक करण्यात आला आहे, अशा आशयाचे परिपत्रक निर्गमित करण्यात आले आहे.

श्री.अनंत गाडगीळ : सभापती महोदय, मुंबई-पुण्यासारख्या शहरामध्ये आता 30 ते 40पेक्षा अधिक मजल्याच्या इमारती उभ्या रहात आहेत. अशा इमारतींमध्ये उद्वाहन बसविले जाते त्यापासून होणाऱ्या अपघातामध्ये मागील दोन वर्षात सुमारे 20 लोक मृत्युमुखी पडले आहेत अशी माझी माहिती आहे. महाराष्ट्राचे दोन माजी मुख्यमंत्री स्व.विलासराव देशमुख व श्री.पृथ्वीराज

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

चव्हाण उद्वाहनाच्या अपघातातून वाचले आहेत. उद्वाहनाची एक भिंत किंवा दरवाजा काचेचा असावा,जेणेकरुन आग लागली, भूकंपाचा धक्का बसला तर आतील व्यक्तींना दिलासा मिळू शकतो.

...2...



ता.प्र.क्र.3284....

श्री.अनंत गाडगीळ......

मंत्रालयाच्या इमारतीमध्ये आग लागल्यानंतर काय परिस्थिती ओढवली होती हे आपण सर्वांनी अनुभवले आहे. एखादे उद्वाहन इमारतीच्या बाहेरील बाजूस असावे, या दृष्टीने फायर विभाग परवानगी देत नाही. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या इंजिनिअर्सची याला सहमती आहे असे मला कळले.

सभापती महोदय, आजच्या टाईम्स ऑफ इंडिया या दैनिकामध्ये एक बातमी प्रसिध्द झाली आहे. बंद लिफ्टमध्ये सोसायटीतील महिलांवर शारिरीक छेडछाड करण्याचे प्रकार वाढीस लागले आहेत. इमर्जन्सी एक्झीक्यूशन आणि महिलांची सुरक्षितता या दृष्टीने उद्वाहनाची एक बाजू काचेची असली पाहिजे. उद्वाहन निरीक्षकांची संख्या कमी आहे. उद्वाहन पाच ते सहा वर्षानंतर बंद पडते. नवीन उद्वाहन बसवायचे झाल्यास 30 ते 35 लाख रुपये खर्च येतो, तो खर्च सर्वसामान्यांना परवडत नाही. उद्वाहनाची एक तरी बाजू काचेची असण्याकरिता शासन परवानगी देणार आह काय? ज्याप्रमाणे ऑटो क्षेत्रामध्ये मोटार वाहनांना 10 वर्षे पुरतील असे स्पेअर पार्ट तयार करण्याबाबतचा नियम लागू केला आहे तसा नियम उद्वाहन तयार करणाऱ्या कंपन्यांना लागू केला जाईल काय?

श्री.प्रवीण पोटे-पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी जो मुद्दा मांडला तो अतिशय महत्वाचा असल्यामुळे सविस्तर खुलासा होणे गरजेचे आहे. वर्षातून एकदा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सहाय्यक अभियंत्यांनी उद्वाहनाची तपासणी करावी हा एक नियम आहे. दिनांक 2 जानेवारी, 2013 पासून ऑटो सेफ्टीगार्ड डिव्हाईस लावल्याशिवाय सार्वजनिक बांधकाम विभाग उद्वाहनास परवानगी देत नाही. उद्वाहन कुठेही नादुरूस्त झाले तर थांबते. लिफ्ट बंद पडून अपघात होतो, या संदर्भात मी सभागृहाला सांगू इच्छितो की, ज्यावेळी लिफ्टला अपघात होईल, इलेक्ट्रिक व्यवस्थेमध्ये अडचण आली किंवा केबल खराब झाली तर ती लिफ्ट मध्येच थांबू शकते. त्यामध्ये अपघाताचा विषय येत नाही. एक तरी काचेची बाजू असावी हा जो मुद्दा आहे त्याबाबत

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सांगू इच्छितो की, काचेचे दार लावल्यास व्हायब्रेशन होत असल्यामुळे अडचण येण्याची शक्यता आहे. आमचे मॉनिटरिंग हे लिफ्ट व्यवस्थित चालते की नाही याबाबत असते.

...3...



ता.प्र.क्र.3284....

श्री.प्रवीण पोटे-पाटील.....

सभापती महोदय, नॉर्म्सप्रमाणे उद्‌वाहनाला काचेची बाजू लावण्यासाठी एनओसी देण्याचा विषय फायर विभागाकडे आहे. यासाठी शासनाची तयारी आहे. अपधात व्हावा अशी सार्वजनिक बांधकाम विभागाची इच्छा नाही. अपघात होऊ नये या दृष्टीने विभागाकडून प्रयत्न केले जात आहेत. निरीक्षकांची पदे कमी आहेत. मुंबई, ठाणे आणि पुणे शहरामध्ये 12 निरीक्षकांची पदे कमी आहेत. उर्वरित महाराष्ट्राचा विचार केला तर 6 पदांची कमतरता आहे. ही रिक्त पदे तातडीने भरण्याचा प्रयत्न आहे. पदे कमी असल्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागातील व इतर विभागामधील इंजिनिअर्सना कामे वाटून दिली आहेत.

सभापती महोदय, माजी मुख्यमंत्र्यांच्या अपघाताचा विषय मांडला आहे. दिनांक 30.8.2012 रोजी तत्कालीन उद्योग मंत्री श्री.नारायण राणे लिफ्टमध्ये अडकले होते. दिनांक 21.11.2014 रोजी तत्कालीन मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण लिफ्टमध्ये अडकले होते. याची चौकशी केल्यानंतर असे कळले की, लिफ्टमध्ये तीन फेज असतात, एक फेज कमी झाल्यामुळे लिफ्ट थांबली. मी दिलेले उत्तर माननीय सदस्यांना पटले असावे अशी अपेक्षा व्यक्त करतो.

श्री.अनंत गाडगीळ : सभापती महोदय, मॉल आणि हॉटेल्सच्या इमारतींमध्ये काचेचा दरवाजा असलेल्या लिफ्ट बसविण्यास परवानगी दिली जाते. मात्र मुंबई व पुण्यातील रहिवासी इमारतींमध्ये परवानगी दिली जात नाही. आम्ही उंच इमारतीचे डिझाईन तयार करतो त्यावेळी आम्हाला खूप त्रास होतो. पब्लिक प्लेसमध्ये परवानगी देण्याची आवश्यकता आहे. निवासी सोसायट्यामधील लिफ्टमध्ये महिलांच्या छेडछाडीचे प्रकार सुरु झालेले आहेत. त्यासाठी काचेचा दरवाजा असलेली लिफ्ट बसविण्यास अनुमती दिली पाहिजे.

**उप सभापती** : महिलांच्या सुरक्षिततेचा मुद्दा अगदी रास्त आहे. निवासी इमारतींमध्ये लिफ्टला काचेचा दरवाजा असणे ही बाब मलाही मान्य आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रवीण पोटे-पाटील : सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनेचा विचार करु.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी जो प्रश्न मांडला त्याची गंभीरता लक्षात घेऊन आणि आपण निर्देश दिल्यानंतर शासनाने गंभीरपणे उत्तर देणे क्रमप्राप्त आहे. शासन जर याबाबत गंभीर नसेल तर दुर्दैव आहे. या प्रश्नाला न्याय मिळाला पाहिजे.

...4...



ता.प्र.क्र.3284....

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विद्युत शाखेमार्फत वर्षातून एकदा लिफ्ट ॲक्ट अंतर्गत सक्तीने तपासणी केली जाते. यावर्षी 35683 उद्‌वाहनांची तपासणी व्हावयास पाहिजे होती. फेब्रुवारी, 2015 अखेर 32493 उद्‌वाहनांची तपासणी केली आहे. प्रामुख्याने मुंबईमध्ये उद्‌वाहनांची संख्या अधिक आहे. उद्‌वाहन निरीक्षकांची 31 पदे मंजूर असून त्यापैकी 12 पदे रिक्त आहेत. अन्य विभागातील मनुष्यबळाच्या आधारे इन्स्पेक्शन बरोबरच चालले आहे. दर तीन महिन्यांनी किती उद्‌वाहनांची तपासणी केली याचा चार्ट वेबसाईटवर लोड केला जातो. आपण तो चार्ट बघू शकता. इन्स्पेक्शन करण्यामध्ये अडचण नाही. मुद्दा हा आहे की, विद्युत पुरवठा बंद झाला तर लिफ्ट अडकते. त्याकरिता 2012 नंतरच्या लिफ्टबाबत दोन गोष्टींची सक्ती करण्यात आली आहे. लिफ्टचा विद्युत पुरवठा बंद झाला तर लिफ्ट नजीकच्या मजल्यापर्यंत गेली पाहिजे इतका बॅटरी बॅकअप असावा. एक जरी माणूस अधिकचा आत आला तर बीप देण्याची व्यवस्था असावी. लिफ्टला काचेचे दरवाजे आणि लिफ्टमध्ये सीसीटीव्ही कॅमेरा लावावा अशी सक्ती करता येईल का........

श्री.अनिल तटकरे : सभापती महोदय, काचेचे दरवाजे बसवावेत अशी माननीय सदस्यांनी मागणी केलेली नाही. लिफ्टची एक बाजू काचेची असावी असा मुद्दा आहे.

नंतर बी.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3284....

श्री.चंद्रकांत पाटील : ठीक आहे. भारतीय मानक संस्था (BIS) यांनी यामध्ये निर्णय घ्यावयाचे असतात. त्यांच्या विचारात ही सूचना असून ते लवकरात लवकर निर्णय घेणार आहेत. लिफ्ट मध्येच बंद पडल्यानंतर तेवढा बॅटरी बॅक-अप असणे आवश्यक आहे आणि लिफ्टमध्ये एक जरी माणूस जास्त झाला तर तर बीप वाजला पाहिजे या उपाययोजना आपण सन 2012 पासून करण्यास सांगितलेले आहे. काचेचे दरवाजे लिफ्टला पुरवणार नाही. त्याऐवजी नजीकच्या काळात लिफ्टमध्ये सीसीटीव्ही लावणे अनिवार्य करण्यात येईल.

.....

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**नॉन क्रिमीलेअरची उत्पन्न मर्यादा ४.५० लाख रुपयाऐवजी ६.०० लाख करणेबाबत**

**(२) * २८३५ डॉ.अपूर्व हिरे, डॉ.सुधीर तांबे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यददःद तारांकित प्रश्न क्रमांक ११७३ ला दिनांक ११ डिसेंबर, २०१४ रोजी ी दिलेल्या उत्तरासंदर्भात -:** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मॅट्रीकोत्तर शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजनेअंतर्गत सन २०१३-१४ मध्ये इतर मागासवर्गीय, विमुक्त जाती, भटक्या जाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या पालकांची उत्पन्नाची मर्यादा रुपये ४.५० लाखावरुन रु.६.०० लाख करण्याचा प्रस्ताव मंत्री मंडळाच्या विचारार्थ सादर झाला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१२-१३ ची प्रतिपूर्ती योजना आहे त्याच स्वरुपात सन २०१३-१४ मध्ये चालु ठेवण्याचा निर्णय झाला व त्यानुसार दिनांक ४ मार्च, २०१४ च्या शासन निर्णयानुसार सन २०१३-१४ मध्ये शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजनेकरीता उत्पन्न मर्यादा रु. ४.५० लाख इतकीच ठेवण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रु. ४.५० लाखांवरुन रु. ६.०० लाख एवढी उत्पन्नाची मर्यादा करण्यासंबंधी मा.मंत्री, सामाजिक न्याय यांनी दिनांक १२ डिसेंबर, २०१३ रोजी विधिमंडळ सभागृहात दिलेल्या आश्वासनासंदर्भात पुढे कोणता निर्णय घेण्यात येत आहे वा येणार आहे,
(४) नसल्यास, सार्वत्रिक मागणी विचारात घेता उत्पन्नाची मर्यादा रु.६.०० लाख करण्यासाठी शासनाचे धोरण काय आहे ?

**श्री.दिलीप कांबळे,श्री. राजकुमार बडोले यांच्याकरिता :** (१), (२), (३) व (४) मा.मंत्री, सामाजिक न्याय यांनी इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या पालकांची उत्पन्न मर्यादा रुपये ४.५० लाखावरुन रुपये ६.०० लाख करण्याबाबत दिनांक १२ डिसेंबर, २०१३ रोजी विधिमंडळ सभागृहात आश्वासन दिले होते. त्यानुषंगाने राज्यातील मॅट्रीकोत्तर शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांच्या पालकांची उत्पन्न मर्यादा रुपये ४.५० लाखावरुन रुपये ६.०० लाख करण्याचा प्रस्ताव उच्च व तंत्रशिक्षण विभागामार्फत मंत्री मंडळाच्या विचारार्थ सादर झाला होता. तथापि, सन २०१२-२०१३ ची प्रतिपूर्ती योजना आहे त्याच स्वरुपात सन २०१३-२०१४ मध्ये चालू ठेवण्याचा निर्णय झाला. त्यानुसार दिनांक ४ मार्च, २०१४ च्या शासन निर्णयान्वये सन २०१३-१४ मध्ये शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजनेकरिता उत्पन्न मर्यादा रुपये ४.५० लाख इतकीच ठेवण्यात आली आहे.

..३

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2835...

डॉ.अपूर्व हिरे : सभापती महोदय, नॉन क्रीमिलेअरची मर्यादा रुपये 4.50 लाखावरुन रुपये 6.00 लाख करावी असा प्रश्न विधिमंडळामध्ये अनेकदा उपस्थित करण्यात आला होता. नागपूर 2014 च्या अधिवेशनात देखील सदर मर्यादा ही रुपये 6.00 लाख इतकी केली जाईल अशा प्रकारचे आश्वासन देण्यात आले होते असे लेखी उत्तरामध्ये देखील नमूद करण्यात आले आहे. तथापि,सदर मर्यादा रुपये 6.00 लाख करण्याचा प्रस्ताव उच्च व तंत्रशिक्षण विभागामार्फत मंत्री मंडळाच्या विचारार्थ सादर केला असता त्यांनी तो प्रस्ताव नाकारला आहे. या विषयासंबंधी सभागृहात आश्वासन देण्यात आले होते. त्यानंतर विभागाने तो प्रस्ताव नाकारणे हे योग्य नाही. तेव्हा या प्रस्तावाचा आपण पुन्हा विचार करुन नॉन क्रीमिलेअरची मर्यादा रुपये 6.00 लाखा पर्यंत करण्याचा निर्णय घेणार आहात काय ?

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, राज्यातील विद्यार्थ्यांच्या दृष्टीने हा अतिशय महत्त्वाचा प्रश्न आहे. आता मार्च महिना सुरु आहे. त्यामुळे येत्या जून पासून म्हणजे नव्या शैक्षणिक वर्षापासून सदर मर्यादा वाढविण्यासंबंधी शासन गांभीर्याने विचार करीत आहे. येत्या जून पर्यंत आम्ही यासंबंधात निर्णय घेणार आहोत.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, विद्यार्थ्यांना सवलत देण्यासंबंधातील हा विषय आहे. यात दोन प्रकार करण्यात आले आहेत. प्रवेशासाठी रुपये 6.00 लाखा पर्यंतची मर्यादा केली आहे, तर प्रतिपूर्तीसाठी रुपये 4.50 लाखा पर्यंत मर्यादा केलेली आहे. शासनाने प्रवेशासाठी रुपये 6.00 लाखा पर्यंतची मर्यादा केली आहे. तेवढीच मर्यादा प्रतिपूर्तीसाठी करावी. चर्चे अंती आपण प्रतिपूर्तीसाठीची मर्यादा रुपये 6.00 लाख करण्याचे मान्य केले होते. आजही शासनाने उत्तर दिले आहे की, सदर बाब विचाराधीन असून जून महिन्यापर्यंत निर्णय घेऊ. केंद्र शासनाप्रमाणे राज्यामध्ये प्रवेशासाठी रुपये 6.00 लाख मर्यादा आहे. केंद्र शासनामध्ये प्रतिपूर्तीसाठी रुपये 6.00 लाख मर्यादा असताना आपल्या राज्यात सुद्धा प्रतिपूर्तीसाठी रुपये 4.50 लाखा ऐवजी रुपये 6.00 लाख मर्यादा करण्यात येणार आहे काय यासंबंधात आम्हाला माननीय मंत्र्यांकडून स्पष्ट आश्वासन हवे आहे.

...4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2835...

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी येथे जी भावना व्यक्त केली आहे ती महत्त्वाची आहे. मी सुरूवातीलाच म्हटले आहे की, हा प्रश्न राज्यातील अनेक विद्यार्थ्यांच्या शिक्षणाशी संबंधित आहे. प्रवेश आणि प्रतिपूर्तीमधील जी तफावत आहे ती येणाऱ्या जून महिन्यापासून समप्रमाणात आणली जाईल. रूपये 6.00 लाखा पर्यंतची मर्यादा जून पासून लागू करण्यात येईल.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, मी माननीय मंत्र्यांचे मनापासून अभिनंदन करतो. सन्माननीय सदस्य श्री.अपूर्व हिरे यांनी सांगितल्याप्रमाणे मागच्या हिवाळी अधिवेशनामध्ये या प्रश्नावर चर्चा झाली होती आणि त्यास उत्तरही दिले होते. विभागाला त्यांचे काम करू द्यावे. सरकार हे सुप्रीम आहे. सरकारने विभागाचे म्हणणे ओव्हर रूल्ड करायला पाहिजे होते. त्यासाठी पुन्हा प्रश्न विचारण्याची वेळ येता कामा नव्हती. तरी सुद्धा आम्ही आपल्या भूमिकेचे स्वागत करीत आहोत. जे लाखो विद्यार्थी वंचित राहात होते त्यांना आता फायदा होणार आहे. ही मर्यादा रूपये 6.00 लाखा पर्यंत करीत असल्यामुळे मी शासनाचे अभिनंदन करतो.

श्री.हरिसिंग राठोड : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी जून पासून निर्णय लागू होईल असे सांगितले आहे. या शैक्षणिक वर्षामध्ये लाखो विद्यार्थ्यांना परीक्षेला बसविण्यात आलेले नाही. त्यांची शाळेकडून अडवणूक करण्यात आली आहे. यात भटक्या विमुक्त जमातीचे विद्यार्थी देखील भरडले गेले आहेत. हा फार गंभीर विषय आहे. मागासवर्गीय विद्यार्थ्यांसह भटक्या विमुक्त जमातीच्या विद्यार्थ्यांवर देखील आघात झालेला आहे. विद्यमान शैक्षणिक वर्षामध्ये आपण रूपये 6.00 लाख मर्यादेची सवलत लागू केली पाहिजे होती. यासंबंधी माननीय सभापती महोदयांनी शासनाला सदर मर्यादा चालू शैक्षणिक वर्षापासून लागू करण्यासंबंधीचे निदेश द्यावेत.

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, आता मार्च महिना सुरू आहे. त्यामुळे येत्या शैक्षणिक वर्षापासून सदर मर्यादा लागू करण्यात येईल असे मी सुरूवातीला सांगितले आहे. मी आपल्या मार्फत सन्माननीय सदनाला सांगू इच्छितो की, राज्यातील कोणत्याही विद्यार्थ्याला कोणतीही शैक्षणिक संस्था परीक्षेला बसू देत नसेल आणि सक्तीने फी वसूल करीत असेल तर



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2835...

श्री.दिलीप कांबळे...

असे कोणालाही करू देणार नाही. तसेच कुठलाही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही याची काळजी सरकार घेईल.

श्री.महादेव जानकर : सभापती महोदय, मी सर्वप्रथम माननीय मंत्र्यांचे अभिनंदन करतो. एस.सी., एस.टी.ला क्रीमिलेअरची अट लागू नाही. त्याप्रमाणे ओबीसीला क्रीमिलेअरची अट लागू करू नये. विद्यमान आयएएस, आयपीएस अधिकाऱ्याच्या मुलाला आयएएस किंवा आयपीएस व्हायचे असेल तर त्याला या संधीचा फायदा मिळत नाही. त्यामुळे आपण ओबीसी आणि एन.टी.वर अन्याय का करीत आहात ? विधिमंडळ हे कायदेमंडळ आहे. त्याबाबत आपण कार्यवाही का करीत नाही ? एस.सी., एस.टी.साठी क्रीमिलेअरची अट नाही. त्याप्रमाणे ओबीसी, एन.टी.साठीची अट काढण्याचा प्रयत्न शासनातर्फे करण्यात येईल काय ?

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.महादेव जानकर यांनी जी सूचना केली आहे त्याचा शासन नक्की विचार करेल.

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, मागच्या अधिवेशनात मी प्रश्न विचारला होता. त्यावेळी चालूच आर्थिक वर्षामध्ये रुपये 6.00 लाखाची मर्यादा लागू करण्यात येईल अशा प्रकारचे उत्तर दिले होते. आता त्यांनी सांगितले आहे की, जून महिन्यापासून सदर मर्यादा लागू करण्यात येईल. माननीय मंत्र्यांनी हिवाळी अधिवेशनामध्ये दिलेले उत्तर आठवत असेल. मागच्या उत्तरा सारखेच आताचे उत्तर आहे काय ? सदर मर्यादा वाढविण्याची मागणी आम्ही अनेक वर्षापासून करीत आहोत. तेव्हा शासन 1 जून पासून ठामपणाने सदर मर्यादा वाढविणार आहे काय, असा माझा प्रश्न आहे.

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, हिवाळी अधिवेशनामध्ये मी उत्तर दिले होते हे खरे आहे. परंतु, त्याचा निर्णय झाला नाही. मी पुन्हा एकदा आपल्या मार्फत सदनाला सांगू इच्छितो की, येत्या जून पासून सदर मर्यादा वाढविण्यात येईल.

..6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2835...

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी हिवाळी अधिवेशनामध्ये उत्तर दिले होते हे कबूल केले आहे. त्यावेळी त्यांनी क्रीमिलेअरची मर्यादा रूपये 4.50 लाखावरून रूपये 6.00 लाखा पर्यंत करण्याचे कबूल केले होते. त्यावेळी सभागृहात उत्तर देऊन त्याची अंमलबजावणी न झाल्यामुळे आमच्या मनात संशय निर्माण झाला आहे. आता 1 जून पासून सदर मर्यादा वाढविण्यात येईल अशा प्रकारचे उत्तर देण्यात आले आहे. पण त्याची अंमलबजावणी होईल याला आधार काय आहे ? यासंबंधी तत्कालीन माननीय मंत्र्यांनी निर्णय घेतला होता. त्याची देखील अंमलबजावणी झाली नाही. हिवाळी अधिवेशनात शासनाने उत्तर दिले होते. त्याची देखील अंमलबजावणी झाली नाही. आज आपण 1 जून पासून मर्यादा लागू करण्यात येईल असे सांगत आहात. त्यामुळे आज इतर मागासवर्गीय, भटक्या विमुक्त जाती-जमातीच्या समाजामध्ये शासन सदर मर्यादा वाढून देणार आहे किंवा नाही यासंबंधी संशय निर्माण झाला आहे. तेव्हा यासंबंधात शासनाचे खात्रीशीर उत्तर काय आहे ?

यानंतर श्री.जुन्नरे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2835........

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जो मुद्दा उपस्थित केला तो बरोबर आहे. मी आपल्या मार्फत सदनाला खात्री देऊ इच्छितो की, येत्या शैक्षणिक वर्षापासून प्रतिपूर्तीची 4.5 लाख रुपये व उत्पन्नाची मर्यादा 6 लाख रुपये या दोन्ही मर्यादा समान पातळीवर आणल्या जातील. हा निर्णय येत्या शैक्षणिक वर्षापासून लागू केला जाईल एवढेच मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

-------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**महाविद्यालयीन मागासवर्गीय विद्यार्थ्यांची थकीत शिष्यवृती मिळणेबाबत**

**(3)** * **३५२२ अॅड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील महाविद्यालयांमध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांची गेल्या ३ वर्षांपासून थकीत असलेली शिष्यवृत्ती देण्यासाठी २५० कोटी रुपयांची तरतूद केल्याची घोषणा मा.शालेय शिक्षणमंत्री महोदयांनी दिनांक २२ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारासस केली आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदर आर्थिक तरतुदीनुसार किती रक्कमेचे व केव्हा वाटप करण्यात आले आहे,
(3) त्याचप्रमाणे राज्यातील किती महाविद्यालये व किती विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले,
(4) अद्याप रक्कमेचे वाटप केले नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप कांबळे, श्री. राजकुमार बडोले यांच्याकरिता:** (१), (2) व (३) विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागारवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती, शिक्षण फी/परीक्षा फी च्या प्रदानासाठी रुपये २३०.५५ कोटीची पुरवणी मागणी माहे डिसेंबर, २०१४ च्या हिवाळी अधिवेशनात मंजूर करण्यात आलेली आहे. सदर तरतूदीपैकी रुपये २२०.०० कोटीची तरतूद संचालक, विजाभज संचालनालय, पुणे यांना उपलब्ध करण्यात आलेली असून ती वितरीत करण्याची पुढील कार्यवाही सुरु आहे.
(4) प्रश्न उद्‌भवत नाही.

अॅड.निरंजन डावखरे : सभापती महोदय, तारांकित प्रश्नाला दिलेल्या उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, "सदर तरतुदीपैकी रुपये 220 कोटी रुपयांची तरतूद संचालक, विजाभज संचालनालय, पुणे यांना उपलब्ध करण्यात आलेली असून ती वितरित करण्याची पुढील कार्यवाही सुरु आहे." परंतु ही तरतूद अद्याप खालपर्यंत पोहचलेली नाही. या तरतुदीचा लाभ संस्थांना तसेच विद्यार्थ्यांना अजूनही मिळालेला नाही. ज्यावेळी शिष्यवृत्तीचा प्रश्न निर्माण होतो, त्यावेळी संबंधित संस्थेला जबाबदार धरुन त्या संस्थेवर कारवाई केली जाईल, असे म्हटले जाते. त्याच बरोबर शासन म्हणून आपली जी जबाबदारी असते ती आपण सरळ सरळ त्या संस्थेवर ढकलतो. शिष्यवृत्तीचा पैसा हा विद्यार्थ्यांचा हक्काचा पैसा असतो व तो पैसा विद्यार्थ्यांना मिळालाच पाहिजे. त्यामुळे शिष्यवृत्तीचे पैसे विद्यार्थ्यांना कधी मिळणार आहेत ? शिष्यवृत्तीचे पैसे विद्यार्थ्यांना या महिन्यात मिळणार आहेत काय ? ऑनलाईन प्रक्रियेमध्ये मागासवर्गीय, भटके-विमुक्त तसेच विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे अनेक ठिकाणी अर्ज स्वीकारले जात नाहीत. त्यामुळे या विद्यार्थ्यांचे अर्ज स्वीकारण्याच्या बाबतीत शासन कोणती कार्यवाही करणार आहे ?



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3522........

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, राज्यातील सर्व विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे पैसे मिळावेत म्हणून शासनाने तरतूद केलेली आहे. असे असतानाही अद्याप काही विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे पैसे मिळले नसतील तर संस्थांना सूचना देऊन शिष्यवृत्तीचे पेसे दिले जातील. विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांची गेल्या 2-3 वर्षाची जी शिष्यवृत्तीची थकबाकी राहिलेली होती ती मिळण्याकरिता शासनाने तरतूद केलेली आहे. ज्या विद्यार्थ्यांचे ऑनलाईन फॉर्म संस्थेकडून विभागाकडे आले नाहीत त्यासंदर्भात मॅन्युअली अर्ज स्वीकारावेत, अशा सूचना दिलेल्या आहेत. आजच पुढील पाच दिवसापर्यंत मॅन्युअली अर्ज स्वीकारण्याची मुदतवाढ देण्यात आलेली आहे, एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्री.अनिल तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी या संदर्भात जो प्रश्न विचारला होता त्या प्रश्नाचे उत्तर मिळालेले नाही. यासंदर्भात माझी जी माहिती आहे त्यानुसार शिष्यवृतीचे पैसे संस्थांना वर्ग झाले असतील. परंतु या संदर्भात माझा प्रश्न असा आहे की, सामाजिक न्याय विभागाकडे अधिकारी व कर्मचाऱ्यांचा मोठया प्रमाणात तुटवडा आहे. रायगडच्या समाजकल्याण अधिकाऱ्याचा कार्यभार सध्या अकाऊन्टंटकडे देण्यात आलेला आहे. अधिकाऱ्यांच्या कमतरतेमुळेच शिष्यवृत्तीचा प्रश्न निकाली निघत नाही. त्यामुळे या संदर्भात शासन नेमकी कोणती कार्यवाही करणार आहे ? तसेच शिष्यवृत्तीची कार्यवाही किती दिवसात पूर्ण केली जाणार आहे ? आता पर्यंत किती महाविद्यालयातील किती विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात आलेले आहे ?

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, शिष्यवृत्तीच्या संदर्भात अधिकारी अनियमितता करीत असेल तर अशा अधिकाऱ्यावर तातडीने कारवाई केली जाईल.

श्री.अनिल तटकरे : सभापती महोदय, जिल्ह्यात सामाजिक न्याय विभागाचा जो अधिकारी असतो तो वर्ग 1 दर्जाचा असतो. रायगड जिल्ह्यात जो समाजकल्याण अधिकारी कार्यरत आहे तो वर्ग 1 दर्जाचा आहे की, त्या पदाचा चार्ज दुसऱ्या अधिकाऱ्याकडे दिलेला आहे ?

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी वेगळा प्रश्न उपस्थित केलेला आहे. परंतु, हा प्रश्न तपासून योग्य ती कार्यवाही केली जाईल, एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3522........

श्री.अनिल तटकरे : सभापती महोदय, सामाजिक न्याय विभागाच्या समाजकल्याण अधिकाऱ्यामार्फत शिष्यवृत्तीचे वाटप होत असते. परंतु, बहुतेक ठिकाणी समाजकल्याण अधिकाऱ्याचा कार्यभार कनिष्ठ अधिकाऱ्याकडे सोपविला जातो. खरे म्हणजे सक्षम अधिकाऱ्याची वानवा असल्यामुळे शिष्यवृत्तीचे पैसे विद्यार्थ्यांपर्यंत पोहचण्यास विलंब होतो असा माझा दावा आहे.

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, रायगड जिल्हयामध्ये सक्षम अधिकारी नसेल तर त्या ठिकाणी तातडीने सक्षम अधिकारी देण्याची व्यवस्था केली जाईल.

श्री.अनिल तटकरे : सभापती महोदय, रायगड जिल्हा परिषदेतील शिक्षणाधिकाऱ्याचा चार्ज उप संचालकांकडे देण्यात आलेला होता. उप संचालक मंत्री आस्थापनेवर कार्यरत असताना ते रायगडच्या शिक्षणाधिकारी पदाचा चार्ज कसे काय सांभाळू शकतील ? रायगड येथील सामाजिक न्याय विभागाच्या समाजकल्याण अधिकाऱ्याचा कार्यभार मुंबईच्या अधिकाऱ्याकडे दिला गेल्यामुळे प्रचंड दिरंगाई व वेगवेगळ्या प्रकारे भ्रष्टाचार चालतो. त्यामुळे सक्षम अधिकारी असते तर गैरप्रकाराला आळा बसला असता आणि विद्यार्थ्यांनाही शिष्यवृत्ती वेळेवर मिळू शकली असती. शासनाच्या वतीने सर्वात जास्त बजेट सामाजिक न्याय विभागाला मिळते. आता पर्यंत कोटयवधी रुपये खर्च झाले आहेत. परंतु हे पैसे खालपर्यंत पोहचू शकले नाहीत.

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, वर्ग 2 च्या अधिकाऱ्याकडे रायगड जिल्हयाच्या समाजकल्याण अधिकाऱ्याचा चार्ज देण्यात आलेला आहे. सन्माननीय सदस्यांच्या म्हणण्यानुसार हा चार्ज खालच्या अधिकाऱ्यांकडे दिला जाणार नाही. परंतु रायगड येथे कायमस्वरुपी जिल्हा समाजकल्याण अधिकाऱ्याची नियुक्ती तातडीने केली जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्री. प्रकाश गजभिये : सभापती महोदय, या राज्यामध्ये किती मागास विद्यार्थ्यांचे अर्ज प्रलंबित आहेत ? शिष्यवृत्तीसाठी 220 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे अशी माहिती मंत्री महोदयांनी दिली आहे. त्यामुळे आजपावेतो मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचे

...5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3522........

श्री. प्रकाश गजभिये.......

किती अर्ज आले होते त्या पैकी किती विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली व किती विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती देण्याचे बाकी आहे ?

श्री. राजकुमार बडोले : सभापती महोदय, मागासवर्गीयांच्या शिष्यवृत्तीचा हा अत्यंत जिव्हाळयाचा प्रश्न आहे. सन 2014-15 मध्ये शिष्यवृत्तीचे 16,16,359 अर्ज आले होते, आतापर्यंत 6,7,460 अर्ज निकाली काढण्यात आले. ही प्रक्रिया सातत्याने सुरु असते. रोज प्रश्न निकाली काढले जात असतात. सन्माननीय सदस्यांचा प्रश्न सन 2013-2014 पर्यंतचा होता. यासंदर्भात 1,95,684 अर्ज मार्च महिन्यापर्यंत आले होते. परंतु त्यापैकी 1,53,624 प्रलंबित होते. परंतु त्यापैकी 40,060 प्रकरणे निकाली काढण्यात आली. ही सातत्याने चालणारी प्रोसेस असून आजपर्यंत जी प्रक्ररणे प्रलंबित राहिली होती ती सर्व प्रकणे 31 मार्च, 2015 पर्यंत निकाली काढली जातील.

सभापती महोदय, विभागाच्या शिष्यवृत्तीच्या संदर्भात 3,806.54 कोटी रुपयांची मागणी होती. परंतु त्यापैकी आम्हाला 3,092 कोटी रुपये प्राप्त झाले होते. आम्ही अजून 714 कोटी रुपयांची मागणी केलेली आहे. शिष्यवृत्तीची प्रोसेस सुरु आहे. महाविद्यालयाकडून सामाजिक न्याय विभागाकडे येणाऱ्या अर्जाचे काम प्रोसेसमध्ये असून यामध्ये थोडा विलंब झालेला आहे. संपूर्ण प्रकरणे निकाली काढण्याचा आमचा सातत्याने प्रयत्न असतो एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

यानंतर श्री. अजित.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3522....

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी उत्तरात सांगितले की, थोडीशी अडचण आहे. ती नेमकी कोणती अडचण आहे आणि ती दूर केव्हा करणार आहात ? शासनाकडून सांगण्यात आले की, आमच्याकडून पैसे दिलेले आहेत परंतु विद्यापीठाकडून पैसे दिले जात नाहीत. कोणत्याही कॉलेजमध्ये मग ते इंजिनिअरींग कॉलेज असेल, पॉलिटेक्नीक कॉलेज असो, कॉलेजमध्ये शिकणाऱ्या एस.सी., एस.टी., व्ही.जे.एन.टी. या प्रवर्गातील कोणत्याही विद्यार्थ्यास स्कॉलरशीपचे पैसे मिळालेले नाहीत. समाजकल्याण विभागाचे अधिकारी स्कॉलरशीपचे पैसे देण्यासाठी टक्केवारी मागत असल्याचे अनेक प्रकार पुढे आले आहेत. तेव्हा संस्थांना ऑन लाईन पद्धतीने स्कॉलरशीपचे पैसे देता येईल का यादृष्टीने शासन विचार करणार काय ?

श्री.राजकुमार बडोले : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाबाबत सांगू इच्छितो की, आपली ऑन लाईन प्रोसेस सुरु आहे. काही ठिकाणी अडचणी आहेत त्या निश्चितपणे दूर करण्यात येतील.

**उप सभापती** : या ठिकाणी माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी प्रश्न विचारताना सांगितले की, स्कॉलरशीपचे पैसे देताना समाजकल्याण अधिकाऱ्यांकडून टक्केवारी मागितली जाते. माझ्याकडे देखील बऱ्याच संस्थाचालकांनी अशी तक्रार केलेली आहे. किती टक्केवारी मागितली जाते ते देखील मी सांगू शकतो. टक्केवारीचा दर सव्वाटक्का आहे. मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीमध्ये अशाप्रकारचा अनागोंदी कारभार सुरु असेल तर ते निश्चितपणे शासनास भूषणावह नाही. मी याठिकाणी अत्यंत जबाबदारीने बोलत आहे. तेव्हा या प्रकरणाचा त्वरित तपास करुन किंवा सुरु असलेला प्रकार त्वरित थांबवून विद्यार्थ्यांच्या थकित शिष्यवृत्त्या ताबडतोब निकाली काढण्याच्या दृष्टीने त्वरित कार्यवाही करावी, हे मी आपणास स्पष्टपणे सांगतो.

श्री,राजकुमार बडोले : सभापती महोदय, सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन विभागाकडे ज्या काही तक्रारी आलेल्या आहेत त्याची निश्चितपणे चौकशी करण्यात येईल.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3522....

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी विचारलेला प्रश्न फार महत्वाचा होता. त्यास मंत्री महोदयांनी चांगले उत्तर दिलेले आहे. त्यांनी सांगितले की ही ऑन लाईन प्रोसेस आहे, हे आम्ही मान्य करतो. एकूण 16 लाख प्रकरणांपैकी 6 लाख प्रकरणे निकाली काढली आहेत आणि उर्वरित प्रकरणे 31 मार्च पर्यंत निकाली काढण्यात येतील असे मंत्री महोदयांनी सांगितले. आज 20 तारीख आहे, पुढील 10 दिवसांमध्ये उर्वरित 10 लाख प्रकरणे निकाली काढण्यात येतील काय आणि त्यास दिरंगाई झाली तर कोण जबाबदार आहे ?

श्री.राजकुमार बडोले : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी चांगला प्रश्न विचारलेला आहे. स्कॉलरशीपचे पैसे देण्याची एकूण प्रोसेस पाहता विद्यार्थ्याने ऑन लाईन फॉर्म भरल्यानंतर तो फॉर्म विद्यापीठात जातो त्यानंतर तो समाजकल्याण विभागाकडे येतो. जानेवारी महिन्यात समाजकल्याण विभागाकडे अर्ज येतात आणि ही सर्व ऑन लाईन प्रोसेस आहे. उर्वरित 10 लाख प्रकरणे 31 मार्चपर्यंत निकाली काढण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न करण्यात येईल, (अडथळा) जास्तीत जास्त प्रकरणे मार्गी लावण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

-------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**नवी मुंबई परिसरातील खारघर येथील टोलनाका बंद करण्याबाबत**

**(4) * २६६२ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनील तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतीश चव्हाण, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.हरिसिंग राठोड, श्री.शरद रणपिसे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अनिल भोसले, श्री.संदिप बाजोरिया, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, अॅड.निरंजन डावखरे, ॲड.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील खारघरमध्ये रस्त्यांचे काम पूर्ण न करता टोलवसुली करण्याची अंमलबजावणी दिनांक ६ जानेवारी, २०१५ पासून करण्यात आली, हे खरे आहे काय,
(2) तसेच, पनवेल ते खारघर या दरम्यान विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या खासगी बसेस तसेच इतर अनेक वाहनांवर टोल बंद करण्याचा निर्णय घेण्यात येवूनही वाहनांवर मोठया प्रमाणात टोल घेण्यात येत असल्यामुळे सर्वत्र तीव्र असंतोषाचे व संतापाचे वातावरण निर्माण होत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(3) असल्यास, नव्याने खारघर येथे सुरू करण्यात आलेल्या टोलवसुलीवर लांबच लांब रांग लावून वाहतुकीची मोठ्या प्रमाणात कोंडी होत असल्याने जनतेमध्ये तीव्र असंतोष निर्माण झालेला आहे, हे ही खरे आहे काय,
(4) असल्यास, खारघर येथील सदरची टोलवसुली बंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच टोलवसुलीबाबत शासनाचे धोरण काय आहे,
(5) असल्यास, प्रश्न भाग-४ बाबत कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.
(2) हे खरे नाही.
(3) हे खरे नाही.
(4) सदर कामाच्या सवलत करारनाम्यातील अटी व शर्तीस अधिन राहून या पथकर स्थानकावर पथकर वसुली करण्यात येत आहे.
(5) प्रश्न उद्‌भवत नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2662...

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय,या टोल नाक्यावर वाहनांच्या लांबच्या लांब रांगा लागून वाहतुकीची कोंडी होते हे खरे आहे काय या प्रश्नाचे उत्तर "नाही "असे दिलेले आहे. आपण वर्तमानपत्रात वाचले असेल तसेच टी.व्ही.वर पाहिले असेल की याच टोल नाक्यावर भारतरत्न श्री.सचिन तेंडुलकर यांना काय अडचण आल्या आणि त्यांनी माननीय मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून त्याबाबत तक्रार केली. आम्ही विचारलेला प्रश्न त्या अगोदरचा आहे आणि भारतरत्न सचिन तेंडुलकर यांना नंतर अडचण आली. उत्तरात सांगण्यात आले की, त्या ठिकाणी वाहतुकीची कोंडी होत नाही, परंतु त्या ठिकाणी वाहतुकीची कोंडी होत असल्याचे आपण नेहमी पाहतो. टप्पा क्रमांक-1 तुर्भे व मानखुर्द येथील उड्डाणपूल तसेच तळोदा खाडीवरील उड्डाणपुलाचे काम अपूर्ण असल्याचे समजते आणि असे असताना टोल वसुली का देण्यात आली ? तसेच टप्पा क्रमांक-2 तुर्भे येथील रोड ओव्हर ब्रिज आणि मानखुर्द येथील रोड ओव्हर ब्रिजचे काम अद्याप सुरु झालेले नाही. तळोजा खाडीपूल व सेवा रस्त्यास अद्याप सीआरझेडची परवानगी मिळालेली नाही या सर्व गोष्टी असताना त्या ठिकाणी टोल सुरु करुन कंत्राटदारावर मेहरनजर कशासाठी ठेवण्यात आली आहे, माझा शेवटचा प्रश्न असा आहे की, या प्रकल्पाची मूळ किंमत किती होती ?

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, हे खरे आहे की, त्या ठिकाणी टोल सुरु झाल्यानंतर वाहतुकीची कोंडी होत होती. आपण करारामध्ये तेथील स्थानिक पाच गावांना टोलमधून वगळण्यात येईल तसेच स्थानिक एमआयडीसीना यातून वगळण्यात येईल हे मान्य केले होते. त्यामुळे ती वाहने आयडेन्टीफाय करुन त्यांना पासेस देणे यामध्ये वेळ जात होता. त्या वाहनांची संख्या जवळपास 30 ते 32 हजार इतकी होती. त्यामुळे वेळ होत होता. आता त्या पाच गावांतील ग्रामस्थांना पास मिळालेला असल्यामुळे तो प्रश्न सुटलेला आहे.

श्री.अनिल तटकरे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी पाच गावांचा उल्लेख केला. मला अधिकृत माहिती मिळालेली आहे की, एमएच 06 आणि एमएच 046 या वाहनांना टोलमधून सूट देण्यात आलेली आहे. मी तेथून आठवड्यातून चार-पाच वेळा प्रवास करतो.

..5..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2662...

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, मूळ करारामध्ये पाच गावांचा समावेश आहे. परंतु अजूनही काही गावे वगळण्यात यावीत असा स्थानिक प्रवाशांचा आग्रह आहे. आपण त्यासाठी अभ्यासगट नेमलेला आहे. त्या अभ्यास गटाचा अहवाल अजून प्राप्त झालेला नाही.

माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी प्रश्न विचारला होता की, त्या ठिकाणी वाहनांची कोंडी होते. त्याबाबत सांगू इच्छितो की, हा टोल कोणासाठी लागू नाही, हे आता स्पष्ट झालेले आहे. ग्रामस्थाना पासेस मिळालेले आहेत. सीआरझेडची परवानगी न मिळाल्यामुळे टोल नाके वेगवेगळे करावे लागले. त्यामुळे लेन कमी झाल्या. आता आपण कंत्राटदाराला सांगितले आहे की, त्यांनी रांगेत जाऊन टोलची पावती दिली पाहिजे. आता ती पद्धत सुरु झालेली असल्यामुळे वाहनांच्या रांगा कमी झालेल्या आहेत.

सभापती महोदय, भारतरत्न श्री.सचिन तेंडुलकर यांच्याकडे टॅग आहे आणि टॅगची लेन वेगळी आहे. फ्री पासेसची लेन वेगळी आहे. परंतु ते त्या लेनमधून न जाता दुसऱ्या लेनमधून गेले. भारतरत्न श्री.सचिन तेंडुलकर यांच्या पत्राचा मी आदरच करतो. भारतरत्न श्री.सचिन तेंडुलकर आले हे समजल्यावर तेथे मोठ्या संख्येने लोक गोळा झाले. सचिन तेंडुलकर देखील गाडीतून खाली उतरले. त्यामुळे ट्रॅफिक जाम झाला. मी या ठिकाणी मान्य करतो की, आपणास जेवढ्या लेन पाहिजे होत्या त्या न मिळाल्यामुळे आपणास वेगवेगळ्या ठिकाणी जा-ये करावी लागली, त्यामुळे तेथे थोडी गर्दी आहे.

यानंतर श्री.बोर्डे..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2662

श्री.चंद्रकांत पाटील....

परंतु एकूणच या टोलनाक्यावर आणखी काही जणांना सूट देता येईल काय आणि तेथील वाहतूक कोंडी संपविता येईल काय, या बाबत सरकार प्रयत्न करीत आहे. महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारले की, खारघरचा टोल इतक्या लवकर का सुरु केला ? मी त्यांना सांगतो की, कोणत्याही बीओटी तत्त्वावरील प्रकल्पाचा टप्पा-1 आणि टप्पा -2 असतो. खारघर येथील टोलनाक्याच्या टप्पा क्रमांक-1 चे 98 टक्के काम पूर्ण झाले होते. आमचे सरकार सत्तेवर आल्यानंतर सुध्दा तीन महिने टोल सुरु करण्याचे टाळले. सरकारचा प्रयत्न होता की, या टोलनाक्यावरुन जितके दिवस टोल वसुली करणे टाळता येईल तितके दिवस टाळावी. परंतु त्या विरोधात ठेकदार न्यायालयात गेले आणि न्यायालयाने आदेश दिले की, खारघर येथील टोल 15 दिवसांत सुरु केला नाही तर शासनावर कारवाई करण्यात येईल. त्यामुळे माननीय न्यायालयाच्या आदेशानुसार त्या टोलनाक्यावर वसुली सुरु केली आहे. नियमानुसार टप्पा क्रमांक-1 चे काम 98 टक्के पूर्ण झाल्यानंतर आणि टप्पा क्रमांक-2 चे काम पूर्ण होण्यापूर्वी टोल सुरु करता येतो.

श्री.अनिल तटकरे : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी उत्तर देताना सांगितले की, वाहतूक कोंडी टाळण्यासाठी टोलनाक्यावर वाहनांच्या रांगेत जाऊन तेथे पावत्या देण्यात येत आहेत. मी विचारु इच्छितो की, रांगेत जाऊन ज्या पावत्या दिल्या जात होत्या त्या बोगस होत्या ही बाब वस्तुस्थितीला धरुन आहे काय ?

श्री.चंद्रकांत पाटील : महोदय, असे म्हणता येणार नाही. संबंधित कर्मचाऱ्यांकडे संगणकीकृत मशीन असते. त्यामुळे त्यांच्याकडून बोगस पावत्या देण्यात येतात, असे म्हणता येणार नाही.

श्री.नरेंद्र पाटील : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी अतिशय महत्त्वाचा प्रश्न उपस्थित केला आहे. मागच्या विधानसभेतील काँग्रेस पक्षाच्या एका आमदारांनी या टोलनाक्याच्या विरोधात राजीनामा दिला होता. ते दुसऱ्या पक्षात गेले आणि तरीही त्या भागात टोलमुक्ती होत नाही. तत्कालीन माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार यांनी नवी मुंबई येथील मेळाव्यात सांगितले होते की, या रस्त्यासाठी 1200 कोटी रुपये खर्च आलेला आहे. त्यातील 1000 कोटी



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2662

श्री.नरेंद्र नाटील....

रुपये सिडको देऊ शकते. आता नवीन सरकारच्या मंत्री महोदयांनी 1000 कोटी रुपयांची तरतूद सिडकोच्या माध्यमातून उपलब्ध करुन दिली आणि उर्वरित 200 कोटी रुपये सरकारच्या माध्यमातून उपलब्ध करुन दिले तर खारघर टोलनाक्याचा प्रश्न मिटू शकतो. पश्चिम महाराष्ट्र, कोकण, पुणे, सांगली, सातारा इत्यादी भागात जाण्यासाठी खारघर हा एकच महामार्ग असल्यामुळे सरकार या बाबतचा निर्णय घेणार काय ?

श्री.चंद्रकांत पाटील : महोदय, यासाठी सिडको किंवा सरकारला सुध्दा पैसा द्यावा लागणार नाही, या दृष्टीने राज्य सरकार विचार करीत आहे. लवकरात लवकर सगळ्यांच्याच तक्रारी संपतील.

श्री.सुनील तटकरे : माननीय मंत्र्यांनी सिडको किंवा सरकार पैसा न देता, यातून मार्ग काढण्यासाठी सरकार तिसऱ्या पध्दतीने प्रयत्न करीत आहे असे उत्तर दिलेले आहे, याबद्दल त्यांचे आभार मानतो. फक्त तो सुदिन लवकरात लवकर येवो एवढीच अपेक्षा करु या.

महोदय, सायन-पनवेल हा 10 पदरी रस्ता करण्यात आला. त्यामुळे वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत झाली. मी निदर्शनास आणून देतो की, वाशी येथील टोलनाक्यावर वाहतुकीची बरीच मोठी कोंडी होते. कारण सर्व ठिकाणावरुन येणारी वाहतूक त्या ठिकाणी येते. मी विचारु इच्छितो की, वाशी येथील रस्ता वाढविण्यासाठी शासन प्रयत्न करणार काय ? एका बाजूला शासनाने सायन-पनवेल 10 पदरी रस्ता पूर्ण केला आणि दुसऱ्या बाजूला वाशी येथील पथकर नाका सहा पदरी ठेवला आहे. वाशी पुलाला सुध्दा 10 पदरी करण्याबाबतचे प्रस्तावित होते. मी स्पेसिफिक विचारतो की, ही बाब सुध्दा शासन लवकरात लवकर हातामध्ये घेऊन कार्यवाही करणार काय ?

श्री.चंद्रकांत पाटील : महोदय, काही परवानग्यांमुळे टप्पा क्रमांक-2 चे काम अपूर्ण राहिलेले आहे. दुसऱ्या टप्प्यामध्ये ही सर्व कामे प्रस्तावित आहेत. माननीय विरोधी पक्ष नेत्यांना सांगू इच्छितो की, कोणताही वाढीव खर्च न होता टप्पा क्रमांक-2 पूर्ण होणार आहे.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2662

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, निवडणुकीच्या पूर्वी भारतीय जनता पक्षाच्या जाहीरनाम्यात सबंध महाराष्ट्राला टोलमुक्त करण्यात येईल असे आश्वासन दिले हाते. त्यांचा जाहिरनामा माझ्याकडे आहे. या निमित्ताने मी स्पेसिफिक विचारतो की, निवडणुकीपूर्वी दिलेल्या शब्दानुसार सत्तेत आल्यानंतर माननीय मंत्र्यांनी महाराष्ट्रातील किती टोल नाके बंद केले आहेत ?

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, गेल्या 15 वर्षात आधीच्या सरकारला जे शक्य झाले नव्हते ते चार महिन्यात....(अडथळा) मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, मला सभागृहाला वस्तुस्थिती सांगितली पाहिजे. माझे पुढील वाक्य आपण ऐकून घ्यावे. गेल्या 15 वर्षात टोल करारात ठेकेदारांना फेव्हर करण्यासंदर्भातील तरतुदी आहेत. त्यामुळे त्या करारातील तरतुदींचा अभ्यास करुन, कायदेशीर कार्यवाही करताना काय काय अडचणी येतील एवढेच मी सांगत होतो. मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांना सांगू इच्छितो की, तुम्ही ज्या अडचणी निर्माण करायला 15 वर्षे घेतली त्या अडचणी सोडविण्यास आम्हाला फार वेळ लागणार नाही.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, टोलचे धोरण कधी आले हे माननीय मंत्र्यांना माहीत असेल किंवा माहीत असूनही ते कदाचित विसरले असतील. पण यामध्ये मला जायचे नाही. महोदय, आघाडी सरकारने दिलेल्या शब्दानुसार राज्यातील 44 टोल नाके बंद केले होते. आपल्या पक्षाने निवडणुकीपूर्वी राज्यातील सबंध टोल बंद करण्याबाबत शब्द दिला होता. त्यामुळे मी स्पेसिफिक विचारतो की, आपण राज्यातील टोल बंद करण्याबाबत दिलेला शब्द किती दिवसांत पाळणार आहात ?

श्री.चंद्रकांत पाटील : महोदय, आम्ही यापुढचे टोल धोरण ठरवित आहोत. कदाचित त्यामध्ये हा विषय येणारही नाही. आधीचे जे टोलनाके आहेत त्यातील करारामध्ये By back ला वाव नाही. या विषयी लिगल डिस्कशन करीत आहोत. महोदय, आम्ही निवडणूक जाहिरनाम्यात नव्हे तर, प्रचाराच्या वेळी वारंवार म्हटले होते की, राज्याला टोलमुक्त करु आणि त्यासाठी आम्ही पूर्ण बांधिल आहोत. हे काम लवकरात लवकर करू

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, खारघर टोलनाक्यावर 25-30 हजार प्रवासी आणि स्थानिक नागरिकांसह आम्ही दोन-तीन तास ठिय्या आंदोलन केले होते. त्यावेळी शासनाच्या



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2662

श्री.जयंत प्र.पाटील....

प्रतिनिधीकडून आम्हाला सांगण्यात आले की, नवी मुंबईचा टोल आणि खारघरचा टोल एकत्र करुन या संदर्भात तोडगा काढत आहोत. त्यामुळे आंदोलन मागे घ्यावे अशी आम्हाला विनंती करण्यात आली होती. दोन्ही टोलपैकी एकच टोल ठेवण्याचे त्यावेळी सांगितले होते. मी विचारु इच्छितो की, आम्हाला आंदोलनाच्या वेळी शासनाच्या प्रतिनिधीने जो शब्द दिला होता त्यापासून शासन मागे गेले आहे काय ? खारघर टोलनाक्यावर प्रचंड वाहतूक कोंडी असते. माझे तर स्पष्ट मत आहे की, खारघर टोलनाक्याचे डिझाईन चुकलेले आहे. परदेशात दोन-तीन मिनिटांत टोल वसूल केल्यानंतर वाहने पास होतात. त्यामुळे मी स्पेसिफिक विचारतो की, सदरहू टोलनाक्याचे डिझाईन नव्याने तयार करुन, टोलनाके रुंद करण्याचे काम शासन करेल काय ? पण खारघर टोलनाक्याच्या दोन्ही बाजूला इमारती आहेत. त्यामुळे त्या नाक्याच्या लेन वाढविण्याची शक्यता नाही. त्यामुळे खारघर टोलनाका रद्द करण्याबाबत शासनाने दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करण्यात येईल काय ?

श्री.चंद्रकांत पाटील : महोदय, खारघर टोलनाका पूर्णपणे बंद करता येईल काय आणि खारघर-नवी मुंबईचा टोल एकत्र करता येईल काय, असा प्रस्ताव असल्याचे सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे. मी त्यांना सांगतो की, अशा प्रकारचा प्रस्ताव नाही. परंतु खारघर टोलनाक्यावर होणारी गर्दी लक्षात घेऊन त्यामध्ये सकारात्मक उत्तर शोधत आहोत. यासाठी जास्त वेळ लागणार नाही. सन्माननीय सदस्यांनी परदेशात टोल वसूल करण्यासाठी जास्त वेळ लागत नाही असे सांगितले. मी त्यांना सांगतो की, परदेशात फिजिकल टोल कलेक्शन केले जात नाही.

नंतर श्री.कांबळे.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2662....

श्री. चंद्रकांत पाटील ....

कालच माननीय मुख्यमंत्र्यांच्या समोर क्रेडिट कार्डच्या आधारे टोल देण्याच्या संदर्भातील सादरीकरण झालेले आहे. सदरचे सॉफ्टवेअर वापरात आल्यावर संपूर्ण देशभर कुठेही गेले तर त्या क्रेडिट कार्डने ज्याला महापास असे म्हटले जाते त्याने टोल भरता येणार आहे. ई-वे होतील त्यावेळी स्वाभाविकपणे आपल्याला सुध्दा विदेशाप्रमाणे टोल नाक्यावरून काही सेकंदातच जाता येईल.

ॲड. निरंजन डावखरे : सभापती महोदय, एसटीला टोलमधून सूट देण्याबाबत शासनाने जाहीर केले होते, ती सूट कधी देण्यात येणार आहे ? सन्माननीय सदस्य श्री. अनंत गाडगीळ हे त्यांच्या गाडीने येताना त्यांना टोल नाक्यावर अडविण्यात आले, त्यांनी त्यांचे ओळखपत्र दाखविल्यानंतर सुध्दा याच टोल नाक्यावरील लोक त्यांच्याशी अरेरावीने वागत होते. आपण त्या लोकांवर काय कारवाई करणार आहात ? सभागृहातील सन्माननीय सदस्यांच्या संदर्भात असे होत असेल तर माननीय मंत्र्यांनी या संदर्भात गंभीर दखल घेणे गरजेचे आहे.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाच्या संदर्भात अशी तांत्रिक बाब त्या टोल नाक्यावरील कर्मचाऱ्यांनी सन्माननीय सदस्यांना सांगितली की, ज्या गाडीने आमदार प्रवास करीत आहेत ती गाडी त्यांची असली पाहिजे, ती टुरिस्ट टॅक्सी वगैरे नसावी. सन्माननीय सदस्यांनी ओळखपत्र दाखविल्यानंतर त्यांना टोल नाक्यावर सवलत मिळाली पाहिजे. त्यामुळे माननीय मंत्र्यांकडून या संदर्भातील स्पष्ट सूचना देण्यात येतील का ?

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, राज्यात एसटीला सर्व टोलमधून मुक्त केले आहे. परंतु तरीही तसे होत नसेल तर निदर्शनास आणून द्यावे. एसटी टोल मुक्तच आहे. (अडथळा) सभापती महोदय, मी माझे शब्द मागे घेतो. एसटी ही फक्त खारघर टोल नाक्यापुरती मुक्त आहे, बाकी ठिकाणी टोल मुक्त नाही. संपूर्ण राज्यात एसटी टोल मुक्त होईल असा प्रयत्न करण्यात येईल. सन्माननीय सदस्यांबरोबर केलेल्या अरेरावीच्या वागणुकीच्या संदर्भात मुद्दा उपस्थित करण्यात आला....

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, एसटी टोल मुक्त नव्हे तर राज्य टोल मुक्त झाले पाहिजे.

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2662....

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांना दिल्या गेलेल्या वागणुकीच्या संदर्भात सांगू इच्छितो की, सभागृहाची भावना आहे तीच सरकारची भावना आहे. आमदारांना ओळखपत्र दिले आहे. सर्व टोल नाक्यावरून त्यांना टोलमध्ये सूट देऊनच त्यांची गाडी सुटली पाहिजे असे सांगण्यात येईल.

**उप सभापती** : मी माननीय मंत्र्यांना सांगू इच्छितो की, आपण टोल चालविणाऱ्या मंडळींना बंधनकारक करावे की, त्यांनी आमदारांना ओळखले पाहिजे. आपण त्यांच्यावर अशी सक्ती करावी. आमदारांनी ओळख द्यायची, मग टोलमध्ये सूट द्यायची हे ठीक नाही.

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, आमदारांना टोल नाक्यावर अशी कोणतीही मानहानी सहन करावी लागणार नाही या संदर्भात कडक सूचना देण्यात येतील.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, वरळी सी लिंकपासून नवी मुंबई, पुणे, कोल्हापूरला जाईपर्यंत अनेक टोल नाके लागतात. लोकांना खूप वेळ लांब रांगामध्ये थांबावे लागते. वरळी सी लिंक लोकांचा वेळ वाचावा म्हणून बांधण्यात आला आहे परंतु तेथेही थांबावे लागते. पासेस दिले आहेत परंतु पासेस चेक करण्यासाठी तेथे थांबावे लागते. सिंगापूरला या संदर्भात प्रिपेड कार्ड असते, तेथे गाडीला एक मीटर लावण्यात आलेले असते. टोल नाका क्रॉस केल्यानंतर आपोआप तेवढी रक्कम मीटरमधून मायनस केली जाते. कोणालाही थांबावे लागत नाही. परदेशात असे तंत्रज्ञान विकसित झाले आहे. आपण आपल्याकडे असे तंत्रज्ञान लवकर आणणार आहात का ?

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, मी मघाशी उत्तर दिले आहे की, कालच एका सॉफ्टवेअरचे सादरीकरण झालेले आहे. सदर बाबतीतील निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे. त्यात काही बदल सुचविले आहेत. आपण ई-वे च्या दिशेने जात आहोत.

श्री. अनंत गाडगीळ : महोदय, सन्माननीय सदस्यांनी माझा उल्लेख केला. मी येथे दोन गोष्टी सांगू इच्छितो. आणेवाडीच्या टोल नाक्यावर मला केवळ थांबविण्यात आले असे नाही तर मला असेही सांगण्यात आले की, हा रिलायन्सचा टोल नाका असून आम्ही आमदार वगैरे जाणत नाही. मी माझी या संदर्भातील लेखी तक्रार तत्कालीन सभापती श्री. शिवाजीराव देशमुख यांच्याकडे दिली होती. परवा वाशीच्या टोल नाक्यावर देखील तसेच झाले. तुम्ही तुमचे ओळखपत्र आमच्या



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2662....

श्री. अनंत गाडगीळ ....

हातात द्या, ते आम्हाला स्कॅन करायचे आहे, त्या शिवाय तुमची गाडी सोडणार नाही असे मला सांगण्यात आले. मी त्या संदर्भातील लेखी तक्रार देखील माननीय मंत्र्यांकडे दिली आहे. अनेक सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे की, आम्हाला अशा अडवणुकीला सामोरे जावे लागत आहे. सभापती महोदय, मी आठवड्यातील 3 दिवस एक्सप्रेस वे वरून प्रवास करतो. शुक्रवार संध्याकाळ, शनिवार, रविवार सकाळ मुंबईहून पुण्याला जाताना, पुण्याहून रविवारी परत येताना किमान अर्धा तास टोल नाक्यावर वाया जातो. शासन यासंबंधी कोणत्या सुधारणा करणार आहे ?

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, मी सभागृहाच्या भावना लक्षात घेतल्या आहेत. माझीही तीच भावना आहे. मी मघाशी सांगितले आहे की, सदर बाबतीत कडक कारवाई करण्यात येईल. आजच्या आज विभागाचे परिपत्रक सर्व टोल नाक्यांवर ई-मेलने पाठविण्यात येईल. सार्वजनिक बांधकाम खाते, एमएसआरडीसी या दोघांच्या टोल नाक्यांवर आजच्या आज अतिशय कडक परिपत्रक पाठविण्यात येईल. तसेच सन्माननीय सदस्यांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांना त्याची प्रत देखील दिली जाईल.

श्री. दीपकराव साळुंखे : सभापती महोदय, या टोल नाक्यांवर सर्व गावांनी ओवाळून टाकलेली मुले कामाला असतात. मी सन्माननीय सदस्यांच्या मताशी सहमत आहे. प्रत्येक सन्माननीय सदस्यांचा चेहरा बघण्याचे काम तेथे चाललेले असते. मला 3 वेळा असा अनुभव आला आहे. आपण लोकप्रतिनिधींसाठी वेगळी रांग करणार का ?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ प्रोसिजर आहे. माननीय मंत्री श्री. एकनाथ शिंदे हे उत्तर देतील असे सांगितले होते. परंतु प्रश्नाचे उत्तर माननीय मंत्री श्री. चंद्रकांत पाटील यांनी दिले आहे. आम्हाला या संदर्भातील माहिती मिळाली पाहिजे.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, आताच सांगितले की, या संदर्भातील परिपत्रक आजच्या आज पाठविण्यात येईल. आमदार, आय कार्ड हे शब्दच त्यांना नवीन वाटतात. आमच्या आय कार्डची झेरॉक्स त्यांच्याकडे पाठवावी आणि सांगावे की, हे आय कार्ड पाहून आमदारांना सोडण्यात यावे. आपण आय कार्डची झेरॉक्स त्यांना दिली तर आमचे आय कार्ड हे आमदारांचे



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2662....

श्री. विक्रम काळे ....

आहे हे त्यांना समजेल. आपण असे केले तर त्यामध्ये काही दुरूस्ती होईल. आपण अशी परिपत्रके काढून त्यांना काहीही फरक पडत नाही. त्यामुळे मी सांगितल्याप्रमाणे तुम्ही आजच्या आज अशी कार्यवाही करणार का ?

----

..5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**ओबीसी, एससी, व्हीजेएनटी आणि एसबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांची**

**प्रलंबित शिष्यवृत्ती देण्याबाबत**

**(५) * ३८९१ श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक २३९८ ला दिनांक १८ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तरासंदर्भातः** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ओबीसी, एससी, व्हीजेएनटी आणि विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना सन २०१३-२०१४ अखेरची शिष्यवृत्ती वेळेवर न मिळण्याची कारणे काय आहेत,
(२) सन २०१३-२०१४ अखेरचे १ लाख ९५ हजार शिष्यवृत्तीच्या प्रलंबित प्रकरणांपैकी १ ऑगस्ट, २०१४ रोजी संबंधितांना दिलेल्या सूचनांनुसार किती प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत,
(३) अद्याप किती प्रकरणे प्रलंबित आहेत व किती कालावधीत निकाली काढण्यात येतील ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) ज्या विद्यार्थ्यांनी अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत तसेच ज्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरले आहेत तथापि संबंधित महाविद्यालयांनी त्या विद्यार्थ्यांचे अर्ज विहित कालावधीत संबंधित जिल्ह्याच्या सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांच्याकडे सादर केले नाहीत. त्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती प्रलंबित आहे.
(२) सन २०१३-१४ मधील प्रलंबित असलेल्या शिष्यवृत्तीच्या प्रकरणांपैकी १,५३,६२४ प्रकरणे निकाली काढण्यात आलेली आहेत.
(३) सद्यःस्थितीत ४२,०६० शिष्यवृत्तीची प्रकरणे प्रलंबित आहे. सदर अर्जापैकी जे महाविद्यालय स्तरावर प्रलंबित आहेत त्या महाविद्यालयांना अर्ज त्वरित संबंधित जिल्ह्याच्या समाजकल्याण अधिका-यांना सादर करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या असून त्यानुसार प्रलंबित अर्ज निकाली काढण्याची कार्यवाही सुरू आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, शाळा सुरू झाल्याबरोबर शिष्यवृत्ती ताबडतोब 1 महिन्याच्या आत देण्यात येईल असे माननीय मंत्र्यांनी आश्वासन दिले होते. सदर आश्वासनाची पूर्तता करण्यात येणार आहे का ?

श्री. दिलीप कांबळे : सभापती महोदय, होय.

**उप सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

----

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./ मु.शी** : सभापतींची निवडणूक व अभिनंदनपर भाषणे

**उप सभापती** : सभापतींच्या निवडणुकीसंबंधात मला सदस्यांना विदित करावयाचे आहे की, विधानपरिषदेच्या सभापतींच्या निवडणुकीसाठी गुरुवार, दिनांक 19 मार्च, 2015 रोजी दुपारी 12.00 वाजण्यापूर्वी पुढील सदस्यांची नावे नामनिर्देशित करण्यात आली होती :-

| सदस्याचे नाव | सूचकाचे नाव | अनुमोदन देण्याऱ्याचे नाव |
|---|---|---|
| (1) श्री.शरद नामदेव रणपिसे | श्री.रामहरी गोविदराव रुपनवर | ॲड.हुस्नबानू निझामुद्दीन खलिफे |
| (2) श्री.शरद नामदेव रणपिसे | श्री.आनंदराव राघोजी पाटील | श्री.अनंत विठ्ठल गाडगीळ |
| (3) डॉ.नीलम गोऱ्हे | ॲड.अनिल परब | श्री.गोपीकिसन बाजोरिया |
| (4) श्री.रामराजे प्रतापसिंह नाईक-निंबाळकर | श्री.सुनील दत्तात्रेय तटकरे | श्री.प्रकाश सूर्यभान गजभिये |
| (5) श्री.रामराजे प्रतापसिंह नाईक-निंबाळकर | ॲड.जयदेव मारुतीराव गायकवाड | श्री.हेमंत टकले |
| (6) श्री.श्रीकांत गोविंद देशपांडे | श्री.दत्तात्रय सावंत | डॉ.दीपक सावंत |

सन्माननीय सदस्य श्री.रामहरी गोविंदराव रुपनवर यांनी आपला प्रस्ताव मांडावा.

श्री.रामहरी रुपनवर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.शरद नामदेव रणपिसे यांची महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती म्हणून निवड करण्यात यावी, असा प्रस्ताव मी आपणास सादर केला आहे. आता मी हा प्रस्ताव मागे घेत आहे.

सभागृहाच्या अनुमतीने प्रस्ताव मागे घेण्यात आला.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.आनंदराव राघोजी पाटील यांनी आपला प्रस्ताव मांडावा.

(प्रस्ताव मांडण्यात आला नाही.)

**उप सभापती :** सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब यांनी आपला प्रस्ताव मांडावा.

2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांची महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती म्हणून निवड करण्यात यावी, असा प्रस्ताव मी आपणास सादर केला आहे. आता मी हा प्रस्ताव मागे घेत आहे.

सभागृहाच्या अनुमतीने प्रस्ताव मागे घेण्यात आला.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी आपला प्रस्ताव मांडावा.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने श्री.रामराजे प्रतापसिंह नाईक-निंबाळकर यांची महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती म्हणून निवड करण्यात यावी, असा प्रस्ताव मांडतो.

ॲड.जयदेव गायकवाड : सभापती महोदय, श्री.रामराजे प्रतापसिंह नाईक-निंबाळकर यांची महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती म्हणून निवड करण्यात यावी, असा जो प्रस्ताव मांडण्यात आला आहे, त्याला मी अनुमोदन देत आहे.

प्रस्ताव मतास टाकून एकमताने संमत झाला

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.रामराजे प्रतापसिंह नाईक-निंबाळकर यांची विधानपरिषदेचे सभापती म्हणून निवड झाली आहे, असे मी जाहीर करतो.

--------------

...3.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**उप सभापती :** श्री.रामराजे प्रतापसिंह नाईक-निंबाळकर, नवनियुक्त सभापती यांचे सर्वप्रथम मी सभागृहाच्या वतीने व वैयक्तिकरित्या अभिनंदन करतो.

माझ्या उप सभापती पदाच्या कार्यकाळात माननीय श्री.जयंतराव टिळक, प्रा.ना.स.फरांदे, माननीय श्री.शिवाजीराव देशमुख अशा अत्यंत अभ्यासू व सालस सभापतींच्या हाताखाली काम करण्याचे, त्यांचे मार्गदर्शन लाभण्याचे सौभाग्य मला मिळाले म्हणून मी स्वत:ला भाग्यवान समजतो. उच्चविद्याविभूषित, मृदूभाषिक, राजकारण व प्रशासनाचा गाढा अनुभव असलेले श्री.रामराजे यांची या जबाबदारीच्या व सन्मान्य अशा सभापती पदावर निवड झालेली आहे. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांच्या घराण्याशी नाते सांगणारे श्री.रामराजे यांनी महसूल व पुनर्वसन, जलसंपदा (कृष्णा खोर पाटबंधारे महामंडळ), राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष इत्यादी महत्त्वाची व मानाची पदे भूषविलेली आहेत. आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेबांचे निष्ठावान व विश्वासू सहकारी म्हणून आपल्या सर्वांना ते परिचित आहेत. नगराध्यक्ष, फलटण नगरपरिषद ते सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद हा त्यांचा वाढता आलेख अभिमानास्पद आहे. त्यांचे मी येथे स्वागत करतो.

आजच्या या स्वागत सोहळ्यामध्ये सहभागी होताना मला गुरूस्थानी असलेले तत्कालीन सभापती आदरणीय श्री.शिवाजीराव देशमुख यांच्या बाबतीत बोलताना अभिमानाने मान उंचावतेही आणि आदराने लवतेही. सभापती, पंचायत समिती, शिराळा ते राज्यातील सर्वोच्च सभागृहाचे सभापती म्हणून झालेला त्यांचा प्रवास निश्चितच प्रेरणादायी होता.

पश्चिम महाराष्ट्रातील थोर नेते स्व.यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, बाळासाहेब देसाई यांच्याच संस्कारात वाढलेले हे व्यक्तिमत्त्व आहे. त्यांच्या संसदीय कालखंडात राज्यमंत्री, मंत्री, प्रदेशाध्यक्षपदी राहून त्यांनी आपल्या हातून डोंगराएवढे कार्य उभे केले. परंतु, त्यांनी त्या डोंगरावरून कधी आपल्या कार्याचा डांगोरा पिटला नाही.

शरीराची काठी वाकण्याआधी माणसाचे मन वाकलेले असते. सन्माननीय देशमुख साहेबांनी मनाला पोक येऊ दिला नाही आणि शेवटपर्यंत ते लढवय्येच राहिले. म्हणूनच मी मघाशी म्हटल्याप्रमाणे त्यांच्याविषयी बोलताना अभिमानाने मान उंचावतेही आणि आदराने लवतेही, ते



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**उप सभापती...........**

ह्याचसाठी. त्यांच्या उर्वरित आयुष्यासाठी मी शुभचिंतन करतो आणि नवनियुक्त सभापती श्री.रामराजे नाईक-निंबाळकर यांना त्यांच्या पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा देतो.

आता मी, श्री.रामराजे प्रतापसिंह नाईक-निंबाळकर यांना सभापतीस्थान स्वीकारण्याची विनंती करतो.

(यानंतर श्री.रामराजे प्रतापसिंह नाईक-निंबाळकर यांनी सभापतीस्थान स्वीकारले. )

------------

यानंतर श्री.वि.खर्चे......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(सभापतीस्थानी माननीय सभापती श्री.रामराजे प्रतापसिंह नाईक-निंबाळकर)**

श्री.देवेंद्र फडणवीस (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सभापती पदी आपली निवड एकमताने झाल्याबद्दल मी आपले मन:पूर्वक अभिनंदन करतो. तसेच सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांचे देखील अभिनंदन करतो.

सभापती महोदय, आपणाला प्रदीर्घ राजकीय अनुभव आहे. मोठा इतिहास असलेल्या घराण्यातून आपण आल्यानंतर देखील सर्व सामान्य लोकांकरिता अनेक वर्षे काम केले आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थापासून मंत्री पदापर्यंत वेगवेगळ्या जबाबदाऱ्या आपण पार पाडल्या आहेत. आपण उच्च विद्याविभूषित एलएलएम आहात. महाराष्ट्राने आपणाकडे नेहमी सौजन्यमूर्ती म्हणून पाहिले आहे. सभापतीचे पद असेच असते. या पदावर फार सयंम असावा लागतो. सर्वांना एकत्रित घेऊन सभागृहाचे कामकाज करावे लागते. सभापती पक्षाचे कधीच नसतात तर ते सभागृहाचे असतात. ती हातोटी आपल्यामध्ये आहे. आपण कृष्णा खोरे महामंडळ किंवा उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास महामंडळ या सर्व महामंडळाच्या माध्यमातून नेहमी आपण विकासाची कास धरली आहे. आपल्या मंत्री पदाच्या काळात किंवा इतर वेळी आपण सर्वांना सोबत घेऊन राजकीय वाटचाल केली आहे. या संबंधांचा फायदा सभागृहाचे कामकाज करताना निश्चितपणे आपणाला होईल. सर्व लोक आपल्या राजकीय वाटचालीबाबत भाष्य करतीलच मला देखील विधानसभेचा सदस्य म्हणून आपणासोबत काम करण्याची संधी प्राप्त झाली होती. त्या काळात मी पाहिले आहे की, अनेक प्रश्नांच्या संदर्भात थेट चर्चा करून आपण मार्ग काढीत होता. मला असे वाटते की, लोकशाहीत मार्ग काढणे महत्वाचे असते. लोकशाही ही कलेक्टीव्ह व्हीजडम असल्यामुळे प्रत्येकाच्या मताला महत्व आहे. प्रत्येकाचे मत ऐकले गेले पाहिजे, प्रत्येकाचे मत ॲकनॉलेज झाले पाहिजे. बहुमताचा आदर करून निर्णय घेतला पाहिजे. लोकशाहीला समृध्द करण्याचे काम आपल्या हातून निश्चितपणे होईल. सहकार क्षेत्रात आपण अत्यंत चांगले कार्य केले आहे. सातारा जिल्हा सहकारी बँकेचे संचालक म्हणून आपण काम केले आहे. फलटण एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष, आयएलएस महाविद्यालय, सिम्बॉयसिस विधी महाविद्यालय येथे प्राध्यापक म्हणून आपण काम केले आहे. आपण सर्वांचे अतिशय जवळचे आहात. माननीय संसदीय कार्यमंत्री व आपली

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस...

मैत्री महाविद्यालयापासून असल्यामुळे या सभागृहाला त्याचा लाभ होईल अशी मला अपेक्षा आहे. या निमित्ताने मी एवढेच सांगू इच्छितो की, सभागृहाची उच्च परंपरा आहे, माननीय उप सभापती यांनी त्या गोष्टींचा उल्लेख केला आहे. या सभागृहात सभापती म्हणून काम केलेल्या सदस्यांनी या देशात व राज्यात लोकशाहीला समृध्द करणारे अनेक निर्णय घेतले आहेत, अत्युच्च अशी कामे त्यांनी केली आहेत. आपल्या कारकीर्दीत तशाच प्रकारचे काम होईल. लोकशाहीला समृध्द करण्याकरिता आपण तसेच निर्णय द्याल. महाराष्ट्र राज्याला पुढे नेण्याकरिता जे कायदे या सभागृहात आपल्या मार्गदर्शनाखाली पारित होतील ते अतिशय चांगले होतील. असा विश्वास मी व्यक्त करतो, आपणाला मनपूर्वक शुभेच्छा देतो. आज महाराष्ट्र विधानपरिषदेच्या इतिहासात एक नवीन पान आपल्या निमित्ताने जोडले गेले आहे, त्या पानावर उज्ज्वल इतिहास लिहिला जाईल अशा प्रकारची अपेक्षा व्यक्त करुन पुन्हा आपले अभिनंदन करतो व माझे भाषण संपवितो.

---------

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे (महसूल मंत्री) : सभापती महोदय, विधानपरिषदेच्या सार्वभौम सभागृहाचे सभापती म्हणून आपली निवड एकमताने झाली त्याबाबत मी आपले मनापासून अभिनंदन करतो. आपला जीवनपट पाहिला तर फलटण येथील राजघराण्यात आपला जन्म झालेला आहे. मोठ्या राजघराण्यात जन्माला आले असून सर्व साधारणपणे जीवन जगणारे व साधेपणाने राहणारी व्यक्ती अशी आपली ओळख आहे. एखाद्या कालखंडात संस्थानिकाच्या घरात जन्म घेणे व नंतर लोकशाही पध्दतीने राजकीय जीवनात वावरणे अत्यंत अवघड असते. असे जीवन आपण स्वीकारले आहे. सर्व सामान्य गोरगरिबांच्या सुख-दु:खात व वेदनांमध्ये सहभागी होऊन त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. फर्ग्युसन कॉलेजमध्ये आपले शिक्षण झाले आहे. आपण एलएलएम केल्यानंतर प्राध्यापक व प्रिन्सिपल म्हणून फलटण येथील कॉलेजमध्ये नोकरी केली. राजकीय जीवनात काम करीत असताना विविध सहकारी संस्थांशी आपला संबंध आला, अनेक शैक्षणिक संस्थांशी संबंध आला. काही नवीन शैक्षणिक संस्था आपण स्थापन केल्या आहेत. त्या भागात शिक्षणाचा विस्तार करुन तो भाग मजबूत करण्याचे काम आपण केले आहे. विधानसभेत आपण गेल्या कित्येक वर्षापासून काम करीत होता. आता विधानपरिषदेमध्ये काम करीत आहात. विधानसभेतील आपले काम अत्यंत उत्कृष्ट होते. अतिशय संयमी व शांत नेता म्हणून आपली ओळख आहे. या व्यक्तिमत्वाचा लाभ या सभागृहातील समस्या सोडविण्यासाठी सर्वांना होईल.

या नंतर श्री.बोरले..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे............

सभागृहात अनेक वेळा तणावाचे प्रसंग निर्माण होतात आणि त्यावेळी माननीय सभापतींची भूमिका अत्यंत महत्वाची असते. सभागृहातील तणावाचे वातावरण निवळण्यासाठी आणि सभागृहाचे कामकाज योग्य रितीने चालविण्यासाठी आपल्या मार्गदर्शनाचा सभागृहाला उपयोग होईल आणि पुढील कालखंडात आपल्या मार्गदर्शनाखाली सभागृहाचे कामकाज होईल.

सभापती महोदय, आपण कृष्णा खोरे विकास महामंडळाचे उपाध्यक्ष असताना देखील आपल्या भागाला कृष्णेचे पाणी मिळाले पाहिजे किंवा ते प्रकल्प पूर्ण झाले पाहिजेत या दृष्टीकोनातून आपण केलेली धडपड आणि तळमळ मी स्वतः अनुभवलेली आहे. त्याच बरोबर आपल्या भागातील जो बॅकलॉग आहे, मग पाणी वाटपाच्या संदर्भातील प्रश्न असेल किंवा बॅकलॉगच्या संदर्भातील प्रश्न असेल. मागील कालखंडात ज्या ज्या वेळी असे विषय सभागृहात चर्चेला आले किंवा शासनाच्या माध्यमातून निर्णय घेतले गेले त्या निर्णयाच्या माध्यमातून आपल्या विभागावर अन्याय होता कामा नये, पाणी वाटपाच्या संदर्भात अन्याय होता कामा नये, यासाठी आपण त्या कालखंडात वेगवेगळ्या बैठका घेतल्या. मी स्वतः आपल्या समवेत बॅकलॉगच्या संदर्भातील अनेक बैठकांना उपस्थित होतो. राज्यातील गोरगरीब माणसांचे अधिक हित झाले पाहिजे, आपल्या विभागातील सिंचनाचे क्षेत्र वाढले पाहिजे, यासाठी आपण सातत्याने आग्रह धरला. सिंचनाच्या संदर्भात आपला गाढा अभ्यास आहे. मी पाटबंधारे मंत्री असताना मला देखील आपल्या मार्गदर्शनाचा लाभ झाला. सिंचनाच्या संदर्भात संपूर्ण राज्यात पाणी वाटपाच्या संदर्भातील जे तंटे आहेत, मग कृष्णा लवादाचा तंटा असेल किंवा अन्य ठिकाणचे आंध्र आणि नांदेडच्या संदर्भातील तंटे असतील. महाराष्ट्राच्या वाट्याला जे पाणी मिळाले त्या संदर्भात आपली भूमिका आणि मार्गदर्शनाचा आम्हाला आणि राज्याला देखील त्या कालखंडात लाभ झालेला आहे. आपण या सभागृहाच्या सर्वोच्च व्यासपीठावर विराजमान झालेला आहात, आपली सभापतीपदी निवड झालेली आहे, याचा आम्हा सर्वांनाच आनंद आहे. मी मनापासून आपले अभिनंदन करतो आणि यापुढे आपल्या मार्गदर्शनानुसार सभागृहाचे कामकाज शांततेने, संयमाने आणि अधिक चांगल्या रितीने चालेल, अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

--------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, सर्वानुमते आपली या सभागहाच्या सभापतीपदी निवड झाल्याबद्दल मी सर्वप्रथम आपले मनापासून अभिनंदन करतो आणि सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांचे देखील आभार मानतो.

सभापती महोदय, अनेक वर्षे आपले राजकीय, सामाजिक, क्रीडा आणि शैक्षणिक क्षेत्रात योगदोन राहिलेले आहे. सभापती महोदय, तसे बघितले तर आपण राज घराण्यातील राजे आहात. आपण अनेक वर्षे रयतेच्या कल्याणासाठी, आपल्या भागातील जनतेच्या हितासाठी निर्णय घेतले. आपल्याला लोकशाहीमध्ये ज्या ज्या वेळी वेगवेगळ्या पदांवर काम करण्याची संधी मिळाली त्या त्या वेळी आपण त्या पदाच्या माध्यमातून सर्वसामान्य जनतेला न्याय देण्याचा प्रयत्न केला. आपल्याला कॉलेज जीवनापासून क्रीडा, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करण्याची इच्छा होती. आपण राज्याच्या मंत्रिमंडळात काम केलेले आहे. आपण कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या पदावर देखील काम केलेले आहे. आपण सहकार क्षेत्रात चांगले काम करुन सातारा बँकेला नावलौकिक मिळवून दिला, ती बँक नावारुपाला आणली.

सभापती महोदय, आपण या सर्वोच्च सभागृहाच्या सभापतीपदी विराजमान झालेला आहात, याचा आम्हाला अभिमान आहे. हे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरु झाल्यापासून सभापतीपदी आपली निवड कधी होते, याबद्दल आमच्या मनात उत्कंठा होती आणि आमच्या मनात ती उत्कंठा असताना आपण आमच्या पाठीमागे होता. त्यामुळे वडिलधाऱ्यांचा आधार आमच्या मागे आहे, अशी भूमिका आम्हाला नेहमी वाटायची आणि आता आपल्या मार्गदर्शनाखाली या सभागृहाचे कामकाज होणार आहे.

सभापती महोदय, ही वस्तुस्थिती आहे की, आपण ज्या खुर्चीवर विराजमान झालेला आहात त्या खुर्चीवर बसल्यानंतर आपले कोणीही मित्र नसतात आणि कोणीही शत्रू नसतात. सभागृहात सत्ताधारी पक्षाची बाजू असो किंवा विरोधी पक्षाची बाजू असो, सभागृहात निर्माण होणाऱ्या सर्व प्रसंगातून आपण समन्वयाने मार्ग काढून सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना न्याय मिळवून द्याल, अशी मी अपेक्षा करतो आणि पुन्हा एकदा आपले अभिनंदन करुन, आपल्याला शुभेच्छा देऊन माझे दोन शब्द संपवितो.

---------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, आज आपली या सर्वोच्च सभागृहाच्या सभापतीपदी एकमताने निवड झाली, त्याबद्दल सर्वप्रथम मी माझ्या पक्षाच्या वतीने, माझ्या वतीने आपले अभिनंदन करतो.

सभापती महोदय, आपण ज्यावेळी मंत्री होता त्यावेळी आपल्या बरोबर एकत्रपणे काम करण्याची संधी आम्हाला मिळाली. तत्कालीन मुख्यमंत्री स्व.विलासराव देशमुख साहेबांनी सर्व सन्माननीय सदस्यांची कामे झाली पाहिजेत या संदर्भातील जबाबदारी आपल्याकडे आणि माझ्याकडे सोपविली होती. त्यावेळी आपण बऱ्याच बैठका घेतल्या आणि चर्चा देखील केली. आपला स्वभाव, आपले नेतृत्व, आपली काम करण्याची शैली संपूर्ण महाराष्ट्राला परिचित आहे. सुस्वभावी आणि शांतताप्रिय असे आपले व्यक्तिमत्व आहे. आपल्या भागातील समस्यांवर पूर्णपणे लक्ष केंद्रित करणारे, ज्यांचा सिंचनाच्या संदर्भात गाढा अभ्यास आहे अशा प्रकारचे एक नेतृत्व म्हणून राज्यातील जनतेने सातत्याने आपल्याकडे बघितले. आपल्याकडे महसूल विभाग, जलसंधाण विभाग, कृष्णा खोरे विकास महामंडळाची जबाबदारी सोपविण्यात आली होती आणि आपण ती जबाबदारी अत्यंत तडफेने पार पाडलेली आहे. आपले सन्माननीय नेते, आदरणीय श्री.शरद पवार साहेबांनी आपल्यावर प्रत्येक वेळी विश्वास दाखविला आणि त्यांनी दाखविलेल्या विश्वासाला आपण पात्र ठरलात अशा पद्धतीने आपण काम केलेले आहे. आज आपण विधिमंडळाच्या सर्वोच्च सदनाच्या सभापतीपदी विराजमान झालेला आहात. त्यामुळे या सदनाचा निश्चितपणे सन्मान वाढणार आहे.

सभापती महोदय, सभागृहातील कामकाजाचे चित्रीकरण होणार आहे आणि सभागृहात होणारे कामकाज वेगवेगळ्या चॅनलच्या माध्यमातून राज्यातील लोकांपर्यंत पोहोचणार आहे. अलीकडे काही गोष्टींवरुन असे वाटते की, विधानसभा आणि विधानपरिषद सभागृहांमध्ये काही दुजाभाव केला जातो आहे की काय, अशी शंका आम्हा सन्माननीय सदस्यांच्या मनात येते. दोन्ही सभागृहांचा सन्मान कसा वाढेल आणि विधानसभेप्रमाणेच मंत्री व राज्यमंत्री महोदयांकडून विधान परिषदेची देखील प्रतिष्ठा राखली जाईल, अशा प्रकारची कार्यपद्धती आपल्याला घालून द्यावी लागेल. आपण नेहमी विधानपरिषदेला सर्वोच्च सभागृह असे संबोधतो. त्यामुळे या सर्वोच्च सभागृहाचा मान ठेवणे व येथील कामकाजाला प्राथमिकता देणे आणि विधानसभेप्रमाणेच या

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे.......

सभागृहातील प्रश्नांना व विविध चर्चांना उत्तरे मिळणे क्रमप्राप्त आहे. विधानसभा व विधान परिषदेमध्ये अनेक वेळा एकाच विषयावरील चर्चा होत असतात. परंतु, या सभागृहातील चर्चांना उत्तरे देण्याबाबत काही अंतर पडलेले आहे आणि ते आपल्या कार्यकाळात कसे दूर होईल हे आपण बघाल याची मला खात्री आहे. शासनाच्याही काही अडचणी असतात, हे आम्हाला मान्य आहे. परंतु, दोन्ही सभागृहांचा कसा समन्वय साधावा हे देखील पाहिले गेले पाहिजे. आपणही मंत्री म्हणून काम केलेले आहे. त्यामुळे दोन्ही सभागृहांच्या कामकाजासाठी कशा पद्धतीने विभागणी करुन दोन्ही सभागृहातील कामकाजासाठी मंत्री महोदय उपस्थित राहतील हे देखील भविष्यात बघितले गेले पाहिजे. या माध्यमातून निश्चितच या सभागृहाची प्रतिष्ठा राखली जाईल व तशा पद्धतीचे प्रयत्न आपल्याकडून होतील याची आम्हा सर्वांना खात्री आहे.

यानंतर श्री.भोगले......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे......

स्व.वि.स.पागे, प्रा.ना.स.फरांदे, जयवंतराव टिळक, शिवाजीराव देशमुख यांच्यापर्यंत या सदनाचा सन्मान वाढविण्याचे काम झालेले आहे. आपल्याला प्रदीर्घ प्रशासकीय कामाचा अनुभव आहे. विधानसभेचा सदस्य या नात्याने आपण सभागृहामध्ये प्रभावीपणे मुद्दे मांडले आहेत. त्या माध्यमातून या सदनाचे कामकाज प्रभावीपणे होईल असा आम्हाला विश्वास वाटतो. या सभागृहाचे कामकाज वाहिन्यांवरून लाईव्ह दाखविण्यास सुरूवात झालेली आहे. त्या माध्यमातून सदनाच्या कामकाजाची माहिती जनतेपर्यंत पोहोचावी या दृष्टीने आपल्याला विचार करावा लागेल. विरोधी पक्षनेते किंवा विरोधी पक्षाचे गटनेते, ज्येष्ठ सन्माननीय सदस्य या सर्वांना न्याय देण्याच्या दृष्टीकोनातून आपली निश्चित जबाबदारी आहे. एकूणच या सदनाच्या सर्वोच्च पदावर विराजमान होणारे सभापती हे कोणच्या पक्षाचे नसतात, ते सर्वांचेच असतात. या सदनामधील प्रत्येक सन्माननीय सदस्याला न्याय मिळाला पाहिजे आणि ते काम आपल्याकडून होईल याची मनापासून खात्री आहे.

सभापती महोदय, या सदनाची प्रतिष्ठा, परंपरा आपण निश्चितपणे वाढविणार आहात. लोकशाही मजबूत करण्याच्या दृष्टीने या सदनाचा उपयोग महत्वाचा आहे. त्याला आणखी मजबुती आपल्याकडून मिळेल असा आम्हाला विश्वास वाटतो. पुन्हा आपले मनापासून अभिनंदन करतो, आपल्याला शुभेच्छा देतो आणि माझे दोन शब्द पूर्ण करतो.

------

...2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, महाडच्या क्रांती दिनाच्या दिवशी राज्याच्या कायदे मंडळातील वरिष्ठ सभागृहाच्या अत्युच्च पदावर सर्वसंमतीने, एकमताने राजे साहेब आपली निवड झाली याचा आम्हाला मनापासून आनंद होत आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी अत्यंत सुंदर शब्दात वर्णन केले. खूप उदार असे चित्र या ठिकाणी दिसून आले. आपल्या सभागृहाचा जो सुंदर लौकिक आणि परंपरा आहे या सर्वश्रेष्ठ खुर्चीवर विराजमान होणा-या व्यक्तीची बिनविरोध निवड झाली पाहिजे. "हयात लेकर चलो, कायनात लेकर चलो, चलो तो सारे जमाने को साथ लेकर चलो." अशा पध्दतीची असली पाहिजे. हेच तर सौंदर्य आहे. Decision out of discussion हे लोकशाहीचे सौंदर्य आहे. हे सौंदर्य आणखी जास्त पुलकित कसे होईल, तेजस्वी कसे होईल या दृष्टीने आपण प्रयत्न करणार याबद्दल यत्किंचितही शंका नाही. माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे, माननीय सभागृह नेते श्री.एकनाथराव खडसे व माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांनी महत्वपूर्ण गोष्टीचा उल्लेख केला. या सभागृहाची परंपरा माननीय वि.स.पागे ते माननीय शिवाजीराव देशमुख यांच्यापर्यंतची आहे. या परंपरेच्या धारेमध्ये आपण आहात.

उच्च विद्या विभूषित, एलएल.एम.चे शिक्षण पूर्ण केलेले प्राध्यापक आहात. मीही प्राध्यापक आहे. या सभागृहात इतरही प्राध्यापक असतील. निश्चितपणे प्राध्यापक म्हणून काम केलेले असल्यामुळे विद्यार्थ्यांना कसे सांभाळायचे याचा आपल्याला चांगला अनुभव आहे. एखादा नाठाळ विद्यार्थी असेल त्यांना देखील आपण सांभाळून घ्यावे असे मला वाटते. राजघराण्यातून आलेले, राजमहालातून आलेली व्यक्ती लोकशाहीच्या मंदिरातील सर्वोच्च पदावर विराजमान होणे ही साधी गोष्ट नाही, हे आपण करुन दाखविले. महाडच्या चवदार तळ्याच्या पाण्याला बाबासाहेबांच्या स्पर्शाने आग लागली. देशातील कोट्यवधी शोषितांच्या, वंचितांच्या अंत:करणामध्ये स्वाभिमानासह ज्वालामुखी भडकला. त्या पवित्र दिनी आपण सभापतींच्या आसनावर विराजमान झालेले आहात. राजे साहेब मी एक कबिराचा दोहा सांगतो. कबिर खड़ा बाजार में, पसारे अपना हाथ, ना किसी से दोस्ती, ना किसी से प्यार. आपण एका पक्षामध्ये होता. अगदी दलदलीमधून कमळ वर येते. हे कमळ भारतीय जनता पक्षाचे नाही. हे तथागताचे कमळ आहे. ज्याप्रमाणे त्या दलदलीतून कमळ बाहेर येते पण अंगाला चिखल लागू देत नाही. तसे आपण या पक्षाच्या दलदलीतून बाहेर निघालात. या महाराष्ट्राचा लौकिक देशभर वाढेल अशा प्रकारची कर्तबगारी आपल्याकडून

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

निश्चितपणे घडेल असा मला विश्वास वाटतो. पुन्हा एकदा अंतःकरणापासून शुभेच्छा देतो आणि उज्ज्वल भवितव्य लाभो अशी मनोकामना व्यक्त करतो. धन्यवाद. --------- ...3..



श्री.दिवाकर रावते (परिवहन मंत्री) : सभापती महोदय, महाराष्ट्राच्या अत्युच्च सभागृहातील सर्वोच्च पदावर आपण विराजमान झाल्याबद्दल मी आणि माझ्या पक्षाच्या सर्व सहकाऱ्याच्या वतीने आपले मनःपूर्वक अभिनंदन करतो.

सभापती महोदय, या सदनामध्ये सभापती पदावर विराजमान झाल्यानंतर सन्माननीय सदस्यांचा सन्मानाने उल्लेख करता त्याच प्रथा परंपरेची आठवण देतो. या आसनावरील आपली जबाबदारी सांगण्याची आपली पध्दत आहे. ती सर्वांनी सांगून झालेली आहे. त्यामुळे माननीस वि.स.पागे, माननीय जयंतराव टिळक यांच्यापासून माननीय प्रा.ना.स.फरांदेप्रमाणे आपल्याला डोक्यावर किती मोठा भार सांभाळून पुढे जायचे आहे याची आठवण करुन देत देत या सदनाच्या सन्माननीय सदस्यांच्या माध्यमातून या सभागृहाचे कामकाज महाराष्ट्राला जाणवले पाहिजे ही भूमिका आपल्याला यापुढे बजावायची आहे असे या माध्यमातून आम्ही अपेक्षा व्यक्त करीत आहोत.

आपला फलटण हा मतदारसंघ आहे. माननीय सदस्य प्रा.कवाडे यांनी महाडच्या चवदार तळ्याचा उल्लेख केला. महाडच्या चवदार तळ्याच्या क्रांती दिनाच्या दिवशीच आपण सभापतीपदी विराजमान झालेले आहात. संदर्भ असा की, बाबासाहेब आंबेडकरांच्या घटनेतून दलितांना आरक्षण मिळाले. त्या समाजाला निवडणुकीच्या माध्यमातून सन्मान मिळाला. त्यातून आपला फलटण मतदारसंघ राखीव झाला. तो मतदारसंघ आरक्षित झाल्यामुळे आपण या सदनामध्ये सदस्य म्हणून आल्यामुळेच या आसनापर्यंत वाटचाल पूर्ण झाली. अन्यथा आमच्या सदनामध्ये आम्हाला ते भाग्य बघण्याची संधी लाभली नसती. कारण मतदारसंघ आरक्षित झाला. मी तो मतदारसंघ पाहिला आहे. सर्वसामान्य जनतेच्या मनामध्ये आपल्याबद्दल आदराची भावना दिसून आली. राज घराण्यामुळे आपल्याबद्दलचा आदब आम्ही पहात होतो. फलटण हा एकमेव असा मतदारसंघ आहे. नेते भरपूर आहेत, उच्चीचे सन्माननीय नेते आहेत, चांगली कामगीरी करणारे नेते आहेत. परंतु आपल्या एकमेव मतदारसंघामध्ये आम्हाला असे जाणवले की, एकही हॉटेल असे नाही तेथे आपले छायाचित्र सन्मानाने लावलेले नाही. असा आदर व्यक्त होताना मी इतर ठिकाणी पाहिले नाही.

नंतर के..1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिवाकर रावते...

मतदार संघामध्ये प्रत्येकाची पकड असते. व्यापारी केंद्रामध्ये सुद्धा श्री.रामराजे निंबाळकर यांचा फोटो लावणे हे भूषण मानले जाते. हे आपण आपल्या कर्तृत्त्वाने, स्वभावाने व राज घराण्याच्या आदराने मिळविलेले आहे. अशी व्यक्ती आज सभापतीपदी विराजमान झालेली आम्ही पाहात आहोत. आज महाराष्ट्रामध्ये मी कॅबिनेट मंत्री आहे असे आवर्जून सांगितले जाते. कॅबिनेट मंत्री हा नसतो. तो मंत्रीच असतो. मंत्रिमंडळाच्या बैठकीला इंग्रजीत कॅबिनेट मिटींग असे म्हणतात. त्यावरून कॅबिनेट मंत्री हा प्रघात पडला. मी कॅबिनेट मंत्री झालो अशा आशयाचे एका मंत्र्यांचे पत्र मला आले होते. खरे म्हणजे त्यांच्या पी.एस.ला कळले पाहिजे. अशा प्रकारचे शब्द वापरण्याची पद्धत नाही. ...(अडथळा)...

सभापती महोदय, मंत्री हा संपूर्ण महाराष्ट्राचा असतो. पण आपण एकमेव असे मंत्री होता की, आपल्याकडे कृष्णा खोरे महामंडळाचा भार होता. मला आपण आमचे वाटायचा कारण मराठवाडा भाग आपल्याकडे यायचा. मराठवाड्याच्या वाट्याला येणारे 51 टीएमसी पाणी 21 टीएमसी पर्यंत आणले. आपण आमचे पाणी कमी केले ते भांडण वेगळे आहे. आपल्याकडे सदर महामंडळ असल्यामुळे बीड, धाराशीव, लातूरमध्ये याल असे वाटले होते. आपण आमच्या भागात आलाही असाल पण मला कधी ते जाणवले नाही. मराठवाड्यातील दुष्काळी भागाला आधार देणारे कृष्णा खोरे महामंडळ हे आपल्याकडे होते. आता तसे मंत्री पद ठेवलेले नाही. आपण फक्त तीनच जिल्ह्यांचे मंत्री होता. आपण त्यासंबंधी कधीही नाराजी दाखविली नाही. कृष्णा खोरे महामंडळ उभारण्यामध्ये आपले योगदान होते. त्याला सन्मान मिळावा म्हणून आपल्याला मंत्री केले असेल असा आमचा समज होता. पण आपल्या कारकिर्दीमध्ये कृष्णा खोरे महामंडळ वृद्धिंगत झाले नाही. आपल्याच कारकिर्दीमध्ये आंतरराज्य पाणी लवादाचा निर्णय झाला. त्या अनुसार आंध्र प्रदेश, कर्नाटक या राज्यांना आपल्या पेक्षा जास्त पाण्याचा वाटा गेला. आपल्याला आठवत असेल की, या सदनामध्ये मी 27 मार्च रोजी आपल्याला कमी पाणी मिळाले असल्यामुळे आपण न्याय का मागत नाही असा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावेळी दिनांक 30 मार्च रोजी माननीय मंत्री या नात्याने आपल्याला पाण्याचा हक्क मिळावा म्हणून अपील दाखल केल्याचे सांगितले होते. आता त्यासाठी

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिवाकर रावते...

सन्माननीय मंत्री श्री.विजय शिवतारे हे प्रयत्न करतील. आपण तसे केले नसते तर आपल्या राज्यातील नद्या जोड प्रकल्पांतर्गत असलेल्या कृष्णा खोऱ्याच्या वाट्यासंबंधी झुंज देण्याकरिता काहीच राहिले नसते. महाराष्ट्रातील कृष्णा खोऱ्याला न्याय्य पाणी मिळण्यासाठी आपण जे ठामपणाने पाऊल उचलले त्याची मला आठवण येत आहे.

खंडकरी शेतकरी समितीच्या निर्णयासंबंधी काहीच गती येत नाही. आपल्या समितीने निर्णय दिलेला आहे. आपण महसूल राज्यमंत्री असताना संगणकीकरणाचा कार्यक्रम विभागामध्ये राबविला. त्यामुळेच आता आम्हाला 7/12 चा उतारा संगणकाद्वारे मिळत आहे. आपण पहिले पाऊल उचलल्यामुळे आज हे होऊ शकले आहे. हे आपल्या कारकिर्दीतील चांगले काम आहे. आपण पर्यावरणासंबंधातील कायदा निर्माण केला. आता माननीय पर्यावरण मंत्री नाहीत. आज राज्याच्या, देशाच्या आणि जगाच्या दृष्टीने पर्यावरण राखणे हे सर्वात महत्त्वाचे काम आहे. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी आपण कायदा केला आहे त्याचा येथे प्रामुख्याने उल्लेख करावासा वाटतो.

सभापती महोदय, आपण प्राध्यापक आहात आणि माननीय सदस्य श्री.जोगेंद्र कवाडे हे देखील प्राध्यापक आहेत. त्यांनी आपली प्रतिभा फुलवून अलंकारिक शब्द वापरून आपले कौतुक केले. त्यांनी आपल्या शब्दातून आपल्याला कमळाची उपमा दिली आहे. कमळाच्या मदतीशिवाय आपण त्या आसनावर जाऊच शकला नसता असे त्यांना सांगावयाचे होते की नाही हे मला माहीत नाही. पण त्या पुढचे त्यांनी जे काही म्हटले ते बरोबर नव्हते. या चिखलातून बाहेर पडून कमळ तेथे गेले असे ते म्हणाले ते बरोबर नाही. या सभागृहातील प्रत्येक माननीय सदस्य प्रगल्भ असतो. विधान सभा सभागृहातील एखादी बाब राहिली तर त्याची परिपूर्तता करण्यासाठी हे सभागृह आहे. प्रगल्भता निर्माण करणारे सदस्य या सदनात असतात अशी संपूर्ण महाराष्ट्रात चर्चा असते. ते आपल्या प्रतिभेतून महाराष्ट्राच्या विविध समस्या मांडतात. त्या समस्यांना योग्य मार्ग देऊन सन्मानित होऊन जावे अशी या सभागृहाची प्रतिष्ठा आहे. ती प्रतिष्ठा आपल्या कारकिर्दीमध्ये आणखी वृद्धिंगत होईल.. आपण ज्या माननीय सभापतींची नावे घेतो त्यांच्या मालिकेमध्ये जाऊन बसाल नव्हे त्यांच्या पेक्षा एक पाऊल पुढे टाकून आपला ठसा उमटवाल अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि पुन्हा एकदा आपल्याला शुभेच्छा देतो. जय हिंद जय महाराष्ट्र.

.....

....3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपले मन:पूर्वक अभिनंदन करण्याकरिता उभा आहे. आपली निवड बिनविरोध व्हावी असा माझा पहिल्या पासून प्रामाणिक प्रयत्न होता. तशी विनंती देखील मी अनेकांना केली होती. सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे, सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत देशपांडे या सर्वांचे मी आभार मानतो. या सभागृहाची उच्च परंपरा राखण्यामध्ये या सन्माननीय सदस्यांनी इतिहास घडविला आहे. या सन्माननीय सदस्यांनी आपले प्रस्ताव मागे घेतले नसते तर आज एक वेगळी चर्चा झाली असती. तसेच माननीय मुख्यमंत्र्यांचे देखील अभिनंदन करतो की, त्यांच्या कारकिर्दीमध्ये माननीय सभापतींची निवडणूक न होता माननीय सभापतींची बिनविरोध निवड झाली आहे.

सभापती महोदय, आपण या सदनाचे दहावे सभापती आहात. दिनांक 22 जुलै 1937 मध्ये श्री.मंगलदास यांची पहिल्यांदा सभापती म्हणून निवड झाली. सभापती पदाची सर्वात जास्त कारकिर्द माननीय श्री.जयंतराव टिळक यांना मिळाली होती. ते 18 वर्षे या सभागृहाचे सभापती होते. माननीय श्री.रा.सु.गवई हे देखील या सभागृहाचे सभापती होते. तसेच, गांधीवादी विचारसरणीचे माननीय श्री.वि.स.पागे हे देखील 1960 ते 1978 पर्यंत या सदनाचे सभापती होते.

यानंतर श्री.जुन्नरे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंत प्र.पाटील ......

ही या राज्यातील सर्वात ज्येष्ठ खुर्ची आहे. या आसनाचा आदर आणि सन्मान आपण राखाल याची मला खात्री आहे. आजपासून तुम्ही कोणत्याही एका पक्षाचे राहिला नाहीत. आज पासून पक्ष तुमच्यापासून दूर गेलेला आहे. या राज्यामध्ये आतापर्यंत जी परंपरा सुरु होती तीच परंपरा यापुढेही आपण चालवाल अशी अपेक्षा मी आपल्याकडून व्यक्त करतो. आपले निर्णय निःपक्षपातीच असतील याची मला खात्री वाटते. तुमचे आणि माझे संबंध 1995 सालापासूनचे आहेत. 1995 मध्ये आपण प्रथम विधानसभेत अपक्ष म्हणून निवडून आला होता. कृष्णा खोऱ्याची मूळ कल्पना आपलीच होती. कृष्णा खोऱ्याचे काम पुढे जात नसल्याबद्दल आपल्या मनात नेहमी खंत होती व या विषयाची खंत तुम्ही माझ्या समोर व्यक्तही केली होती.

सभापती महोदय, आता आपण या राज्यातील सर्वात ज्येष्ठ खुर्चीवर बसला आहात. या राज्यातील पाणी वाटपात व राज्यातील दुष्काळी भागांना पाणी मिळण्याच्या दृष्टीने आपण न्याय द्याल असा मला विश्वास असून खात्रीही आहे.

सभापती महोदय, सहकारामध्ये आपल्या बरोबर काम करण्याची मला संधी मिळाली होती. या देशातील ज्या अग्रगण्य बँका आहेत त्यामध्ये आपल्या सातारा बँकेचा समावेश आहे. आपल्या बँकेसारखी माझी सुध्दा बँक असावी याची स्फूर्ती मला आपल्या बँकेकडून मिळाल्यामुळे माझीही बँक आता देशातील अग्रगण्य बँक झाली आहे.

सभापती महोदय, आपला स्वभाव शांत आहे, मृदू आहे. परंतु आता आपल्याला थोडे कठोर सुध्दा वागावे लागणार आहे. आपल्या स्वभावात आपल्याला थोडा बदल करावा लागणार आहे. या खुर्चीवरुन निर्णय देतांना आपल्या निर्णयावर आपल्याला ठाम राहावे लागणार आहे व आपली भूमिका आपण योग्य प्रकारे बजवाल याची मला पूर्ण खात्री आहे. आपल्याला कायद्याचे परिपूर्ण ज्ञान असल्यामुळे यासंदर्भात जास्त बोलावे असे मला वाटत नाही. मी माझ्या पक्षाच्या वतीने आपले मनःपूर्वक अभिनंदन करतो, आपल्याला आमच्याकडून पूर्ण सहकार्य निश्चितपणे मिळेल एवढे आश्वासन देऊन मी माझे मनोगत पूर्ण करतो.

धन्यवाद.

-----------------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुनील तटकरे (विधानसभेने निवडलेले) : सन्माननीय सभापती महोदय, आपली सर्वोच्चस्थानी बिनविरोध निवड झाल्याबद्दल आपले आणि या सभागृहाचे अभिनंदन करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे. उद्या गुढी पाडवा असून गुढी पाडव्याच्या पूर्वसंध्येला या सर्वोच्च आसनावर बसण्याची संधी आपल्याला मिळाल्याबद्दल आपल्याला धन्यवाद. समाजकारणात आणि राजकारणात दीर्घकाळ वावरलेले आपले नेतृत्त्व आहे. विधानपरिषदेच्या माध्यमातून भविष्यात आम्हाला मार्गदर्शन करणार असून त्याची सुरुवात आजपासून झाल्यामुळे आम्हा सर्वांना त्याचा खरोखरी आनंद वाटत आहे. आपल्या बद्दल भावना व्यक्त करण्यापूर्वी मी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री माननीय श्री. देवेंद्र फडणवीस, या सभागृहाचे नेते माननीय श्री. एकनाथराव खडसे, शिवसेनेचे गट नेते माननीय श्री. दिवाकरजी रावते, आमच्या मित्र पक्षाचे प्रमुख तसेच आमचे सर्व माननीय गट नेते श्री.माणिकराव ठाकरे, श्री. जयंत पाटील, प्रा.कवाडे, श्री. कपिल पाटील या सर्व सहकाऱ्यांचे आणि नेत्यांचे मी मनापासून आभार मानतो. सभागृहाची सर्वोच्च पध्दतीची परंपरा राखण्यासाठी या सर्वांनी या ठिकाणी ज्या काही भावना दाखवल्या, आजपर्यंत चालत आलेली माननीय सभापतीच्या निवडीची प्रक्रिया पक्षीय मतामतांतरामध्ये कोणत्याही पध्दतीत गुरफटून जाऊ नये याची दक्षता सर्व नेत्यांनी घेतल्याबद्दल मी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या वतीने या ठिकाणी आदर व्यक्त करु इच्छितो.

सभापती महोदय, फलटण-साताऱ्याच्या परिसरात जन्माला आलेले आपले नेतृत्त्व, ज्या परिसराने हिंदवी स्वराज्याची स्थापना केल्यापासून भरीव असे योगदान केले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कालखंडात यवनांशी लढत असताना बारा मावळयाना बरोबर घेऊन हिंदवी स्वराज्याच्या उभारणीसाठी सातारा-फलटण परिसराचे खूप मोठे योगदान राहिले आहे. स्वातंत्र्य चळवळीमध्ये सुध्दा या परिसराचे खूप मोठे योगदान राहिलेले आहे. सामाजिक चळवळीची सुध्दा सारी केंद्रे या परिसरातच राहिलेली आहेत. महाराष्ट्राला दिशा देणारे नेतृत्त्व स्व.यशवंतराव चव्हाण या परिसरातच जन्माला आले होते. अशा थोर परिसरात जन्माला येण्याचे भाग्य आपल्याला मिळाले आहे. आपण फलटणच्या परिसरात जन्म घेतल्यानंतर आपल्याला राजघराण्याचा वारसा मिळाला. आपण पुणे येथील फर्ग्यूसन कॉलेजमध्ये कायद्याचे शिक्षण घेतले त्यावेळेस आमचे मंत्री महोदय श्री. गिरीष बापट सुध्दा त्याच कॉलेजमध्ये आपल्या बरोबर शिक्षण घेत होते. शिक्षणाची परंपरा असलेल्या पुण्य नगरीत आपण शिक्षण घेतले असून त्या पुण्य नगरीच्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुनील तटकरे ........

विचारांचा प्रभाव संस्कृतंपणे आपल्या मनावर पध्दतशीरपणे झाला व 1995 मध्ये आपण विधानसभेत पहिल्यांदा निर्वाचित झाला. काही गोष्टी माणसाच्या जीवनात अशा घडत असतात की, ज्या पक्षाच्या माध्यमातून आपण काम करीत आला त्या पक्षाच्या माध्यमातून आपल्याला त्यावेळी उमेदवारी मिळाली नाही. परंतु तरी सुध्दा फलटणच्या परिसरातील जनसामान्यांच्या मनातील ज्या भावना होत्या व त्याचे प्रतिबिंब म्हणून त्यावेळेस अपक्ष म्हणून आपण पहिल्यांदा निर्वाचित झाला. त्या काळात सुध्दा त्या परिसराचे प्रश्न मोठे होते. कृष्णा लवादाच्या वाटपाचा निर्णय झाल्यानंतर त्या परिसरातील असलेले हक्काचे पाणी अडवले गेले पाहिजे अशी भूमिका आपण त्यावेळी घेतली. मी सुध्दा विधानसभेत 1995 मध्ये पहिल्यांदा निवडून आलो होतो. त्यावेळेस अपक्ष या नात्याने पलीकडे आपण बसत होता. कृष्णा खोऱ्यातील साऱ्या आमदारांना बरोबर घेऊन युती शासनामध्ये आपण प्रभावीपणे भूमिका मांडली. त्यावेळच्या युती शासनाचेही आम्ही वेळोवेळी अभिनंदन केले होते. कृष्णा खोरे महामंडळाची स्थापना करण्यामध्ये जसा आपला वाटा होता तसाच वाटा युती शासनाचा सुध्दा होता. वेगवेगळे मतप्रवाह, वेगवेगळे वादविवाद, वेगवेगळी मतमतांतरे, आपापल्या पक्षाबद्दलच्या भावना प्रत्येकाच्या मनामध्ये राहू शकतील परंतु ज्यावेळेस निकोप लोकशाहीच्या माध्यमातून सर्वोच्च पदावर एका निष्कलंक नेत्याची बिनविरोध निवड करण्यामध्ये सर्व पक्षाच्या नेत्यांनी दखल घेतल्यामुळे त्या सर्वांचा आदरपूर्वक उल्लेख करणे मी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा प्रमुख म्हणून करणे क्रमप्राप्त ठरत आहे.

आपण बालपणात शिक्षण घेत असतांना क्रिकेट खेळत आलात, त्यामुळे चेंडू कसा परतावयाचा, चेंडू कसा टाकावयाचा, क्षेत्ररक्षण अचूक कसे करावयाचे, अचूक फेक कशी करावयाची याचे सर्वंकष ज्ञान आपल्याला त्यावेळी मिळाले. या सर्व गोष्टीचा फायदा आपल्याला उत्तम पध्दतीने झाला आहे. तुम्ही कोणाला झेलबाद केले असे मी कोणाला म्हणणार नाही, तुम्ही कोणाला यष्टिचित केले असे देखील मी म्हणणार नाही, अचूक फेकीने तुम्ही कोणाला धाव बाद केले असे देखील मी म्हणणार नाही किंवा कोणाच्या फसलेल्या चेंडूवर तुम्ही षट्कार मारला असे देखील मी म्हणणार नाही. परंतु तुमच्या रुपाने एक अष्टपैलू नेतृत्त्व महाराष्ट्राच्या सर्वोच्च स्थानावर बसल्याबद्दल आम्हा सर्वांना अभिमान आहे.

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुनील तटकरे ........

सभापती महोदय, आपल्याला माननीय श्री. शरद पवार साहेबांचा परिसस्पर्श लाभलेला आहे. माझ्यात आणि आपल्यात अनेक गोष्टीचे साम्य आहे. आपण 1995 साली विधानसभेत निर्वाचित झालात, मी सुध्दा 1995 साली विधानसभेत निर्वाचित झालो. आपण फर्ग्यूसनचे माजी विद्यार्थी आहात, मी सुध्दा एक वर्षासाठी का होईना फर्ग्यूसनचा विद्यार्थी राहिलो आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी मंत्री महोदय श्री. दिवाकर रावते यांनी उल्लेख केल्या प्रमाणे 2009 मध्ये लोकसभेच्या मतदारसंघाच्या पुनर्रचना झाल्या आणि आपला फलटण मतदारसंघ राखीव झाला. माझा माणगाव मतदारसंघ 4 विधानसभेत विभागला गेला. सतत चार वेळा निवडून आलेले माननीय श्री. रामराजे निंबाळकर व सतत चार वेळा निवडून आलेलो मी आमचे आमच्या मतदारसंघात काय होईल याची पहिली चिंता कोणाला पडली असेल तर ती या देशाचे नेते माननीय श्री.शरद पवार साहेबांना पडली होती. त्यांनी पहिल्यांदा आपल्याला फोन केला व आपले बोलणे संपल्यानंतर त्यांनी मलाही फोन केला आणि सांगितले की, तुमच्या दोघांचेही मतदारसंघ पूर्णपणे बदलले आहेत. परंतु तुम्ही कामाची माणसे आहात, तुम्हाला पुढे अखंडपणाने काम करावयाचे आहे, असा दिलासा आपल्यालाही माननीय श्री. पवार साहेबांच्या माध्यमातून मिळाला आणि मलाही मिळाला, याचा मी या ठिकाणी कृतज्ञतापूर्वक आवर्जून उल्लेख करु इच्छितो. मतदारसंघ राखीव झाल्यानंतर आपल्या राजकीय भवितव्याचे काय असा प्रश्न तुमच्याही आणि माझ्याही मनात उद्‌भवला. डिलिमिटेशन कमिटीपुढे जात असताना आपल्या मतदारसंघाच्या बाबतीत कसे करावे हे तुमच्यापासून माझ्या सारख्या कार्यर्त्यांना शिकता आले.

यानंतर श्री. अजित.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे....

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये डिलिमिटेशनच्या अध्यक्षांसमोर सुनावणी झाली होती त्यावेळी आपल्यासारख्या कार्यकर्त्याकडून युक्तीवाद करण्यासाठी मला मुद्दे मिळाले होते. त्यानंतर आपण विधानसभेवर निर्वाचित झालात. माझा मतदारसंघ बदलल्यामुळे मी श्रीवर्धन मतदारसंघातून निर्वाचित झालो. आपला मतदारसंघ राखीव झाला नसता तर आपली इच्छा असेपर्यंत आणि पक्ष नेतृत्त्वाची इच्छा असेपर्यंत आपण विधानसभेवर निवडून आला असता, याबद्दल कोणाच्याही मनात संदेह असण्याचे काही कारण नाही.

आज आपली विधानपरिषदेच्या सर्वोच्च पदी निवड झालेली आहे. या ठिकाणी सर जे म्हणाले त्यांच्या बोलण्याचा मतितार्थ वेगळा होता. पण त्याचा अर्थ आपणास थोडा वेगळा वाटला, पण तो खऱ्या अर्थाने वेगळा होता. दलदलीतून कमळ फुलते हा निसर्गाचा नियम आपणास नाकारुन चालणार नाही. आपणास अनेकवेळा वाटते की, अथांग सागरातून काही तरी विचारमंथन होऊन काही तरी वेगळी भूमिका होऊ शकते, पण याचा अर्थ असा नव्हे, तो निसर्ग आहे. निसर्गातून एखादी गोष्ट फुलत असते त्यावेळी एखादे नेतृत्व मोठ्या प्रमाणावर विकसित होत असते जसे कमळ फुलले तसे कोणी कोणाला बाण मारला याचा उल्लेख न होण्याची खबरदारी घेऊन आपण सर्वजण काम करण्याचा प्रयत्न करु या एवढेच मी या निमित्ताने सांगतो.

सभापती महोदय, मी आपले अभिनंदन करतोच. या सर्वोच्च पदावरुन माननीय वि.स.पागे, माननीय जयंतराव टिळक, माननीय रा.सू.गवई, प्रा.ना.स.फरांदे, आदरणीय श्री.शिवाजीराव देशमुख यांनी या आसनावरुन सर्वांगीण पद्धतीची विचारधारा, लोकशाही अधिक मजबूत करण्याची भूमिका घेतली. भविष्यात आपल्याकडून देखील त्याच विचारांची परंपरा अतिशय उत्तम पद्धतीने पुलकीत होईल अशा प्रकारच्या भावना या निमित्ताने व्यक्त करतो.

सभापती महोदय, आपले पुनश्च एकदा अभिनंदन करीत असताना अशी अपेक्षा व्यक्त करतो की, महाराष्ट्रातील वेगवेगळे प्रश्न सोडविण्याचे काम करीत असताना आपल्याकडून नि:पक्षपातीपणे सर्वांना न्याय मिळेल. आजपासून आपण आमच्यापासून वेगळे झालात आणि आपण आमच्यापासून वेगळ्या स्थानावर गेला आहात. आपण लौकिक अर्थाने एकमेकांचे सहकारी आहोत याच भावनेतून या सभागृहाची वैचारिक उंची अधिक उंच करण्याचा प्रयत्न सर्वजण मिळून करु या

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे....

अशा भावना व्यक्त करतो. पुन्हा एकदा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने सर्व राजकीय पक्षांच्या नेत्यांचे मन:पूर्वक शब्दात अभिनंदन करतो. काल काय घडले ती कटुता विसरुन जाऊन पुन्हा एकदा नवा इतिहास घडविण्याचे काम आपण सर्वजण मिळून करु या, असे भावनापूर्वक आवाहन करुन येथेच थांबतो. जय हिंद ! जय महाराष्ट्र !

-----------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गिरीष बापट (संसदीय कार्य मंत्री ) : सभापती महोदय, आपली सभापतीपदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल मी आपले अभिनंदन करतो. माननीय श्री.रामराजे नाईक-निंबाळकर आणि मी महाविद्यालयीन जीवनापासूनचे मित्र आहोत. त्यावेळी ते सक्रीय राजकारणात नव्हते आणि मी देखील सक्रीय राजकारणात नव्हतो. ते फर्ग्युसन कॉलेजचे नेतृत्व करीत होते आणि मी बीएमसीचे नेतृत्व करीत होतो. आम्ही गुडलक-रुपाली-वैशाली येथे एकत्र जमत होतो. त्यावेळी आम्ही काय काय करीत होतो ते आता सांगत नाही. आपल्या भावी आयुष्यात आपल्याला काय करता येईल याबाबत चर्चा करीत असू. आमच्या समोरुन लाल दिव्याची गाडी गेली की, मी रामभाऊंना म्हणायचो, "आपल्याला या लाल दिव्याच्या गाडीत बसायला मिळणार की नाही ?" त्यावर ते मला म्हणायचे, "मला काही माहीत नाही, पण मला फलटणला जावे लागणार आहे." महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केल्यानंतर ते फलटणला गेले. आमच्या रुपाली-वैशालीमध्ये काय चर्चा झाल्या त्या मी येथे सांगत नाही.

सभापती महोदय, आपणास ज्या चांगल्या सवयी होत्या त्याचा मी येथे उल्लेख करतो. अनेकांना अनेक सवयी असतात त्याचा मी येथे उल्लेख करीत नाही. आपणास अभ्यासाची आणि वाचनाची खूप आवड होती. ते ब्रिटीश लायब्ररीतून पुस्तके आणून वाचन करायचे. आम्ही त्यांना म्हणायचो की, आपण वाचता की वाचत नाही. त्यावर ते म्हणायचे, "मी खूप वाचन करतो." क्रिकेट खेळून झाल्यावर रात्री अभ्यास आणि पुस्तक वाचन असा त्यांचा दिनक्रम असायचा. आम्हाला काही गोष्टी कळल्या नाही तर त्यांना विचारत होतो. आपण वाचलेले आम्ही लोकांना सांगत होतो. आपल्या वाचनाचा फायदा आपणास आणि आम्हाला त्या काळात झाला होता. माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते यांना सांगू इच्छितो की, आमची कॉपी पकडली गेली नाही. कॉपी करुन पास होणे ही देखील एक कला आहे.

सन 1974-75 नंतर श्री.रामराजे फलटणला गेले आणि मी नाशिकच्या कारागृहात गेलो. नंतर आमची बरीच वर्षे भेट झाली नाही. त्यानंतर ते निवडून आल्यावर आमची भेट झाली. श्री.रामराजे पुण्यात होते तेव्हा त्यांना कोणी "राजे" म्हणत नसत. ते राम निंबाळकर या नावाने प्रसिद्ध होते. आम्ही वर्तमानपत्रात रामराजे निंबाळकर यांच्या विषयी वाचत होतो. परंतु आम्ही

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गिरीष बापट...

समजतो होतो की, ते आमचे राम निंबाळकर नाहीत. हे दुसरेच कोणीतरी राजे आहेत.

विधानसभेमध्ये आपली भेट झाली त्यावेळी मी त्यांना विचारले आपण येथे कुठे ? त्यांनी मला सांगितले, मी विधानसभेवर निवडून आलो आहे आणि तू देखील निवडून आला आहेस हे मला माहिती आहे. 1995 पासून आमची पुन्हा चांगली दोस्ती जमली. रुपाली-वैशाली ही हॉटेल्सची नावे आहेत. आपण उगाचच गैरसमज करु घेऊ नये. आम्ही दोघेही रुपाली-वैशालीच्या मागे लागणारे नाहीत, एवढे मी आपणास सांगतो.

सभापती महोदय, आपल्या आयुष्यात असे अनेक प्रसंग आले, ज्याची चर्चा आपण मोकळेपणाने करीत होतो. मला येथे सांगितले पाहिजे की, सातारा व पश्चिम महाराष्ट्र हा कितीही सुजलाम-सुफलाम असला तरी त्या ठिकाणी पाण्याची टंचाई आहे. माझ्या भागाला पाणी मिळाले पाहिजे अशी त्यांची आग्रही भूमिका होती. पक्षाच्या पलीकडे जाऊन मी पाण्याचा प्रश्न प्रथम सोडविणार अशी त्यांची भूमिका होती. 1995 साली 40 आमदारांचे नेतृत्व करुन त्यांनी माननीय श्री.मनोहर जोशी, माननीय श्री.गोपीनाथ मुंडे यांच्या नेतृत्वाखालील युती सरकारला पाठिंबा देण्याचा धाडसी निर्णय घेतला. त्या पाठिंब्याच्या बदल्यात मला मंत्रीपद द्या, अमुक पद द्या, तमुक पद द्या, असे काहीही मागितले नाही. त्यावेळी झालेल्या मिटींगचा मी साक्षीदार आहे. त्यांनी त्या मिटींगमध्ये सांगितले की, "मला काहीही दिले नाही तरी चालेल, पण माझ्या भागाला पाणी मिळाले पाहिजे आणि त्याकरिता या 40 आमदारांचे मी नेतृत्व करीत आहे." आपले हे वाक्य मी कधीही विसरणार नाही. आमदार पाठिंबा देत असतील तर मला मंत्री पद द्या, अमुक पद द्या अशी मागणी करीत असतात. पण आपण असे एकमेव लोकप्रतिनिधी होता की, मला काहीही मिळाले नाही तरी चालेल, पण माझ्या भागाला पाणी मिळाले पाहिजे यासाठी आग्रही होता.

सभापती महोदय, आपली कृष्णा खोरे विकास महामंडळावर नियुक्ती झाली. मी देखील त्या महामंडळावर सदस्य म्हणून होतो. माननीय मंत्री श्री.एकनाथ खडसे यांनी माझी त्या महामंडळावर सदस्य म्हणून नियुक्ती केली होती. कृष्णा खोरे प्रकल्पातील सर्व प्रकल्पांची म्हणजे



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गिरीष बापट....

चालू व बंद असलेल्या आणि पुनर्वसन प्रकल्पांची पाहणी मी आणि रामभाऊंनी एका गाडीत बसून केली. छोटे मोठे मिळून जवळपास 100 प्रकल्पाची पाहणी केली. मला येथे सांगण्यास अभिमान वाटतो की, इरिगेशनबद्दलची माहिती वाचून लक्षात आली नसती ती माहिती प्रत्यक्ष भेट देऊन कळली. मला ही सर्व माहिती आपल्यामुळे मिळाली.

सभापती महोदय, मी फार वेळ बोलत नाही. आता आपली रोज भेट होणार आहे. आपण सर्वांना समान न्याय द्याल याबद्दल माझ्या मनात यत्किंचितही शंका नाही. आपण एका अत्युच्च पदावर विराजमान झाला आहात. आपण न्यायमूर्ती रामशास्त्री प्रभुणे यांच्या भूमिकेत बसला आहात. आता ती खुर्ची कोणत्याही पक्षाची राहिलेली नाही. आपली बिनविरोध निवड झाली आहे. त्यामुळे काही प्रश्न नाही.

यानंतर श्री.बोर्डे..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गिरीष बापट....

सन्माननीय सदस्य श्री.सुनीलजी तटकरे, या निवडणुकीच्या संदर्भात पूर्वी काय नाट्य घडले हे सगळेच या ठिकाणी सांगायलाच पाहिजे असे नाही. तुम्ही, मी, सन्माननीय श्री.दिवाकर रावते साहेब, श्री.रामदास कदम साहेब, आपण काय केले हा इतिहास झाला. मी निवडणुकीच्या राजकारणात आणि पक्षीय राजकारणात जात नाही. आज सभापती पदासाठी निवडणूक होईल की काय, या बाबत वर्तमानपत्रांमध्ये बातम्या छापून आल्या होत्या. परंतु सभापती महोदय, आपल्या व्यक्तिमत्त्वासारखी व्यक्ती या पदाच्या निवडणुकीसाठी उभी राहिल्यामुळे इतरांनी आपली उमेदवारी मागे घेतली आणि ही निवडणूक बिनविरोध झाली याचे श्रेय सन्माननीय सदस्य आणि त्या पक्षाच्या नेत्यांना आहे असे म्हटले तर ते वावगे होणार नाही.

सभापती महोदय, आपला मतदारसंघ राखीव झाल्यानंतर आपल्याला विधानसभेची निवडणूक लढविता आली नाही. सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी आपला उल्लेख करताना सांगितले की, आपण माननीय श्री.शरद पवार यांचे निकटवर्तीय आहात. मला वाटते त्यांनी माननीय श्री.अजितदादा पवार यांच्या नावाचा उल्लेख केला असता तर अधिक चांगले झाले असते.

सभापती महोदय, माणसाला त्याच्या जीवनामध्ये जे मिळायचे असते तेच मिळते. परंतु मिळालेल्या संधीचे सोने कसे करता येईल, सामान्य माणसासाठी त्या संधीचा वापर कसा करता येईल किंवा ज्या ध्येयासाठी लोकांनी आपल्याला त्या ठिकाणी पाठविले आहे, त्या बाबतची पूर्तता किंवा राज्यातील जनतेला न्याय देण्याचे काम या पदावरुन निश्चितपणे करता येईल. माननीय सभापती महोदय, आपल्याला सुध्दा या पदाचा वापर लोकांना न्याय देण्यासाठी करता येईल.

सभापती महोदय, आपण, मी आणि सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे, आपण सर्वजण 1995 साली विधानसभेत निवडून आलो. तत्कालीन सभापती माननीय श्री.शिवाजीराव देशमुख यांच्यासोबत मला काम करण्याची संधी मिळाली. त्यामुळे त्यांचा सुध्दा मला नम्रपूर्वक उल्लेख करावासा वाटतो. त्यांचे व्यक्तिमत्त्व अतिशय प्रसन्न होते. ते सभापती पदावरुन कसे गेले हा भाग निराळा. परंतु त्यांनी सभापतीपदाच्या कारकिर्दीमध्ये चांगले काम केल्याबद्दल त्यांच्याप्रती आदरभाव व्यक्त करणे हे मी माझे कर्तव्य समजतो.

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गिरीष बापट....

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे आपले नशीब थोडे मागे-पुढे होत असते. तुम्ही आणि मी पुण्याला नगरसेवक असल्यापासून काम करीत होतो. पण तुमच्या बाबतीत नेमके येता येता, जाते असे अनेक वेळा होते. तो तुमचा दोष आहे, नेतृत्वाचा दोष आहे की पक्षाचा दोष आहे की, परिस्थितीचा दोष आहे हे माहीत नाही. परंतु या बाबतचा विचार आपण रात्री जेवणाच्या वेळी बसून करू परंतु एक गोष्ट खरी आहे की, जे नशिबात असेल ते मिळत राहील. माननीय श्री.शरद रणपिसे साहेब, आपल्यासाठी सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांचे प्रयत्न कमी पडले, असे मी म्हणणार नाही. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे, सन्माननीय सदस्य सर्वश्री शरद रणपिसे व श्रीकांत देशपांडे यांनी आपापली उमेदवारी मागे घेऊन या सभागृहात चांगले वातावरण निर्माण केले. त्याचा फायदा तुम्हा-आम्हाला नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्राला होईल, एवढेच मी या निमित्ताने सांगतो व माझे भाषण थांबवितो.

--------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय,सन्माननीय सदस्य श्री.रामराजे नाईक-निंबाळकर यांची सभापती पदी निवड झाल्याबद्दल मी माझ्या भावना व्यक्त करतो.

सभापती महोदय, विधानपरिषदेच्या सर्वोच्च पदी आपली एकमताने निवड झाली त्याबद्दल सुरुवातीलाच मी आपले अभिनंदन करतो. या ठिकाणी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या चवदार तळ्याच्या सत्याग्रहाबाबत उल्लेख झाला. आपल्या देशाला 1947 मध्ये स्वातंत्र्य मिळाले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी या देशाला 1950 साली राज्यघटना दिली. त्या राज्यघटनेची चौकट किती भरभक्कम आहे याचे उदाहरण आज आपल्याला पहावयास मिळाले आहे. 1947 मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताच्या आजूबाजूचे अनेक देश ब्रिटिशांच्या तक्तातून मुक्त झाले. परंतु त्या देशांमध्ये लोकशाही टिकली नाही. मग त्यामध्ये पाकिस्तान असो, अफगाणिस्तान असो किंवा बांगलादेश असो. पाकिस्तान देशाचे पंतप्रधान आपल्या देशाचा सेनापती कधी काय काय करेल याची दररोज वाट पाहत असतात. कदाचित भुट्टोंसारखी आपल्याला फाशी तर देणार नाही ना, या चिंतेत ते असतात. परंतु भारतात असे कधीही घडत नाही. मी तर म्हणेन की, संसदीय लोकशाहीमध्ये असे कधीच घडत नाही. त्यामुळे मी नम्रपूर्वक याचे श्रेय परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना देऊ इच्छितो.

सभापती महोदय, आपण ज्येष्ठ आणि अनुभवी आहात. संसदीय कामकाजाचा आपल्याला दांडगा अनुभव आहे. त्यामुळे या सभागृहाची उच्च परंपरा आपण निश्चितच पाळाल याबद्दल माझ्या मनात शंका नाही. सभापती महोदय, आपण अबोल आणि अजातशत्रू आहात. त्यामुळे या सभागृहात सुध्दा सर्व सन्माननीय सदस्यांना न्याय देण्याची भूमिका घ्याल याबद्दल माझ्या मनात तीळमात्र शंका नाही. माननीय मुख्यमंत्री म्हणाले की, सन्माननीय मंत्री श्री.गिरीष बापट यांचे माननीय सभापतींवर फार प्रेम आहे. परंतु मी सांगू इच्छितो की, माननीय सभापती जरी साताऱ्याचे असले तरी त्यांचे घर मात्र पुण्यात आहेत. ते पुणेकर आहेत याबद्दल मला त्यांचे अभिनंदन करावेसे वाटते.

सभापती महोदय, मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांना आणि सभागृहाला सांगू इच्छितो की, सन्माननीय मंत्री श्री.गिरीष बापट हे जरी भारतीय जनता पक्षात असले तरी ते आणि मी 1979 मध्ये नगरसेवक होतो. 1985 मध्ये मी विधानसभेमध्ये पहिल्यांदा प्रवेश केला. मध्यंतरीच्या

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे....

कालावधीत मी सदस्य नव्हतो. परंतु पूर्वीच्या काळात मी, सन्माननीय श्री.रामराजे नाईक-निंबाळकर आणि माननीय श्री.अजितदादा पवार डेक्कन एक्स्प्रेसने पुणे-मुंबई असा प्रवास करायचो. आम्ही कँटीनमध्ये बसून उत्तम स्नॅक्स घेत राजकीय चर्चा करायचो. परंतु नंतरच्या काळात एक्स्प्रेस वे झाल्यानंतर रेल्वेने प्रवास करणे बंद झाले. परंतु मी या निमित्ताने सांगतो की, आम्ही पुण्यातील सर्व पक्षांनी मिळून एक Saturday Club सुरु केला आहे. सर्व राजकीय पक्षाचे आमदार, खासदार, प्रमुख वर्तमानपत्राचे संपादक, आयएएस, आयपीएस अधिकारी, शहरातील उद्योगपती यांचा हा क्लब आहे. आम्ही 100-125 लोक दर महिन्याला एकत्र बसून पुणे शहराच्या विकासासाठी काय करता येईल याची चर्चा करतो. त्या ठिकाणी आम्ही कोणताही पक्षभेद ठेवत नाही. त्या क्लबमध्ये श्री.अंकुश काकडे असतील, शांतीलाल सूरतवाला असतील, माननीय मंत्री श्री.गिरीष बापट असतील. आम्ही सर्वजण त्या क्लबचे संस्थापक आहोत. ती परंपरा पाळणारे आम्ही लोक आहोत.

सभापती महोदय, आपण उच्च विद्याविभूषित आहात. तसेच आपणास विज्ञान व तंत्रज्ञानाबद्दल आवड आहे. मी सभागृहाला एक घटना सांगतो. मी पूर्वी रेल्वेने प्रवास करीत असताना टेलिफोन डायरी लिहायचो. मला माननीय श्री.रामराजे नाईक-निंबाळकर म्हणायचे की, तुम्ही आता पेनाने डायरी लिहायचे सोडून द्या. त्यांनी मला एका इलेक्ट्रॉनिक दुकानाचे नाव सांगितले आणि म्हटले की, तेथून इलेक्ट्रॉनिक टेलिफोन डायरी घेऊन या. मी ती डायरी आणल्यानंतर त्यांनी त्यामध्ये माहिती कशी फिड करायचे हे समजून सांगितले. अशाप्रकारे नूतन सभापतींना तंत्रज्ञानाबद्दल आवड आहे.

सभापती महोदय, माननीय श्री.शिवाजीराव देशमुख यांनी या सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांना न्याय मिळेल अशा प्रकारची परंपरा घालून दिली आहे. मग नियम 93 च्या सूचना असोत, लक्षवेधी सूचना असोत, 289 अन्वये प्रस्तावाची सूचना असो किंवा जनहिताची कोणतीही बाब असेल तर, ती संसदीय आयुधांच्या माध्यमातून उपस्थित करण्याचा अधिकार माननीय श्री.शिवाजीराव देशमुख यांनी सन्माननीय सदस्यांना उपलब्ध करून दिला होता. सभापती महोदय, आपण सुध्दा तो अधिकार कायम ठेवाल अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

..5..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे....

सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे नाहीत. त्यांनी येथे एक दोहा सांगितला होता. महोदय, या निमित्ताने मी कै.बाळासाहेब भारदे यांची आठवण करुन देऊ इच्छितो. मी विधानसभेत आलो तेव्हा ते सदस्य नव्हते. परंतु त्यांच्या बाबतीत विधानसभेच्या गॅलरीमध्ये चर्चा व्हायची. महोदय, बाळासाहेब भारदे यांनी सांगितलेले आहे की, "सत्ताधाऱ्यांना सत्तेची धुंदी नसावी आणि विरोधकांमध्ये अंदाधुंदी नसावी." महोदय, सभापती पदाची निवडणूक बिनविरोध करुन या सभागृहात चांगले चित्र निर्माण करण्यात आलेले आहे.

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. शरद रणपिसे ....

माननीय मुख्यमंत्री फार भाग्यवान आहेत, अशी पावले पडत चालली आहेत की काहीही न करता सर्व गोष्टी त्यांच्या मनाप्रमाणे आपोआप होत आहेत, मग ते विधानसभा सभागृह असो वा विधानपरिषद सभागृह असो. आम्हाला याचे काही तरी रहस्य सांगावे. काही जडीबुटी असेल तर ती आम्हाला सुध्दा पाठवावी, अशी मी त्यांना विनंती करतो. सभापती महोदय, आपले पुन्हा एकदा मनापासून स्वागत करतो आणि माझे भाषण संपवितो.

----

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, आज आपली निवड बिनविरोध झाली त्याबद्दल मी आपले मन:पूर्वक अभिनंदन करते. आपण वेगवेगळ्या प्रकारे राजकीय व सामाजिक जीवनात कार्य केले आहे. कृष्णा खोऱ्याच्या संदर्भात आपण केलेल्या कामाचा उल्लेख सभागृहात सर्व सन्माननीय सदस्यांनी केला आहे. विधानपरिषदेच्या सभापती पदाची निवडणूक जाहीर झाली. संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष या निवडणुकीकडे लागले होते. छोट्या गावापासून वेगवेगळ्या शाखांमधील, क्षेत्रांमधील लोक याकडे औत्सुक्याने पाहत होते. विशेष म्हणजे आपली निवड बिनविरोध झाली. शिवसेना पक्ष प्रमुख माननीय श्री. उद्धवजी ठाकरे यांनी काल मला फॉर्म भरण्यासाठी सांगितले होते आणि आज सकाळी माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस व माननीय श्री. उद्धवजी ठाकरे यांच्यामध्ये चर्चा झाली, त्यानंतर आमची बैठक झाली आणि त्यामध्ये निवडणुकीमधून शिवसेनेने माघार घेण्याचा निर्णय घेतला.

सभापती महोदय, आपला व माझा परिचय जसा सभागृहात आहे तसा सभागृहाच्या बाहेरही आहे. फलटण भागातील शिक्षण, शेती, सहकार या क्षेत्रात आपले योगदान आहे. आपला आणि माझा परिचय अनेक वर्षांपासूनचा, आम्ही शाळेत शिकत असल्यापासूनचा आहे. आम्ही शाळेत शिकत असताना फलटणच्या विमानतळावर खेळण्यासाठी जायचो. तेव्हापासून तुमचे नेतृत्व, कार्य पाहिले आहे. तुमच्या कुटुंबातील मुले, आमचे नातेवाईक या सर्वांचा परिचय अनेक वर्षांपासूनचा आहे. विशेषत: डॉ. प्रसन्न कुलकर्णी यांचा आपल्याशी परिचय अनेक वर्षांपासून आहे. आपण फलटण सारख्या ठिकाणी मुलामुलींसाठी शाळा सुरू केली आणि त्यामधून केलेले शैक्षणिक कार्य सर्वांना माहीत आहे. आपण केलेल्या कार्याचा खूप चांगल्या प्रकारचा प्रभाव अनेकदा पहायला मिळाला आहे. आपण सभागृहात मंत्री म्हणून काम करताना, विविध प्रश्नांची उत्तरे देताना कधीही संयम सुटू दिला नाही. वेगवेगळ्या अडचणींच्या प्रश्नांना देखील कायम अतिशय शांतपणे उत्तरे दिली आहेत.

सभापती महोदय, मला विशेष उल्लेख केला पाहिजे की, आपण खंडकरी शेतकऱ्यांना रामराजे नाईक-निंबाळकर समितीतर्फे न्याय मिळवून दिला आहे. महसूल विभागाचे राज्यमंत्री म्हणून काम करीत असताना नोंदणीकृत कागदपत्रांचे संगणकीकरण करण्याबाबत देखील आपण



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. नीलम गोऱ्हे ....

पुढाकार घेतला आहे. मी आपले मन:पूर्वक अभिनंदन करते, आपणास शुभेच्छा देते. निवडणूक बिनविरोध झाल्यामुळे आनंद होत आहे. सभागृहात सातत्याने वेगळे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक वेगवेगळ्या पध्दतीचे राजकीय मतभेद असतात. आपणाला या प्रश्नांवर काम करीत असताना पाहिले आहे. सन 2002 मध्ये मी विधानपरिषदेत निवडून आले. गेल्या 13 वर्षांत अनेक पेचप्रसंग निर्माण झाले आहेत. सभागृहात निर्माण झालेले राम प्रधान समितीच्या संदर्भातील प्रश्न, सिंचनाच्या संदर्भातील प्रश्न, नागपूर अधिवेशनात सातत्याने निर्माण झालेले पेच प्रसंग, विधेयकावरील प्रश्न यावर आपण घेतलेली भूमिका आम्ही पाहिली आहे. चौकशी समितीच्या संदर्भात घेतलेले निर्णय देखील आम्ही पाहिले आहेत. सभागृहात राजकीय मतभेद असले तरी सुध्दा समाजाच्या हिताच्या दृष्टीने आपण सभागृहात समाजकारण करीत आला आहात.

सभापती महोदय, आता आपण सभापती पदाची धुरा सांभाळत आहात. सर्वांनी वैयक्तिक स्वरूपात आपले अभिनंदन केले आहे. सभापती म्हणून काय काम करावे याबद्दल आम्ही आपल्याला काही सल्ला द्यावा अशी परिस्थिती नाही. तुमचा राजकीय व सामाजिक क्षेत्राचा खूप चांगल्या प्रकारचा अभ्यास आहे. ही निवडणूक बिनविरोध होत आहे. माननीय मुख्यमंत्री, विधानपरिषदेतील शिवसेनेचे आमचे नेते माननीय मंत्री श्री. दिवाकर रावते, माननीय मंत्री श्री. रामदास कदम, माननीय मंत्री श्री. सुभाष देसाई, माननीय मंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी सुध्दा अतिशय महत्त्वाची भूमिका बजावली आहे, मी त्यांचेही मन:पूर्वक आभार मानते, त्यांचे अभिनंदन करते.

महोदय, आपण छत्रपती शिवाजी महाराजांचा उल्लेख करतो, राज्याच्या गौरवाचा उल्लेख करतो त्यावेळी सभागृहात आपल्या सर्वांवर एक जबाबदारी आहे, याची आठवण करून देण्याच्या दृष्टीने मी बोलत आहे. आपल्या हातून महत्त्वपूर्ण व ऐतिहासिक कार्य घडावे अशी माझी आपल्याला शुभेच्छा राहील. तत्कालीन सभापती माननीय श्री. शिवाजीराव देशमुख यांच्यावरील अविश्वासाचा प्रस्ताव आला त्यावेळी ते म्हणाले की, बाली व सुग्रीव यांच्या वादामध्ये रामाने बाण मारण्याचे काही कारण नव्हते. मला वाटते की, तत्कालीन सभापती श्री. शिवाजीराव देशमुख साहेबांना वेगळा राम अपेक्षित होता की काय, हे माहीत नाही. त्यामुळे वेगळ्या रामाचा बाण त्या पध्दतीने तो शब्द वापरला गेला आहे. जे काही झाले त्या अनेक गोष्टीचे अर्थ आपल्याला नंतर उलगडत

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. नीलम गोऱ्हे ....

असतात. राजकारणामध्ये काल असतो, आज असतो आणि उद्याही असतो. उद्यासाठी शिवसेना-भाजप युतीच्या दृष्टीकोनातून अर्ज मागे घेण्यात आला. विधानपरिषदेची परंपरा गौरवाची रहावी म्हणून एक मताने निवडून देण्याचा निर्णय सर्वांनी घेतला आहे. पुढील काळात लोकांची चांगल्या प्रकारची विकासाची स्वप्ने पूर्ण करण्याची जबाबदारी आपल्याकडून पार पाडता यावी यासाठी मी मन:पूर्वक शुभेच्छा देते. आपण कधीही पक्ष बघत नाही. आपले जावई आणि आमचे पूर्वीचे शिवसेनेचे सन्माननीय सदस्य यांचे सुध्दा या संबंधानेही वेगळे नाते आहे. आपण निरपेक्ष पध्दतीने सातत्याने काम कराल अशी अपेक्षा ठेवते. आपले मन:पूर्वक अभिनंदन. जय भीम ! जय महाराष्ट्र !

----



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, विधानपरिषद या वरिष्ठ सभागृहाच्या सर्वोच्च पदावर, महत्त्वाच्या आसनावर सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांनी एकत्रित येऊन आपल्याला आणले आहे. खूप मोठी परंपरा जपली गेली आहे, आदर राखला गेला आहे. माझ्या अगोदरच्या वक्त्यांनी आपल्या व्यक्तिमत्वाबद्दल, कार्याबद्दल, राजकीय वाटचालीबद्दल सांगितले आहे. हे वरिष्ठ सभागृह आहे. आपण नेहमी म्हणतो की, विधानसभा व विधानपरिषद या दोन्ही सभागृहांमध्ये समांतर काम चालते. ते काम काही बाबतीत समांतर असले तरी विधानपरिषदेतील कामकाजाचे एक वेगळेपण आहे. मुळात हे सभागृह परपेच्युअल म्हणजे कधीही खंडित होत नसणारे आहे. त्यामुळे येथील परंपरा जपल्याच गेल्या पाहिजेत असा संकेत आहे.

सभापती महोदय, विधानसभा सभागृहातील संख्या आणि विधानपरिषद सभागृहातील संख्या लक्षात घेतली तर त्या संख्येच्या टक्केवारीप्रमाणे सन्माननीय सदस्यांना अधिक विषयावर अधिक वेळ बोलता येण्याची खूप मोठी शक्यता या सभागृहात असते. मला एक समाधान या गोष्टीचे आहे की, आपण कायद्याची अत्युच्च पदवी घेतली आहे आणि त्या विषयाचे अध्यापनही केले आहे. सभागृहात कामकाज करताना माझ्यासारख्या अनेक सन्माननीय सदस्यांना त्याचा फायदा होईल. विधानमंडळाचे मुख्य काम कायदा बनविण्याचे आहे. त्यामध्ये आम्हा सर्व सन्माननीय सदस्यांना चांगल्या प्रकारचे मार्गदर्शन पुढील काळात तुमच्याकडून अपेक्षित आहे. सन्माननीय सदस्यांना विचार मांडण्यास अधिक वेळ मिळाला तर आपल्या मार्गदर्शनाचा फायदा घेऊन राज्यातील कायदा बनविण्याच्या प्रक्रियेमध्ये अधिक गुणात्मक फरक निश्चित होईल असा आपण त्या जागेवर असल्यामुळे विश्वास निर्माण झाला आहे. विधानपरिषदेची रचना पाहिल्यानंतर निश्चितच आपण म्हणू शकतो की, सभागृहाकडून राजकारणापेक्षा समाजकारणाची अधिकची अपेक्षा आहे. विधानसभा सभागृहातील प्रत्येक सन्माननीय सदस्यांचा मतदारसंघ असतो, तेथील कामे असतात, त्यासाठी त्यांना झगडावे लागते. मात्र विधानपरिषद सभागृहातील प्रकार थोडासा वेगळा आहे. विधानपरिषदेत राज्याच्या, जनतेच्या दृष्टीने महत्त्वाचे असलेले शेतीचे, दुष्काळाचे, उद्योगाचे प्रश्न यांवर सखोल चर्चा होत असते.

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले..........

पण त्या पलीकडे जाऊन ज्या विषयांना न्याय मिळण्याची शक्यता अधिक असते, अशा शिक्षण, सामाजिक न्याय, क्रीडा, कला, साहित्य, संस्कृती यासाठी हे सभागृह आहे. सर्वसाधारणपणे वर्षभराच्या काळात अर्थसंकल्पीय अधिवेशन, पावसाळी अधिवेशन आणि हिवाळी अधिवेशन, अशा तीन अधिवेशनात आपण एकत्र भेटत असतो. या अधिवेशनांची एकूण कालमर्यादा बघितली तर सभागृहाच्या एकूण कामकाजाचा एकत्रित कालावधी सर्वसाधारणपणे 60 ते 70 दिवसांचा असतो. वर्षातील 365 दिवसांपैकी हा 60-70 दिवसांचा काळ सोडला तर अन्य काळात आम्ही सर्व सदस्य आणि आपण एकत्रित मिळून या वेगवेगळ्या विषयांसाठी काय करु शकतो, यासाठी आपण एकत्र जमू शकतो का, यामधील एक-एक विषय घेऊन त्या विषयाबद्दलचे सखोल ज्ञान घेऊ शकतो का आणि त्याप्रमाणे चर्चेत सहभागी होऊ शकतो का, ही एक शक्यता आपण सभापतीस्थानी आल्यामुळे वाढलेली आहे, असे मला निश्चितपणे वाटते.

सभापती महोदय, आपली सर्व कारकीर्द बघितल्यानंतर खूप समजुतीने वागणारे, मनमोकळे, विरोधी मतांचा आदर करणारे, समजावून घेणारे, अशा प्रकारचे एक सोज्वळ व्यक्तिमत्त्व आपल्या निमित्ताने या उच्चस्थानी आरुढ झालेले आहे. साहजिकच सभागृहाच्या परंपरेत एक नवे पान तयार करताना आपल्याला पहिल्या दिवशी शुभेच्छा देणे क्रमप्राप्त आहे व आम्ही सभागृहातील सर्व सदस्य आपल्याला मनःपूर्वक शुभेच्छा देतो.

सभापती महोदय, येथील प्रत्येक दिवस आणि समोर येणारी प्रत्येक गोष्ट, ज्यामध्ये सर्वसामान्यांचे हित आहे, समाजाचे भले आहे, असे करण्याच्या दृष्टीने या सभागृहाचा जास्तीत जास्त उपयोग आपण या स्थानी विराजमान झाल्यामुळे, या सभागृहाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील जनतेला व्हावा. आपण काही तरी चांगले करीत आहोत, गुणात्मक बदल घडवू शकत आहोत, या प्रमाणे या सभागृहाची परंपरा सांभाळत ते एका नव्या आणि वेगळ्या उंचीवर घेऊन जाल, असा मला विश्वास वाटतो. या कामासाठी सत्तारुढ आणि विरोधी बाकावर बसणारे सर्व सन्माननीय सदस्य आपल्या बरोबर राहतील, याची मला संपूर्ण खात्री आहे.

....2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले..........

सभापती महोदय, एका परंपरेचे पाईक म्हणून आपली बिनविरोध निवड झाली आहे, याचा आम्हालाही सार्थ अभिमान आहे. आपल्या भावी कारकीर्दीला मी मन:पूर्वक शुभेच्छा देतो आणि थांबतो.

-------------

...3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती :** महाराष्ट्र विधानपरिषदेचे सन्माननीय उप सभापती श्री.वसंतराव डावखरे, राज्याचे माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्रजी फडणवीस, विधानपरिषदेचे माजी सभापती श्री.शिवाजीराव देशमुख, या सभागृहाचे नेते श्री.एकनाथरावजी खडसे, आमचे नेते सन्माननीय श्री.अजित पवार, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुंडे, माझे मित्र आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष श्री.सुनील तटकरे, सर्व सन्माननीय मंत्री, राज्यमंत्री, सर्वपक्षीय सन्माननीय गटनेते, या सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्य, भगिनी सदस्या, विशेष करुन माझी सभापतीपदी निवड झाल्यावर शुभेच्छा देण्यासाठी ज्यांनी मनोगत व्यक्त केले ते सन्माननीय गटनेते श्री.माणिकराव ठाकरे, प्रा.जोगेंद्र कवाडे, माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते, सन्माननीय श्री.जयंत पाटील, डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.हेमंत टकले, बंधु आणि भगिनिंनो,

सलग 11 वर्षे 3 वेळा या सभागृहाचे सभापती पद भूषविणारे सन्माननीय श्री.शिवाजीराव देशमुख यांच्या प्रती मी सर्वप्रथम आदरभाव व्यक्त करतो. खरे सांगावयाचे झाले तर ज्या विभागातून मी येतो, त्या विभागात तरुणपणापासून ज्या राजकीय नेते मंडळींना आम्ही मानत होतो, त्यामध्ये माननीय श्री.शिवाजीराव देशमुख यांचे नाव अग्रभागी होते. गेल्या नऊ-दहा वर्षात मंत्री पदावर काम करीत असताना श्री.शिवाजीराव देशमुख साहेबांनी केलेले मार्गदर्शन, अडीअडचणीच्या प्रसंगात त्यांनी घेतलेले कठोर निर्णय मी बघितलेले आहेत. त्यांच्याविषयी व्यक्तिगत प्रेम आणि जिव्हाळा कायम राहील, असा मला विश्वास आहे. त्यांना दीर्घायुष्य लाभो, चांगले आरोग्य लाभो, अशी मी ईश्वरचरणी प्रार्थना करतो.

आज ज्या पदावर मी विराजमान झालो आहे, त्या पदावर मला विराजमान व्हायचे आहे, असा आदेश मला माझे नेते, तरुणपणी ज्यांच्या मागे स्वतःची गाडी, स्वतः चालवीत असताना, ज्यांनी दिल्लीच्या सत्तेला त्या काळात दिलेल्या आव्हानाचे आकर्षण आम्हाला होते, त्या सन्माननीय श्री.शरद पवार साहेबांनी मला दिला. त्यांनी मला असे सांगितले की, तुम्हाला सभापतीपद घ्यावे लागेल. त्यावर मी त्यांना विनम्रपणे असे म्हणालो की, "पवार साहेब आपण पद दिले, दिले नाही तरी मी आपल्याला सर्वार्थाने मानणारा कार्यकर्ता आहे, आपली इच्छा असेल तर मी हे पद स्वीकारण्यास तयार आहे." ही गोष्ट साधारणपणे दिवाळीमध्ये घडलेली आहे आणि आज ती मूर्त स्वरुपात आली

...4.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती......**

आहे. सन्माननीय श्री.शरद पवार साहेबांचा उल्लेख आजच्या प्रसंगी करणे, हे मी माझे कर्तव्य मानतो.

खरे सांगायचे तर मुख्यमंत्री महोदय आपण काही भाष्य केले. सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे साहेब आता सभागृहात उपस्थित नाहीत. त्यांनीही काही शब्द प्रयोग केले. सन्माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते यांनी गेल्या 15 वर्षात एकदाही चिमटा काढण्याची संधी सोडलेली आहे, असे मला वाटत नाही. मंत्री पदी असतानाही मी त्यांचे चिमटे सहन केले आहेत. मी त्यांना या निमित्ताने सांगू इच्छितो की, जोपर्यंत मी या पदावर आहे, तोपर्यंत मला कमी चिमटे घेतले तर ते आपल्या आणि माझ्या दृष्टीने फार मोठे सहकार्य होईल, असे मला वाटते.

खरे सांगायचे तर सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी 'दलदल,' असा शब्दप्रयोग केला. कदाचित सर्वपक्षीय दलदल असू शकेल. मला या सदनाला एक गोष्ट सांगावयाची आहे की, मी सन 1995 मध्ये राजकारणात आलो. सुरुवातीच्या काळात पुण्याला मला काही उद्योगपती मित्र भेटले. सन्माननीय मंत्री श्री.गिरीष बापट साहेब मला 15 वर्षांनी विधानसभेतच भेटले. कारण, कॉर्पोरेशनमध्ये ते एवढे कामात असायचे की, त्यांना बाकी काही बघण्यासाठी वेळच मिळत नसे. सन्माननीय श्री.गिरीष बापट साहेबांना मी सांगू इच्छितो की, त्यांनी विषय काढला म्हणून मला बोलणे आवश्यक झाले आहे. कॉर्पोरेशनमध्ये आपले इतर पक्षातील मित्र होते. त्यांची आणि माझी चांगली ओळख आहे. सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे साहेबांना याची चांगली माहिती आहे. त्यावेळी मुख्यमंत्री महोदय नव्हते. परंतु, गिरीष बापट साहेब आणि त्यांचे दोन मित्र, मी त्यांची नावे येथे घेऊ इच्छित नाही, पण हे तिघेच कॉर्पोरेशन चालवायचे आणि कोणाला निवडून आणायचे आणि कोणाला पाडायचे हे शनिवार पेठेतून ठरायचे, ज्याचा मी साक्षीदार आहे. एक गोल्डन गँगच होती. येथेही एक गोल्डन गँग आहे. पुण्याला भेटलेले उद्योगपती मित्र मला असे म्हणाले की, तुम्ही काय करीत आहात ? मी त्यांना असे म्हणालो की, I am trying to be a gentlemen politician. माझे मित्र पाच मिनिटे हसले. मी त्यांना विचारले की, "तुम्ही असे का हसता आहात ?" त्यावर ते मला असे म्हणाले की, "तू पोलिटिशिअन झाला आहेस, येथपर्यंत ठीक आहे.

...5.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती......**

आता तुला तुझ्या आयुष्यात एकच निर्णय घ्यायचा आहे की, एक तर तु पोलिटिशिअन तरी हो, नाही तर जंटलमन तरी रहा."  त्यामुळे ही दलदल कुठल्या पक्षापुरती मर्यादित आहे, असे मला स्वत:ला वाटत नाही.

प्रामाणिकपणे सांगायचे झाले तर गेल्या 5-25 वर्षात मंत्री पदावर असताना, इतकेच काय आजही सर्वसामान्य माणसांमध्ये, विशेष करुन तरुणांमध्ये रमणारा मी माणूस आहे.  माझ्या मनात एक शंका येऊ लागली आहे आणि ती प्रामाणिकपणे येथे बोलून दाखविणे मला वाटते जास्त योग्य होईल. लिखित भाषण मी वाचणार आहेच, त्यात काही नवीन नाही.  पण सन 1948 मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मेहनतीने देशाची घटना तयार केली. त्यातील काही व्हॅल्यूज, फंडामेंटल कन्सेप्ट आपण जगभरातील घटनेतून घेतले आणि ही घटना तयार केली. त्याच्या आधारे आज आपण कायद्याने चालणारे राज्य म्हणून, सार्वभौम देश म्हणून काम करावयास लागलो आहोत.

यानंतर श्री.वि.खर्चे......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती...**

60 वर्षात ग्रामपंचायतींच्या सदस्यांपासून देशाच्या राष्ट्रपतीपर्यंतचे सर्व पदाधिकारी, लोकशाहीतील सर्व लोकप्रतिनिधी, या विधानपरिषद व विधान सभेतील सर्व भाषणे, आपण केलेले कायदे याचा मूळ उद्देश पुढच्या पिढीसाठी आशेचा किरण तयार करुन ठेवावा, कमीत कमी तेवढे काम आपल्या हातून घडावे असे येथे बसलेल्या कोणत्याही सदस्याची इच्छा नसेल, असे मला स्वत:ला वाटत नाही. आता संपूर्ण लोकशाही पध्दती तयार झाली आहे. त्यात कोणी काय केले, उजवीकडे बसलेल्या किंवा डावीकडे बसलेल्या लोकांनी काय केले हा विषय आता माझ्या दृष्टीने गौण झालेला आहे. तरुण वर्गात लोकशाहीबाबत एक प्रकारची निराशा दिसू लागली आहे. या सिस्टिममधून आपले काम, आपल्या आशा आकांक्षा आणि आपल्या पुढील आयुष्यासाठी काही उपाय मिळतील काय, याविषयी तरुण वर्गाच्या मनात शंका आहे. ही शंका आपण सर्वांनी अत्यंत गांभीर्याने घेणे गरजेचे आहे.

ज्या दलदलीचा उल्लेख प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी केला, त्या दलदलीतून कमळ येईल किंवा आणखी काही येईल किंवा काही येणार नाही. परंतु हे सर्व घडते व घडविले जाते. आपण सर्व आपल्या घरादाराकडे दुर्लक्ष करुन दुसऱ्याचे संसार फुलविण्याचे काम करण्याचे उद्दिष्ट आणि स्वप्न धरतो, ही सर्व कामे जाणीवपूर्वक प्रयत्नपूर्वक केलेल्या चुका, झालेल्या चुका, एकंदरीत या संस्थेची असलेली कामे या विषयी आपणाला बऱ्याच वेळा पुनर्विचार करावा लागणार आहे. हे प्रामाणिकपणे मी आपणाला सांगू इच्छितो.

क्रिकेटबाबत माझा उल्लेख झाला आहे, आता देखील पायऱ्या चढत असताना माझ्या मित्रांना माहिती असल्यामुळे त्यांनी मला आधार दिला. माननीय श्री.बापट साहेब आयुष्यात काही नाही मिळाले तरी चालेल परंतु आपला आधार कायम रहावा एवढी माझी इच्छा आहे. क्रिकेटबाबत उल्लेख करण्यात आला आहे. डावीकडे बसलेले अनेक गोलंदाज आहेत, त्यामध्ये सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील, सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे, सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले, काल सभागृहात सव्वा तास असे दीर्घकाळ भाषण केले ते सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित आहेत. एवढे सर्व गोलंदाज डावीकडे आहेत. तेवढेच खंबीर फलंदाज उजवीकडे आहेत. तुम्ही सर्व मला म्हणालात की, रामराजे तुम्ही अम्पायर

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती...**

व्हा. माझी एकच विनंती आहे की, आपण देखील इतकी गोलंदाजी करु नये किंवा इतक्या जोराने बॉल टाकू नये, बम्पर टाकू नयेत, शूटर टाकू नयेत, वाईड बॉल टाकू नयेत की, उजवीकडील फलंदाज जखमी होतील, एवढी माझी आपणाला विनंती राहील. अम्पायर म्हणून माझे काम चोख होईल.... (अडथळा).... सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे साहेब शेवटी येथे आपण आल्यानंतर एखादी मॅच आपण हरलेलो असतो, परंतु आपली शील्ड कोठे गेलेली नसते हे लक्षात ठेवावे. हा विषय गांभीर्याने घेण्याचा आहे. विधानपरिषदेला हाऊस ऑफ एल्डर्स मानले जाते. वरिष्ठ सभागृहात गेल्या 15 वर्षात मी पाहत होतो की, ज्येष्ठ सदस्य येथे कार्यरत होते. आज येथे लीथल कॉम्बिनेशन तयार झाले आहे. दोन्ही बाजूला तरुण वर्ग बहुसंख्येने येथे दिसत आहेत. आमच्या सारखे देखील आहेत, नाही अशातला भाग नाही. तरुण सन्माननीय विधानपरिषद सदस्यांनी ही बाब लक्षात घेतली पाहिजे की, ही परिषद हाऊस ऑफ एल्डर्सची आहे. आपले वय कमी असले तरी ज्या सभागृहात आपण बसलो आहोत, त्याची प्रतिष्ठा आपणाला कायम ठेवावी लागणार आहे. याची नोंद आमच्या गोल्डन गँगने घ्यावी अशी माझी विनंती आहे.

अनेक सन्माननीय सदस्यांनी माझ्याविषयी चांगल्या भावना व्यक्त केल्या आहेत. मला माहिती नसलेले गुण मला चिकटविले आहेत. फार चांगले झाले, खरे सांगायचे तर आयुष्याच्या संध्याकाळी आपणाला माहिती नसलेले गुण माहीत होणे यासारखे सद्भाग्य कोठे आहे ? हे सद्भाग्य आपण मला दिले आहे. प्रामाणिकपणे सांगायचे तर माझे राजकीय आयुष्य मी दुष्काळी भागातील पाण्यासाठी वेचले आहे, पुढे देखील वेचणार आहे. या विषयी माझ्या मनात शंका नाही. सातारा जिल्ह्यातून मी येतो, मुख्यमंत्री महोदय दुष्काळ हा दुष्काळच असतो. तो पश्चिम विदर्भातील असेल, सातारा जिल्ह्यातील असेल, मंत्री महोदय, उत्तर महाराष्ट्रातील दुष्काळ असेल, पुणे जिल्ह्यात दुष्काळ नाही, कारण माननीय मंत्री श्री.गिरीष बापट यांनी पाच धरणांचे पाणी अगोदरच पळवून नेले आहे. त्यामुळे पुढील पाणी कोठे जाणार आहे हा एक मुद्दा आहे. ते कमी पडते म्हणून आता आणखी एका धरणाचे पाणी पळविले आहे....(अडथळा)... सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे साहेब या विषयावर आपण दालनात चर्चा करु. आपल्या आयुष्यात जे घडत असते ते आपल्या हातात नसते. मला स्वत:ला वाटते व माझ्या घराण्याची ती परंपरा आहे.

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती...**

सर्व सन्माननीय सदस्यांनी त्याचा उल्लेख केला आहे. मला देखील सार्थ अभिमानाने सांगायचे आहे की, माझे आजोबा संस्थानिक होते, फलटण संस्थानला आज 700 ते 800 वर्षाचा इतिहास आहे. अल्लाउद्दिन खिलजीचे आक्रमण झाले त्यावेळचा हा इतिहास आहे. माझी पिढी मोजली तर मी 29 वा नाईक-निंबाळकर आहे. मला येथे अभिमानाने सांगावेसे वाटते की, पहिल्या मंत्रिमंडळात माझे आजोबा बांधकाम मंत्री होते. बांधकाम खात्याला त्या काळात पीडब्ल्यूडी म्हणत होते. त्यामध्ये रस्ते आणि इरिगेशन येत होते. तेव्हा पासून या परंपरा आमच्या घरात आहेत. त्यामुळे याबाबत माझ्याकडून उल्लंघन होत नाही व पुढे देखील होणार नाही. हे देखील मी आपणाला सांगू इच्छितो. राजकारणात कित्येक वेळा पर्याय राहत नाहीत. राजकारणात एक पर्याय असतो स्वतःच्या मनाला लागलेला ब्रेक हा आपल्याला मिळालेले बाळकडू, घराण्याची संस्कृती आणि त्यांनी दाखविलेले उद्दिष्टे, त्यामुळे आपण किती धावायचे, याला इंग्रजीमध्ये स्टूपिंग लो असे म्हणतात. याला देखील काही मर्यादा येतात. माझ्याकडून आपल्या काही अपेक्षा आहेत. 1937 पासून सर्व सभापतींची नावे आपण सांगितली आहेत. या सभापतींच्या तोडीचे काम माझ्याकडून होईल किंवा नाही याची मला माहिती नाही. परंतु प्रयत्न मात्र मी निश्चित करणार आहे. आपली अपेक्षा अशी आहे की, तटस्थ बुध्दीने पक्षीय भूमिका न घेता काम व्हायला पाहिजे, याबाबत मी आश्वासन देऊ इच्छितो की, माझ्याकडून पक्षपाती धोरण कधीही स्वीकारले जाणार नाही. कालचे उदाहरण मी आपणाला देतो की, माननीय उप सभापती श्री.वसंत डावखरे यांनी निश्चय केला होता. आम्ही चर्चा करण्यासाठी बसलो होतो. तेव्हा आम्ही अशी चर्चा करीत होतो की, 1995 मध्ये विधानसभेत 7,8,9 किंवा 10 तारांकित प्रश्नांवर चर्चा होत होती. विधानपरिषदेत मी राज्यमंत्री म्हणून काम केले तेव्हा एका तासात फक्त 5 ते 6 तारांकित प्रश्नांवर चर्चा होत होती. गेल्या 15 वर्षात असेच आपणाला बघायला मिळाले आहे. उप सभापती व आपण सर्वांनी सहकार्य केल्यामुळे काल विधानपरिषद सभागृहात 10 तारांकित प्रश्नांवर चर्चा झाली आहे. मी माननीय श्री.शरद पवार साहेबांना एक वेळा विचारले होते की, आपण मुख्यमंत्री असताना आम्ही असे ऐकले होते की, आपण सर्व प्रश्नांची उत्तरे देत होता. एक तारांकित प्रश्न आपण किती वेळात संपवित होता. त्यांनी मला सांगितले की, एक प्रश्न, दोन, तीन मिनिटे किंवा जास्तीत जास्त चार मिनिटात संपत होता.

...4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती...**

ज्या सन्माननीय सदस्यांनी लेखी प्रश्न विचारला, त्या सन्माननीय सदस्यांना एक किंवा दोन उप प्रश्न विचारण्याची परवानगी दिली जात होती. ती परंपरा आपणाला कायम ठेवता आली नाही. वेळेचा अपव्यय न करता अत्यंत गतीमान काम करावे, अशी माझी अपेक्षा आपणाकडून राहणार आहे. असे सहकार्य मला मिळेल अशी विनंती मी करतो.

या नंतर श्री.बोरले...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती.........**

मी आपल्याला सांगू इच्छितो की, मला तंत्रज्ञानाची आवड आहे. माझी एक इच्छा आहे आणि त्या दृष्टीने माझे प्रयत्न राहणार आहेत. मुख्यमंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, महाराष्ट्राविषयी कोणी काहीही, कितीही, कसेही बोलले तरी महाराष्ट्र हे अतिशय प्रगत राज्य आहे. इतर राज्यातील विधानसभा आपणही बघितलेल्या आहेत, मी देखील बघितलेल्या आहेत आणि यापुढेही बघू. ज्या पद्धतीने आपण पेपरलेस गर्व्हमेंटचे स्वप्न बघतो त्या पद्धतीने मी स्वत: आधुनिक तंत्रज्ञानाने सुयोग्य असे पेपरलेस लेजिस्लेचरचे स्वप्न बघत आहे. शासनाकडून यासाठी सहकार्य मिळेल, अशी मला अपेक्षा आहे. या संदर्भात कोणीही विरोधी मत नोंदविण्याचे कारण नाही. माझ्या निश्चितच या अपेक्षा आहेत. शेवटी, आयुष्य हे give and take असेच आहे. आपल्याला माझ्याकडून असलेल्या अपेक्षा आणि मला आपल्याकडून असलेल्या अपेक्षा यांचा आपण सुरेख समतोल घालू आणि या सभागृहात मला आपल्याकडून सहकार्य मिळेल असे गृहीत धरुन आपण चांगले काम करण्याचा प्रयत्न करु, एवढेच मी सांगू इच्छितो.

आपणा सर्वांचा अधिक वेळ न घेता आपल्या सर्वांचे, सर्व पक्षाचे, सर्व पक्षाच्या नेत्यांचे मी मनापासून आभार मानतो आणि माझे विचार संपवितो.

सभागृहाची बैठक आता मध्यंतरासाठी स्थगित होत आहे.

( दुपारी 1.51 ते 2.36 वाजेपर्यंत मध्यंतर )

---------

यानंतर श्री.भोगले......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(मध्यंतरानंतर)**

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.प्रकाश बिनसाळे)**

**पृ.शी./मु.शी.:** कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

श्री.देवेंद्र फडणवीस (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, 2011 मधील खंड 8 अन्वये नगरविकास विभागाचा सन 2013-2014 या वित्तीय वर्षातील योजनेतर व योजनांतर्गत योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती :** प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवण्यात आला.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, 2011 नुसार नगरविकास विभागाचा योजनेतर व योजनांतर्गत प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सादर केला आहे. केळकर समितीच्या अहवालावर चर्चा केव्हा होणार आहे यासंबंधी शासनाने निवेदन केले पाहिजे.

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, केळकर समितीच्या अहवालावर याच अधिवेशनात चर्चा व्हावी अशी अपेक्षा आहे. आम्ही अहवाल मांडताना हे घोषित केले होते की, त्यावरील एटीआर सभागृहातील चर्चा ऐकल्यानंतर तयार करावयाचा आहे. त्यामुळे सभागृहात सर्वंकष चर्चा करुन माननीय सदस्यांची मते जाणून घेतली जातील आणि मग त्यावरील एटीआर सादर केला जाईल.

--------

श्री.विनोद तावडे ( सांस्कृतिक कार्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, 2011 मधील खंड 8 अन्वये पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाचा सन 2013-2014 या वित्तीय वर्षातील योजनेतर व योजनांतर्गत योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती :** प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवण्यात आला.

--------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनोद तावडे ( सांस्कृतिक कार्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, 2011 मधील खंड 8 अन्वये संसदीय कार्य विभागाचा सन 2013-2014 या वित्तीय वर्षातील योजनेतर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती :** प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवण्यात आला.

--------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**नियम 93 अन्वयेच्या सूचनेवरील निवेदनासंबंधी**

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, सभागृहातील सर्व माननीय सदस्यांची नियम 93 अन्वयेच्या सूचनावरील निवेदनांबाबत तक्रार आहे. दररोज किमान 15 ते 20 नियम 93 च्या सूचनांवर शासनाने निवेदन करावे असे आपल्याकडून निर्देश दिले जातात. परंतु दररोज एक किंवा दोन निवेदने सभागृहाच्या पटलावर सादर केली जातात. अधिवेशन संपण्याच्या एक किंवा दोन दिवस अगोदर प्रलंबित निवेदने सादर केली जातात. त्यामुळे आपण शासनाला या बाबतीत निर्देश द्यावेत.

**तालिका सभापती :** मंत्री महोदयांनी याबाबत दक्षता घेतली पाहिजे. नियम 93 च्या सूचनेवरील निवेदन तीन दिवसात सभागृहासमोर सादर झाले पाहिजे, त्या दृष्टीने नियोजन करावे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, नियम 93 च्या सूचना मंत्री महोदयांकडे जाण्यापूर्वी विधानमंडळ सचिवालयाकडून तातडीने रवाना झाल्या पाहिजेत या दृष्टीने लक्ष देण्यात यावे. सूचना विभागांकडे कोणत्या वेळी पाठविण्यात आल्या त्या वेळेचा तपशील आम्हाला उपलब्ध झाला पाहिजे.

नंतर टी.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित असल्यामुळे यासंबंधी आपण निदेश द्यावेत. आज अधिवेशनाचा दुसरा आठवडा संपत आहे. आम्ही नियम 93 अन्वयेच्या 20-20 सूचना देतो. त्यापैकी फक्त एकाच सूचनेवरील निवेदन चर्चेला येणे याला काही अर्थ नाही.

**तालिका सभापती** : मी शासनाच्या निदर्शनास आणून देतो की, सन्माननीय सदस्यांनी नियम 93 अन्वयेची सूचना सभागृहात मांडल्यानंतर विधिमंडळ कार्यालयातून त्याच दिवशी ती शासनाकडे पाठविण्यात येते. त्यावरील शासनाचे निवेदन तीन दिवसात यायला पाहिजे. मात्र ते येत नाही. शासनाने तीन दिवसात निवेदन करावे अशी सर्वांची विनंती आहे.

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य शासनाला निदेश द्यावेत असे एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, विनंती याचा अर्थ निदेश असाच होतो.

.....

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी. :** नियम 93 अन्वये सूचना

**तालिका सभापती** : माझ्याकडे दिनांक 20 मार्च, 2015 रोजी नियम 93 अन्वये ज्या सूचना प्राप्त झाल्या होत्या त्या संदर्भातील माझे निर्णय सचिव वाचून दाखवतील.

सचिव : सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी "गोरेगाव पूर्व (मुंबई) येथील दिंडोशी भागात टी.बी.आजाराचे वाढत असलेले प्रमाण " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.सतिश चव्हाण यांनी "जैवतंत्रज्ञान विषय अनुदानित करण्यासंबंधात होत असलेली मागणी" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.आनंद ठाकूर यांनी "पालघर जिल्ह्यात जव्हार, मोखाडा व विक्रमगड तालुक्यात राष्ट्रीय पेयजल अभियान कार्यक्रमांतर्गत शिवकालीन पाणी साठविण्याची योजना राबविण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांनी "शासनाने महाराष्ट्रातील 232 नगरपालिका व महानगरपालिकांना विना निविदा ई.बी.एम.कंपनीला ई.आर.पी.संगणक प्रणालीचे काम देणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

--------

...3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : राज्यात कचऱ्याची विल्हेवाट लावण्याचा निर्माण झालेला गंभीर प्रश्न

**मु.शी.** : राज्यात कचऱ्याची विल्हेवाट लावण्याचा निर्माण झालेला गंभीर प्रश्न यासंबंधी सर्वश्री ***संजय दत्त, मुझफ्फर हुसेन सय्यद, अशोक ऊर्फ भाई जगताप, शरद रणपिसे, अनिल भोसले, ॲड. हुस्नबानू खलिफे, श्री. राजेंद्र मुळक,ॲड.रामहरी रुपनवर,*** वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.संजय दत्त (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

***"मुंबईतील कचऱ्यांची विल्हेवाट लावल्या जाणाऱ्या डंपिंग ग्राऊंडची क्षमता संपत चालली असून न्यायालयाच्या आदेशानंतर कांजूरमार्गच्या डंपिंग ग्राऊंडचा मार्ग खुला होणार असताना नवीन विकास आराखड्यात डंपिंग ग्राऊंडचे आरक्षण ठेवले नसून मुलूंड आणि कांजूरमार्ग येथे त्यावर निवासी आणि कमर्शियल बांधकामाचे आरक्षण ठेवल्याचे माहे फेब्रुवारी, २०१५ च्या सुमारास निदर्शनास येणे, मुलुंड व देवनारच्या डंपिंग ग्राऊंडवर कचरा टाकण्यास जागाच शिल्लक नसल्याने मुंबई पालिकेने नियुक्त केलेल्या कंत्राटदारांना २५ वर्षांच्या कालावधीसाठी सवलतीच्या दरात पर्यायी जागा देण्याचा प्रस्ताव मुंबई महापालिकेने नगरविकास विभागाकडे दिनांक ३० जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास पाठविणे, राज्यातील ४० वर्ग (एक) शहरांमध्ये कचऱ्याची विल्हेवाट लावण्याबाबतच्या प्रश्नाने अतिशय उग्र स्वरुप धारण केले असून डंपिंग ग्राऊंडचा प्रश्न सातत्याने भेडसावत असणे, मुंबई शहरात दररोज सुमारे १० हजार १६९ मेट्रीक टन कचरा गोळा होत असून एवढा मोठ्या प्रमाणातील कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी मुंबई महानगरपालिका हतबल असणे, मुंबईतील एकही भाग असा नाही त्याठिकाणी नागरी वस्त्या नाही, त्यामुळे त्या-त्या भागात डंपिंग ग्राऊंडला नागरिकांचा होत असलेला विरोध, त्याच पध्दतीने ठाणे, रायगड, पुणे, नागपूर व राज्याच्या इतर शहरी भागातही कचऱ्याची विल्हेवाट लावण्याचा निर्माण झालेला***

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.संजय दत्त....

***गंभीर प्रश्न, सी.आर. झेड. च्या अधिनियमामुळे समुद्र किनाऱ्यालगत डंपिंग ग्राऊंडचे प्रकल्प उभे करणे शक्य होत नसणे, तसेच प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी योग्य ती अनुमती दिली जात नसल्याने कचऱ्याच्या प्रश्नांची सोडवणूक होण्यास विविध अडचणी निर्माण होणे व त्यामुळे प्रदूषणात वाढ होऊन पर्यावरणाचा ऱ्हास होत असणे, तसेच डंपिंग ग्राऊंडच्या नजीकच्या परिसरातील रहिवाशांच्या आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणामामुळे तेथील रहिवाशांमध्ये पसरत असलेला तीव्र असंतोष, त्यामुळे मुंबईतील कचऱ्यांची विल्हेवाट लावल्या जाणाऱ्या डंपिंग ग्राऊंडचा प्रश्न तातडीने सोडविण्यासाठी शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."***

श्री.देवेंद्र फडणवीस ( मुख्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..5..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, डंपिंग ग्राऊंडचा प्रश्न राज्यातील सर्व महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद यांना भेडसावत आहे. या प्रश्नाने आता संपूर्ण राज्यात रूद्रावतार धारण केला आहे. विकास सर्वांना हवा आहे, पण कचरा कोणालाही नको. प्रत्येक नागरी वस्तीच्या ठिकाणी डंपिंग ग्राऊंड असल्यामुळे तेथील नागरिकांचा त्यास विरोध असतो. कारण त्यांना त्याचा त्रास होत असतो. मुंबई, पुणे, ठाणे, नागपूरसह राज्यातील प्रमुख शहरांमध्ये हा प्रश्न गंभीर झालेला आहे. त्यामुळे या प्रश्नाकडे शासनाने दुर्लक्ष करुन चालणार नाही. किंबहुना दूरदृष्टी ठेवून यासंबंधातील धोरण आखले पाहिजे. आता माननीय मुख्यमंत्री सभागृहात आहेत. आपल्या माध्यमातून मी त्यांना विचारु इच्छितो की, या गंभीर प्रश्नाकडे सरकार कसे काय बघणार आहे, यासंबंधात सरकार कोणती उपाययोजना करणार आहे ? क्षेपणभूमीची जमीन सवलतीच्या दरात दिल्याबद्दल चौकशी समिती नेमली असून तिचा अहवाल आला आहे असे लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात नमूद केले आहे. त्यात काही गैर प्रकार आढळून आल्याचे देखील नमूद केले आहे. मी स्पेसिफिक विचारतो की, यात नेमके कुठले गैरप्रकार आढळून आले आहेत, यासंबंधात एसीबी मार्फत गुन्हा दाखल करण्यात येणार आहे काय ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, एका अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नाकडे सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी सभागृहाचे लक्ष वेधले आहे. त्यांच्या पहिल्या प्रश्नाचे उत्तर व्यापक आहे. केंद्र सरकारने स्वच्छ भारत अभियान सुरू केले. आपण राज्यामध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियान सुरू केले आहे. कालच मंत्रिमंडळाने त्यास मान्यता दिलेली आहे. स्वच्छ भारत अभियानातून प्राप्त होणारा 50 टक्के निधी घनकचरा व्यवस्थापनावर खर्च करण्याचे बंधन आता आपल्यावर आलेले आहे. त्यामुळे महानगरपालिका, नगरपालिका यांना व्हायबिलिटी गॅप फंडिंग करिता राज्य शासनाकडून 25 टक्के आणि भारत स्वच्छ अभियाना अंतर्गत 50 टक्के निधी देण्यासंदर्भातील प्रारुप तयार करण्यात आले आहे. महानगरपालिका, नगरपालिकांनी घन कचऱ्याकडे जास्तीत जास्त लक्ष द्यावे अशी आपण तरतूद केली आहे. यात मोठ्या प्रमाणावर अडचणी आहेत ही गोष्ट खरी आहे. सर्वात मोठी अडचण प्रमाणित टेक्नॉलॉजीची आहे. आज वेगवेगळे तंत्रज्ञान येत आहे. बऱ्याच टेक्नॉलॉजी आल्या आणि त्या फेल झाल्या आहेत. काही टेक्नॉलॉजी सुरू आहेत पण त्या स्केलवर जाऊ शकलेल्या नाहीत. त्यामुळे आम्ही केंद्र शासनाला सर्टिफाईड टेक्नॉलॉजी द्याव्यात

..6..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस....

अशी विनंती केली आहे. आपल्या राज्यात जो काही कचरा तयार होतो त्यावर प्रक्रिया करण्यासाठी जी काही टेक्नॉलॉजी उपलब्ध आहे त्याच्या सर्व प्रोव्हायडर्सना एकत्रित बोलावून त्यातील कुठल्या टेक्नॉलॉजीस सस्टेनेबल आहेत यासंबंधातील एक कार्यशाळा घ्यावी लागेल. त्यामध्ये महानगरपालिकेचे आयुक्त, नगरपालिकांचे मुख्याधिकारी यांचा देखील समावेश असेल. या सर्व गोष्टी करण्याचे आम्ही ठरविलेले आहे.

महोदय, लक्षवेधी सूचनेमध्ये तीन ठिकाणचा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. देवनार क्षेपणभूमी संबंधी समितीने कन्क्ल्यूजन काढलेले आहे. या समितीचा रिपोर्ट माझ्याकडे आल्यानंतर तो आम्ही स्वीकारलेला आहे. देवनार क्षेपणभूमीसाठी दोन निविदाकार आले होते. दोन्ही निविदाकार हे टेक्नीकल क्वालिफिकेशनमध्ये क्वॉलिफाय होत नव्हते. कारण त्यासाठी 80 मार्क ठेवले होते. मग महापालिकेने त्यांना सांगितले की, आपल्या टेंडरमध्ये त्रुटी असल्यामुळे काही अतिरिक्त क्वालिफिकेशन द्यावयाचे असेल तर द्यावे. यासाठी त्यांना महानगरपालिकेतर्फे संधी देण्यात आली. त्यांनी ॲडिशनल टेक्निकल क्वालिफिकेशन दिल्यानंतर एक निविदाकार 78 मार्कपर्यंत तर दुसरा 87 मार्कपर्यंत पोहोचला. त्यामुळे एकच निविदाकार क्वॉलिफाय झाला आणि दुसरा क्वॉलिफाय होऊ शकला नाही. त्यामुळे जो निविदाकार क्वॉलिफाय झाला त्याचेच फायनान्शियल बिड उघडण्यात आले.

सभापती महोदय, त्यात त्यांनी त्रुटी दाखविलेल्या आहेत. यात सिंगल बिडर आहे. त्याची बिड हायएस्ट आहे. शिवाय या संदर्भात डीपीआर तयार करण्यात आला होता. त्यात नमूद केलेल्या अपेक्षित किंमती पेक्षा जास्त किंमतीचे टेंडर आहे. यासाठी त्याने दुसरी टेक्नॉलॉजी वापरली आहे असे कारण देण्यात आले आहे. ही सर्व प्रोसेस पाहिल्यानंतर समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीचे असे मत आहे की, डीपीआर तयार केल्यानंतर एक बिड बोलाविण्यात आली. निविदाकाराने फायनान्शियल बिड ज्या टेक्नॉलॉजीच्या आधारे दिले आहे त्याचे इव्हॅल्युएशन करण्याकरिता महानगरपालिकेकडे काहीच सिस्टीम नाही. कारण आपल्याकडे कंपेरिटीव्ह बीडच नाही. त्या संदर्भातील टेक्निकल स्पेसिफिकेशन देणे आवश्यक होते. त्यामुळे त्यांनी ऑब्जेक्शन घेतले की, यामध्ये ऑब्जेक्टीव्हीटी आणली पाहिजे. हे सर्व सन 2008 पासून सुरू आहे. त्यानंतर त्यात सातत्याने अनेक बदल होत गेले. यात 2-3 वेळा किंमत कमी



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस....

करण्यासंबंधात निगोसिएशन झाले. आम्हाला लिजवर जागा द्यावी लागेल म्हणून त्यास परवानगी देण्यासाठी त्यांनी राज्य शासनाकडे प्रस्ताव पाठवून दिला. आपणाला कल्पना आहे की, मागच्या वेळी यासंबंधात चौकशी झाली होती आणि आता हा सगळा रिपोर्ट आलेला आहे व तो आमच्या सरकारने स्वीकारला आहे. देवनार क्षेपणभूमीसंबंधात जी काही ऑब्जेक्शन्स आहेत ते तांत्रिक स्वरुपाचे आहेत. हे तयार करण्यासाठी पीपीपी एक्सपर्टची मदत घेण्यात आली होती. त्यांचे म्हणणे आहे की, इतके वर्षे आपण हे चालवित आहात. यात आपण टेक्निकली सूट देत गेला आहात. ही पद्धत योग्य नाही अशा प्रकारचे ऑब्जेक्शन त्यांनी घेतलेले आहे.

सभापती महोदय, मुलुंड क्षेपणभूमीची प्रोसेस ठीक झाली आहे. त्या बाबतीत आमचे फार काही ऑब्जेक्शन नाही, असे त्यांचे म्हणणे आहे. कांजूर क्षेपणभूमीसंबंधी त्यांनी निर्णय दिला असून त्यांनी म्हटले आहे की, त्यात काही टेक्निकल क्लॉज आहेत. "The bid processed does not have any material flaw as indicated above." त्यांनी सांगितले की, हे बिडस् जुने आहेत. टेक्निकल इव्हॅल्युएशनच्या संदर्भात आपली मानके आणि केंद्र सरकारची मानके बदललेली आहेत. केंद्र सरकारने आरएफपी तयार केलेला आहे. त्याला अनुसरुनच आपण हे केले पाहिजे. त्यांनी शिफारस केली आहे की हे रद्द केले पाहिजे, त्यास राज्य शासनाने परवानगी देऊ नये. आम्ही तो अहवाल स्वीकारला आहे. यात राज्य सरकार कुठलीही परवानगी देणार नाही. यामध्ये काही भ्रष्टाचार किंवा गैरव्यवहार झाला आहे किंवा नाही हे देखील समितीने बघायला हवे होते. असा प्रकार घडल्याचे या समितीने रिपोर्टमध्ये कुठेही काही नमूद केलेले नाही. जे काही झाले आहे ते टेक्निकली झाले आहे. ते होण्याचे प्रमुख कारण समितीच्या अहवालात असे दिसते की, तशा प्रकारचे मॉडेल्स, टेक्नॉलॉजी आणि डॉक्युमेंटसच उपलब्ध नाहीत. त्यामुळे त्यात ऑब्जेक्टीव्ही नाही म्हणून हा अहवाल आम्ही स्वीकारून ते सगळे रद्द केलेले आहे. हायकोर्टाला देखील कळविण्यात आले आहे. आम्ही महानगरपालिकेला सांगितले आहे की, आपण सस्टेनेबल टेक्नॉलॉजी घेऊन आलात तर आपणास परवानगी दिली जाईल. पण आता तरी आम्ही परवानगी नाकारीत आहोत. यासंबंधात पी.आय.एल. झाली होती. त्यात आम्ही सरकारचे म्हणणे मांडले होते. ते नाकारल्याचे दाखविले होते म्हणून आमचे म्हणणे न्यायालयाने ॲप्रीशिएट केले होते.

यानंतर श्री.जुन्नरे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, डम्पींग ग्राऊंडचा प्रश्न सर्वात मोठा झालेला आहे. माझी मुख्यमंत्री महोदयांना विनंती आहे की, मुंबईच्या प्रश्नाबरोबर मुंबईच्या एमएमआरडीएचा जो एरिया आहे तो मुंबईचा धरूनच निर्णय घेतले गेला पाहिजेत. यासंदर्भात मी आपल्या बरोबर अनेक वेळा चर्चा देखील केलेली आहे. जो निर्णय मुंबईसाठी होईल तो एमएमआरडीएमध्ये राहिला पाहिजे. डम्पींग ग्राऊंडसाठी आता जागाच उपलब्ध राहिलेली नाही. फॉरेस्टच्या जागेवर झाडे सुध्दा उगवू शकत नाही अशा कातळ जागा शासनाने डम्पींग ग्राऊंडसाठी घेण्याची आवश्यकता आहे. आमच्याकडे मोठया ग्रामपंचायती नगरपालिकेच्या लेव्हलच्या झालेल्या आहेत. त्यामुळे अशा ठिकाणी डम्पींग ग्राऊंडसाठी जागा देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेण्याची आवश्यकता आहे. राज्य शासनाने एक धोरणात्मक निर्णय घेतला पाहिजे की, कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी ग्रामपंचायतीपासून नगरपालिकेच्या बजेटमध्ये तरतूद केली तरच स्वच्छ भारत अभियान पूर्ण सफल होऊ शकेल. कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी पैशाचा तुटवडा होत असल्यामुळे रोजगार हमी योजनेतून कचरा उचलला तर ज्या छोटया ग्रामपंचायती आहेत, छोटया नगरपालिका आहेत, ज्या नगरपालिका किंवा ग्रामपंचायतींची आर्थिक कुवत नाही त्यांच्यासाठी रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून कचरा उचलता यावा यासाठी धोरणात्मक निर्णय राज्य शासन घईल काय ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, यासंदर्भात 14 व्या वित्त आयोगाचा रिपोर्ट आलेला असून त्यामध्ये जास्तीत जास्त भर घनकचरा व्यवस्थापनावर दिलेला आहे. ग्रामपंचायती, नगरपालिका किंवा महानगरपालिका असतील त्यांना 14 व्या वित्त आयोगाचे पैसे देत असताना जास्तीत जास्त भर घनकचरा व्यवस्थापनावर टाकणार आहोत. नुकतेच माननीय केंद्रीय पर्यावरण मंत्र्यांनी यासंदर्भात सर्व महानगरपालिकांना सूचना केलेल्या आहेत. आपण घनकचरा व्यवस्थापनावर सर्वात कमी पैसे खर्च करीत असतो. त्यामुळे केंद्रीय मंत्र्यांनी बजेटच्या किमान 25 टक्के रक्कम घनकचरा व्यवस्थापनाकरिता ॲलोकेट करण्याच्या संदर्भातील निर्देश दिलेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी चांगली सूचना केलेली आहे. आपल्याला कल्पना आहे की, नरेगाचे निकष केंद्रशासनाने ठरवून दिलेले आहेत.

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस.......

त्या निकषांमध्ये बसून घनकचरा उचलण्याचे काम करता येईल काय हे तपासून पाहू व तसे करता येत असेल तर तसे करु ग्रामपंचायतीपासून नगरपालिका, महानगरपालिका यांनी घनकचरा व्यवस्थापनावर अधिक भर दिला पाहिजे, यादृष्टीने तशा सूचना त्यांना दिल्या जातील.

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, डम्पींग ग्राऊंडचा प्रश्न अतिशय महत्वाचा झालेला आहे. पूर्वी डम्पींग ग्राऊंडवर कचरा टाकला जात असे आणि डम्पींग ग्राऊंड हे नेहमी शहरापासून लांब अंतरावर असायचे. परंतु आता डम्पींग ग्राऊंडजवळ नागरी वस्ती जाऊ लागल्यामुळे लोकांच्या तक्रारी वाढू लागल्या आहेत. आताचा नवीन डीपी बघितला तर त्यामध्ये अजून भानगडी वाढतील असे दिसू लागले आहे. मुंबईमध्ये कचरा उचलण्याचा ज्यांनी ठेका घेतला आहे त्यांनी एक मोठे रॅकेट तयार केले आहे. हे लोक कचरा डम्पींग ग्राऊंडवर टाकतच नाही. हल्ली ज्या ठिकाणी मॅन्ग्रोव्हज आहेत, खाडया आहेत त्या ठिकाणी कचरा टाकला जात आहे. पूर्वी अशा ठिकाणी डेब्रीज टाकले जात असे परंतु आता या ठिकाणी सर्रास कचरा टाकला जात आहे. त्यामुळे या माध्यमातून अनधिकृत डम्पींग ग्राऊंडचे जे पेव फुटले आहे, त्यावर कठोर कारवाई करुन नागरिकांना दिलासा दिला जाणार आहे काय ? जर अधिकृत ठेकेदाराने कचरा उचलण्याचा ठेका घेतला असेल तसेच डम्पींग ग्राऊंडवर कचरा न टाकता दुसऱ्या ठिकाणी तो कचरा टाकला जात असेल तर त्याच्यावर कोणती कारवाई केली जाणार आहे ? वर्सोवा खाडी ते मनोरी पर्यंतची सर्व जागा आता भरत चालली आहे. एका बाजूला मॅन्ग्रोव्हज तोडत जायचे आणि त्या ठिकाणी कचरा टाकायचा असे प्रकार सर्रास सुरु आहेत. आम्ही अशा गाडया किती तरी पकडल्या आहेत. म्हणजे कचरा उचलण्याचे अधिकृत ठेका महानगरपालिकेकडून घ्यावयाचा आणि त्या गाडया मात्र खाडीच्या ठिकाणी अनाधिकृतपणे कचरा टाकत असतील तर अशा ठेकेदारांचे आपण लायसन्स रद्द करणार आहात काय, या लोकांवर कठोर कारवाई केली जाणार आहे काय ? कचऱ्यापासून मुंबईकरांना जो त्रास होतो त्यातून मुंबईकरांची सुटका केली जाणार आहे काय ?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

...3...

श्री. देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनेप्रमाणे महानगरपालिकेला जरूर सूचना दिल्या जातील. ज्यांनी कचरा उचलण्याचा ठेका घेतला आहे व कचऱ्याची विल्हेवाट ज्या ठिकाणी करण्याचे ठरले आहे त्या ठिकाणी ती होते आहे की, नाही यासंदर्भातील मॉनेटरींग महानगरपालिकेने करावे, याबाबत त्यांना सूचना देण्यात येतील.

सभापती महोदय, जर चुकीच्या ठिकाणी कचरा टाकला जात असेल तर संबंधितावर कारवाई करण्याच्या सूचना महानगरपालिकेला देण्यात येतील. नजीकच्या काळात कचरा गाडयांवर जीपीएस ट्रॅकींग प्रणाली लावण्याच्या सूचना मुंबई महानगरपालिकेला दिल्या असून मुंबई महानगरपालिकेने हा कार्यक्रम हाती सुध्दा घेतला आहे. जीपीएस प्रणालीमुळे या गाडया कोठून आल्या व कोठे गेल्या हे दिसून येईल व यामध्ये जो डिफॉल्ट करेल त्याच्यावर निश्चितपणे कारवाई केली जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्रीमती विद्या चव्हाण : घनकचऱ्याचा प्रश्न अतिशय गंभीर बनत चालला आहे. खरे म्हणजे आपण घनकचऱ्याच्या प्रश्नाकडे पूर्णपणे लक्ष करीत आहोत. या विषयाच्या संदर्भात मी अनेक वेळा सूचना देखील केलेल्या आहेत. मुंबईमध्ये शून्य कचरा मोहीम राबवणे हे सहज शक्य आहे परंतु या प्रश्नाकडे आपण लक्ष देत नाही. मुंबईमध्ये जेथे मोठमोठया कॉलनीज आहेत, टॉवर्स आहेत त्याच्या मागच्या बाजूला छोटा टँक बांधून त्या ठिकाणी जैविक कचरा रोजच्या रोज साठवला तर सोसायटीच्या झाडांसाठी चांगल्या प्रकारे खत तयार होऊ शकते. त्याच प्रमाणे इतर जो कचरा असतो तो सहज वेगळा होऊ शकतो. मुंबईची लोकसंख्या 1.30 कोटी असून कचरा साफ करणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या केवळ 27 हजार आहे. त्यामुळे शून्य टक्के कचरा मोहीम राबवण्यासाठी प्रत्येक सोसायटीला काही कम्पल्शन करणार आहात काय ?

श्री. देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, स्वच्छ भारत अभियानाच्या अंतर्गत जो मँडेट आहे त्यातील सर्वात पहिले निधीच्या वितरणातील मँडेटमध्ये कचऱ्याचे सेग्रिगेशन हा त्यातील महत्वाचा घटक आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे आपण जर सेग्रिगेशन करु शकलो तर कचऱ्यावर प्रक्रिया करणे सोपे होते. आज आपल्याकडे ज्या टेक्नॉलॉजी आहेत त्या टेक्नॉलॉजी फेल होण्याचे कारण हे आहे की, आपण ॲट सोर्स सेग्रिगेशन करीत नाही व ज्यावेळेस आपण

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. देवेंद्र फडणवीस............

प्रोसेसिंगच्यावेळी सेग्रिगेशन करतो त्यामध्ये प्रोसेसिंगच्या सेग्रिगेशनच्या संदर्भात ज्या टेक्नॉलॉजीस आलेल्या आहेत त्या फेल आहेत. हा कार्यक्रम हाती घेतला असून यासंदर्भात सर्व नगरपालिकांना, महानगरपालिकांना सूचना जारी करण्यात आल्या आहेत की, नगरपालिकांना, महानगरपालिकांना हा पैसा मिळवायचा असेल तर त्यांनी ॲट सोर्स सेग्रिगेशन केले पाहिजे ही त्यातील एक अट असणारच आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी जी सूचना केलेली आहे त्या सूचनेचा निश्चित विचार केला जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकेच्या कचऱ्याचा मोठा प्रश्न असून डम्पींग ग्राऊंडच्या संदर्भातही मोठया प्रमाणात बाहेर चर्चा सुरु आहे. पूर्वी देवनार, मुलुंड आणि कांजूरमार्ग या ठिकाणी डम्पींग ग्राऊंड होते. या संदर्भात डम्पींग ग्राऊंडसाठी एका वर्षात जागा द्यावी असे उच्च न्यायालयाने सूचित केले आहे. त्या आधारावर तळोजा येथील जागा महानगरपालिकेने शासनास प्रपोज केली आहे. ही जागा साधारणत: 141 हेक्टर आहे. सीआरझेडमुळे सदर जागा देऊ शकत नाही. महानगरपालिकेने जागेच्या संदर्भात जी मागणी केलेली आहे त्या संदर्भात राज्य शासनाकडून प्रस्ताव नाकारला गेला आहे. सदर प्रस्ताव नाकारल्यानंतर उच्च न्यायालयाने 22 जानेवारीची तारीख दिली होती,

यानंतर श्री. अजित....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे..

ती 22 तारीख मागे पडली आहे. केंद्र सरकार सीआरझेडमधील 142 हेक्टर जागा देणार नाही अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. परंतु आपण अशाप्रकारचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठविलेला आहे असे निवेदनात म्हटलेले आहे. माननीय उच्च न्यायालयाने दिलेले निर्देश, महानगरपालिकेने तळोजासंबंधी शासनाकडे पाठविलेला प्रस्ताव शासनाने नाकारला म्हणून महानगरपालिकेने गट नेत्यांची बैठक घेऊन पुन्हा निर्णय घेण्याची विनंती केली आहे. आज संपूर्ण शहरात कचऱ्याची विल्हेवाट लावण्याचा प्रश्न निर्माण झालेला आहे. आपणास सीआरझेडची जागा मिळणार आहे काय, 66 हेक्टरमध्ये डंपिंग ग्राऊंड होईल का, 142 हेक्टर जागा उपलब्ध होणार नसेल तर शासन पर्यायी जागेची व्यवस्था करणार आहे काय, सीआरझेडमधील जागा "खास बाब" म्हणून मिळविण्यासाठी राज्य शासन पावले उचलणार आहे का ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, 141 हेक्टर जमीन हा कांजूरमार्गच्या क्षेपणभूमीचा विषय आहे. सीआरझेडच्या तरतुदीनुसार आपण केवळ 66 हेक्टर जागा वापरु शकतो. आपण या संदर्भातील प्रस्ताव केंद्रीय पर्यावरण विभागाकडे पाठवून त्यांना विनंती केलेली आहे की, आम्ही कचऱ्याचे सॉलीड वेस्ट मॅनेजमेंट करीत असल्यामुळे "खास बाब" म्हणून परवानगी द्यावी. आपणास तशी परवानगी मिळू शकते. आपण मुलुंड, देवनार, कांजूरमार्ग येथील डंपिंग ग्राऊंडसाठी जो भाग पाहत आहोत ते तिन्ही भाग सीआरझेडमध्ये येतात. तेव्हा आपण या संदर्भातील प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविला आहे. या संदर्भात केंद्रीय मंत्री महोदयांबरोबर माझी चर्चा झालेली आहे. ते या विषयाच्या बाबतीत सकारात्मक आहेत. मला विश्वास वाटतो की, नोटीफिकेशनच्या बाबतीत काही बदल करावे लागतील ते करुन आपणास निश्चितपणे मान्यता मिळेल.

सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकेला तळोजा येथे डंपिंग ग्राऊंडसाठी जागा दिलेली आहे. आपल्यासमोर कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्याचा विषय आहे. ज्या कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लागू शकत नाही असाच कचरा लॅन्ड फिलिंगकरिता वापरायचा आहे. बाकी सर्व कचऱ्यांवर प्रोसेसिंग करण्याचे धोरण आपण स्वीकारलेले आहे. फ्रान्समध्ये कचऱ्याच्या माध्यमातून इलेक्ट्रीसिटी जनरेट होते. आपल्या येथे इलेक्ट्रीसिटी जनरेट करण्याचा एकही प्रयत्न

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस...

यशस्वी झाला नाही. फ्रान्समध्ये इनसिलिनरेशने इलेक्ट्रीसिटी जनरेट करण्याचा प्रयत्न यशस्वी होत आहे. अशा पद्धतीचा प्रोजेक्ट आपल्या येथे करता येतील का याचा विचार आपणास करावा लागेल.

सभापती महोदय, या ठिकाणी एमएमआर रिजनबद्दल सांगण्यात आले. संपूर्ण एमएमआर रिजनकरिता एक जागा उपलब्ध करुन तेथे सेंट्रलाईज फॅसिलिटी तयार करण्याचा विचार राज्य सरकारने केलेला आहे. आज मोठ्या प्रमाणावर नागरीकरण वाढत आहे. आता वस्त्या कचऱ्याच्या ग्राऊंडकडे जाऊ लागल्या आहेत. मग लोकांना वास येणे व इतर अडचणी निर्माण होतात म्हणून आपण कचऱ्यावर प्रोसेसिंग करीत आहोत. डंपिंग ग्राऊंडसाठी सीआरझेडमधील जागेवर परवानगी मिळावी यासाठी राज्य शासनामार्फत केंद्र सरकारकडे पाठपुरावा करण्यात येईल.

श्री.सुनील तटकरे :सभापती महोदय, मुख्यमंत्री महोदयांनी अतिशय सविस्तर उत्तर दिलेले आहे. स्वाईन फ्लूसारख्या आजाराच्या फैलावानंतर राज्यभर आणि विशेषत: मुंबई शहरात एक प्रकारचे भीतीचे वातावरण निर्माण झालेले आहे. येथे अनेक सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, पूर्वी डंपिंग ग्राऊंड इमारतीच्या बांधकामापासून खूप अंतरावर असायचे पण आता ते अंतर कमी झाले आहे. आपण अनेक ठिकाणी पाहतो आहोत की, डंपिंग ग्राऊंडचे रिझर्व्हेशन करायचे म्हटले की, गाव असो वा नगरपालिकेच्या हद्दीतील भाग असो, तेथील नागरिकांचा मोठ्या प्रमाणावर विरोध असतो. आपणास घनकचरा व्यवस्थापनाची आवश्यकता आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, शास्त्रोक्त पद्धतीने कचऱ्याची विल्हेवाट लावली जाणार आहे. आपण त्या संदर्भातील एक प्रयोग मुंबई वा मुंबईच्या परिसरात यशस्वी करुन दाखविला तर राज्यातील अनेक ठिकाणी जे प्रश्न निर्माण झालेले आहेत, त्याबाबत आपणास उपाय शोधता येईल. तेव्हा आपण प्रायोगिक तत्वावर असा प्रयोग करणार काय ? कारण मुंबई महानगरपालिका ते ॲफोर्ड करु शकते. त्यास राज्य आणि केंद्र सरकार मदत करु शकते. जगभरात जे तंत्रज्ञान विकसित झालेले आहे त्याचा आपणास स्वीकार करता येऊ शकतो. मुंबई महानगरपालिकेला तळोजा येथील जागा देण्यात आली असे मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले. तळोजा हे माझ्या रायगड जिल्ह्यातील आहे. तेथील लोकांना

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे...

साहजिकच असे वाटेल की, मुंबईतील डंपिंग ग्राऊंड देवनार आणि मुलुंडच्या परिसरातील लोकांनी नाकारल्यावर आम्ही ते का स्वीकारावे ? एमएमआर रिजनमध्ये आणि महानगरपालिकेच्या डीपीमध्ये प्रस्तावित असलेला फेररचनेचा मुसदा याबाबत काही निर्णय घेत आहोत. आपण मोठ्या प्रमाणावर चटई निर्देशांक क्षेत्र वाढविणार असल्यामुळे घन कचऱ्याचा प्रश्न खूप गंभीर बनणार आहे. एमएमआर रिजनचा सर्व परिणाम रायगड जिल्ह्यावर होणार आहे अन्य कोणत्याही परिसरावर होणार नाही. कर्जत, माथेरान, पेण, पनवेल, उरण, अलिबाग या सर्व नगरपालिकांवर व नागरी वस्त्यांवर होणार आहे. आपणास केवळ तळोजा येथे व्यवस्थापन करून चालणार नाही तर अलिबाग, पेण, पनवेल, उरण, कर्जत, माथेरान, खोपोली या नगरपालिकेतसुद्धा डंपिंग ग्राऊंड करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावे लागतील. या नगरपालिकांना जी काही ग्रांट मिळते आणि त्यामध्ये सहभाग जो दाखववायाचा आहे तो नगरपालिकांना आर्थिकदृष्टया परवडणारा नाही. तेव्हा एमएमआरडीएने पुढाकार घेऊन अशाप्रकारची डंपिंग ग्राऊंडस एमएमआर रिजनमध्ये करण्यात येतील काय ? आता चार एफएसआय, आठ एफएसआय देण्याचे धोरण केले जात आहे त्याची सांगड घनकचरा व्यवस्थानाशी घालून मग बांधकामास परवानगी देण्याच्या बाबतीत योग्य ती खबरदारी घेण्यात येईल काय ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी अतिशय महत्वाचा प्रश्न येथे उपस्थित केलेला आहे. मागील काळात शास्त्रोक्त पद्धतीचे जे काही प्रयोग झाले ते फार यशस्वी होऊ शकले नाहीत ही गोष्ट खरी आहे. आपण कचऱ्यापासून खत तयार करणे या पलीकडे जाऊ शकलो नाही. आपण केंद्र सरकारच्या मार्गदर्शनाप्रमाणे देवनार येथे शास्त्रोक्त पद्धतीने वेस्ट टू एनर्जी हा पायलट प्रोजेक्ट करीत आहोत. मुंबई महानगरपालिकेने हा पायलट प्रोजेक्ट हाती घेतला आहे. केंद्र सरकार पूर्णपणे मार्गदर्शन करीत असून त्यांच्या मदतीने आपण हा प्रोजेक्ट तयार करीत आहोत. आपण अशाप्रकारची फॅसिलीटी तयार करावी अशा सूचना एमएमआर रिजनला केलेल्या आहेत.

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस...

सभापती महोदय, मी या ठिकाणी एक गोष्ट सांगू इच्छितो की, मुंबई महानगरपालिकेला जागा देताना त्यांना ओपन डंपिंग करता येणार नाही अशी अट टाकण्यात येणार आहे. शास्त्रोक्त पद्धत्ीने कचऱ्यावर प्रक्रिया केली तर जागा मिळणार आहे. मोकळ्या जागेवर कचरा टाकण्याची परवानगी मिळणार नाही.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी मांडलेल्या मुद्याबाबत सांगू इच्छितो की, आपण कचऱ्याच्या व्यवस्थापनाकडे शास्त्रोक्त पद्धतीने पाहिले तर बायो-डिग्रेडेबल कचऱ्याची त्याच ठिकाणी विल्हेवाट लावू शकलो तर ते योग्य होईल. कारण अशा कचऱ्याची दूरवर वाहतूक केल्यामुळे त्याचा खर्च देखील वाढतो. पुण्यातील एका एनजीओने तसे काम सुरु केले असून कचऱ्याची त्याच ठिकाणी ते विल्हेवाट लावत आहेत आणि त्यामध्ये त्यांना यशही मिळालेले आहे. अशा पद्धतीला आपण प्रोत्साहन दिले पाहिजे आणि राज्य सरकार तसा पुढाकार घेत आहे. अशाप्रकारे उरलेला कचरा दूर नेला तर त्याचा फायनान्शिअल इम्प्लीकेशन पडणार नाही. सन्माननीय सदस्यांनी जी सूचना केलेली त्या पद्धतीने शासन काम करील.

--------

..5..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ. शी.** : दमणगंगा व नार प्रकल्पाचे पाणी गुजरात राज्याकडे वळविण्याचा होत असलेला प्रयत्न

**मु. शी.** : दमणगंगा व नार प्रकल्पाचे पाणी गुजरात राज्याकडे वळविण्याचा होत असलेला प्रयत्न यासंबंधी सर्वश्री जयवंतराव जाधव, अनिल भोसले, जयंत पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री हेमंत टकले, ख्वाजा बेग, सनील तटकरे,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयवंतराव जाधव (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय जलसंपदा मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"दमणगंगा पिंजाळ नदीजोड प्रकल्पातील 20 टीएमसी पाणी मुंबईला देऊन उर्वरित 63 टीएमसी पाणी गुजरातला दिले जाणार असल्याची धक्कादायक माहिती दिनांक 7 जानेवारी, 2015 रोजी उघडकीस येणे, तसेच नारपार खोऱ्यातील महाराष्ट्राच्या पाणलोट क्षेत्रातील 32 टीएमसी पाणी गुजरातमधील कच्छ, सौराष्ट्रमध्ये नेण्याचे गुजरात सरकार व केंद्र सरकारचे नियोजन असणे, महाराष्ट्र-गुजरात सीमेवरील महाराष्ट्राच्या पाणलोट क्षेत्रातील पाणी गुजरातमध्ये नेण्यासाठी केंद्र सरकारकडून व गुजरात सरकारकडून प्रयत्न होत असल्याने विविध राजकीय संघटना व सामाजिक संस्थांकडून दिनांक 12 जानेवारी, 2015 रोजी वा त्यासुमारास नाशिक येथे विविध आंदोलने केली जाणे, दमणगंगा खोऱ्यातील उपलब्ध 83 टी.एम.सी.पाण्यापैकी 15 टक्के पाणी स्थानिक जनतेला राखीव ठेवून उर्वरित पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याचा प्रस्ताव जलसंपदा विभागाने केंद्र सरकारला सादर करावा अशी नाशिक जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींची मागणी असणे, नार खोऱ्यातील उपलब्ध 50 टी.एम.सी. पाण्यापैकी 15 टक्के पाणी स्थानिक जनतेला राखीव ठेवून उर्वरित पाणी गिरणा (तापी) खोऱ्यात वळविण्याची सुध्दा लोकप्रतिनिधींची मागणी असणे, दमणगंगा व नार प्रकल्पाचे राज्याच्या हद्दीतील पाणी गुजरात राज्याकडे वळविण्याबाबत गुजरातचे नियोजनबध्दरित्या प्रयत्न असणे, मात्र राज्य शासनाकडून महाराष्ट्राच्या हक्काच्या पाण्याकडे होत

श्री.जयवंतराव जाधव...

असलेले दुर्लक्ष, उर्ध्व गोदावरी खोऱ्यातील अतिरिक्त पाणी प्रवाही पद्धतीने मुकणे धरणातून नाशिक व मराठवाड्याला देणे शक्य असूनही शासनामार्फत कार्यवाही केली न जाणे, महाराष्ट्राच्या पाणलोट क्षेत्रातील पश्चिमवाहिनी नद्यांचे गुजरातकडे व अरबी समुद्रात वाहून जाणारे पाणी महाराष्ट्राच्या प्रकल्पांमध्ये वळविण्यासाठी शासनाकडून प्रयत्न होत नसल्याने राज्यातील शेतकरी व नागरिकांमध्ये पसरलेले चिंतेचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. विजय शिवतारे ( जलसंपदा राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती (श्री.प्रकाश बिनसाळे ) :** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..7..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, या ठिकाणी जलसंपदा विभागाचे मंत्री व राज्यमंत्री उपस्थित आहेत. योगायोगाने माननीय मुख्यमंत्री देखील सभागृहात उपस्थित आहेत. महाराष्ट्र आणि गुजरातच्या सीमेवरील समुद्रात वाहून जाणारे पाणी, हे महाराष्ट्राच्या पाणलोट क्षेत्रातील पाणी महाराष्ट्राला आणि गुजरात पाणलोट क्षेत्रातील पाणी गुजरातला मिळावे अशी सर्वसाधारण नागरिकांची अपेक्षा होती.

यानंतर श्री.बोर्डे..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयवंतराव जाधव....

ती अपेक्षा रास्त सुध्दा आहे. मध्यंतरीच्या काळात राज्यामध्ये संशयास्पद वातावरण निर्माण झाले आहे. दमणगंगा-पिंजाळ नदीजोड प्रकल्पातील 20 टीएमसी पाणी मुंबईला देऊन उर्वरित 63 टीएमसी पाणी गुजरातला देण्याचे तसेच नारपार खोऱ्यातील महाराष्ट्राच्या पाणलोट क्षेत्रातील 32 टीएमसी पाणी गुजरातमधील कच्छ, सौराष्ट्रला देण्याचा प्रयत्न होत आहे की काय, अशी शंका आमच्यासारख्या कार्यकर्त्यांच्या मनात काही बातम्यांच्या माध्यमातून निर्माण झाली आहे. कदाचित ही शंका योग्यही नसेल, किंबहुना नसावी. माननीय मुख्यमंत्री या महाराष्ट्राचे देणे लागतात. महोदय, हा विषय एक-दोन प्रश्न विचारुन सुटणारा नाही. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, महाराष्ट्रातील पाणलोट क्षेत्रातील पाणी महाराष्ट्रातच राहणार आहे काय ? तसेच दुसरी बाब अशी की, या लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात नमूद केले आहे की, "दमणगंगा तसेच नारपार-अंबिका, औरंगा या पश्चिम वाहिनी नद्यांचे व्यवहार्य उपसा सिंचन उंचीतील पाणी तुटीच्या खोऱ्यात वळविण्याबाबत शासन पूर्णतः प्रयत्नशील आहे. तसेच या नद्यांचे पाणी वाटपाबाबत करार करताना राज्याचे सर्वंकष हित विचारात घेतले जाईल." महोदय, या निवेदनात कुठेही नमूद करण्यात आलेले नाही की, महाराष्ट्राचे पाणी महाराष्ट्रातच राहणार आहे. लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात पुढे असेही नमूद केले आहे की,.....(अडथळा) माननीय श्री.दिवाकर रावते साहेब, हे पाणी मराठवाडा आणि औरंगाबादला सुध्दा जाणार आहे. या निमित्ताने मी स्पेसिफिक विचारतो की, महाराष्ट्राचे पाणी महाराष्ट्रातच ठेवून तसेच नारपार क्षेत्रातील पाणी त्याच ठिकाणी ठेवून, ते पाणी पुढे मराठवाड्यापर्यंत जाणार आहे काय ?

श्री.विजय शिवतारे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी केलेला आरोप पूर्णपणे चुकीचा असून.... (अडथळा) ठीक आहे. सन्माननीय सदस्यांनी जी शंका व्यक्त केली ती पूर्णपणे असत्य आहे. महाराष्ट्राच्या वाट्याचे एक थेंब पाणी सुध्दा गुजरातला जात नाही, हे माननीय मुख्यमंत्र्यांचे निवेदन 100 टक्के पुराव्यावर आधारित आहे.

सभापती महोदय, टी.व्ही. चॅनेल्सवरुन बऱ्याच वेळा महाराष्ट्रातील जनतेसमोर चुकीचा संदेश जात आहे. माननीय मुख्यमंत्र्यांना मी सकाळी विनंती केली होती की, या विषयाची चर्चा एकदाची विधानसभा आणि विधानपरिषद सभागृहात होऊन जाऊ द्या.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विजय शिवतारे....

महोदय, दमणगंगा-पिंजाळ नदी जोड प्रकल्पात भुगड, खारगीहील आणि पिंजाळ ही गावे प्रस्तावित आहेत. भुगड धरणाचे 20 टक्के क्षेत्र गुजरातचे आहे. तसेच आपल्या राज्याचे क्षेत्र साधारणत: 80 टक्के आहे. या संपूर्ण मालिकेत भुगडचे 20 टक्के क्षेत्र असल्यामुळे 3.6 टीएमसी पाणी प्रपोर्शनेटनुसार गुजरातला जाते. ते पाणी पुढे मधुबन या त्यांच्या अस्तित्वात असलेल्या प्रकल्पात जाते. भुगडमधून ते पाणी खारगीहीलला प्रस्तावित केले आहे. भुगड ते खारगीहील हा 17.48 कि.मी. लांबीचा बोगदा आहे. त्या बोगद्यातून पाणी खारगीहीलला आणलेले आहे. खारगीहील येथून खाली 25 कि.मी. लांबीचा बोगदा करुन ते पाणी पिंजाळला नेले. पिंजाळमधून ते पाणी वैतरणा धरणामध्ये नेण्यात येते. सन्माननीय सदस्यांची अशी शंका आहे की, या संपूर्ण प्रकल्पातील एकत्रित असलेल्या पाण्याच्या वापरामध्ये 10 टीएमसीचा फरक दिसतो. वास्तविक पाहता नॅशनल वॉटर डेव्हलपमेंट ऑथॉरिटी यांनी केलेल्या सर्वेक्षणानुसार 10 टीएमसीचा फरक दिसतो. कारण मुंबईला येणारे पाणी 20 टीएमसी आहे. ते पाणी 100 टक्के डिपेंडीबिलिटीवर धरलेले आहे. म्हणून ते पाणी 20 टीएमसी दिसते. परंतु प्रत्यक्षात 30 टीएमसी पैकी 20 टीएमसी पाणी दिलेले असल्यामुळे या ठिकाणी 10 टीएमसी पाण्याचा फरक दिसतो. राज्य सरकारने केंद्र सरकारला प्रस्तावित केले आहे की, ते 10 टीएमसी पाणी पिंजाळमधून वैतरणा आणि वैतरणेतून खाली ग्रॅव्हीटी फ्लोने गोदावरी खोऱ्यात वळते करावे.

महोदय, दुसरी बाब अशी की, माननीय मुख्यमंत्र्यांनी केंद्र सरकारला पत्र लिहिल्यामुळे या बाबतची चर्चा सुरु झाली आहे. नारपार योजनेमधून आपल्या वाट्याला 19 टीएमसी पाणी येते. आताच्या घडीला सह्याद्रीच्या पर्वतरांगांमधून समुद्रापर्यंत हे पाणी 100 टक्के वाहून जात आहे. केंद्र सरकारकडून प्रस्ताव आला होता की, वाहून जाणारे पाणी पुढे अडवून वेगवेगळ्या चेन्समधून सरदार सरोवरपर्यंत आणावे. वास्तविक पाहता हा काही निर्णय नाही, शिवाय याबाबतचा अजून डीपीआर सुध्दा तयार झालेला नाही. जे पाणी एकत्रित येते त्या बाबतीत केंद्र सरकारला मागणी केली आहे. सह्याद्रीच्या पर्वतरांगा जवळजवळ 700 मीटर उंचीच्या आहेत. तेथून 19 टीएमसी पाणी उचलून वर आणणे व्यवहार्य नाही. त्यामुळे या गोष्टीचा अभ्यास केला असता निदर्शनास

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

आले की, अशाप्रकारे पाणी उचलून वर आणल्यास विजेचे बिल प्रती हेक्टर 23,500 रुपये

..3..



श्री.विजय शिवतारे....

येऊ शकते. एवढ्या मोठ्या प्रमाणावरील वीज बिल जगामध्ये कोणत्याही फिजिबिलिटीत बसत नाही. आम्ही माननीय मुख्यमंत्र्यांना सांगितले आहे की, सह्याद्रीच्या रांगांमधील मुक्त भागातील 200 मीटरपर्यंत पाणी उचलू शकतो. त्यातील 11 टीएमसी पाणी पुढे गिरणा खोऱ्यात टाकणे हा सुध्दा पर्याय आहे. परंतु 11 टीएमसी पाणी गिरणा खोऱ्यात टाकत असताना तो प्रकल्प नॅशनल प्रोजेक्ट म्हणून जाहीर करावा आणि त्याचा संपूर्ण खर्च केंद्र सरकारने करावा, असे आम्ही सुचविले आहे.

महोदय, उर्वरित 16.5 टीएमसी पाणी समुद्रात वाहून जाते. या बाबतीत लेखी करार केला आणि केंद्र सरकारला पाणी दिले तर महाराष्ट्राच्या वाट्याचे पाणी हातचे जाईल. म्हणून आम्ही काही पर्याय सुचविले आहेत. त्यातील पहिला पर्याय असा की, 11 टीएमसी पाणी गिरणा खोऱ्यात उचलून टाकावे आणि त्याचा सर्व भांडवली खर्च केंद्र सरकारने करावा. दुसरा पर्याय असा की, 16.5 टीएमसी पाणी जे आता काक्रापाडासाठी दिले जाते ते तापीमध्ये द्यावे, असे माननीय मुख्यमंत्र्यांनी केंद्र सरकारला पत्राद्वारे कळविले आहे. ते पत्र अगदी स्पष्ट आहे. त्यामुळे नारपारमधील एक थेंब सुध्दा पाणी आपण गुजरातला देत नाही. मी जे सांगितले त्याशिवाय दुसरा मार्ग नाही.

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. विजय शिवतारे ....

आपण सह्याद्रीच्या पर्वत रांगांमधून 200 मीटर उंचीपर्यंत पाणी उचलू शकतो. ते पाणी उचलण्याची आणि 11 टीएमसी पाणी आम्हाला मिळावे अशी मागणी शासनाने केंद्र सरकारकडे केली आहे. साडे सोळा टीएमसीचा डिफरन्स येत आहे. अय्यंगार आयोगाने गुजरातला तापी खोऱ्यातील पाणी दिले आहे, त्यात बदल करून ते साडे सोळा टीएमसी पाणी महाराष्ट्राला द्यावे तर आम्ही याला मान्यता देऊ असे सांगितले आहे, याचाच अर्थ एक थेंब सुध्दा पाणी ना नार-पार धरणातून गुजरातला जात आहे, ना दमणगंगा-पिंजाळ धरणातून गुजरातला जात आहे. (अडथळा) दिनांक 3 मे, 2010 रोजी तत्कालीन मुख्यमंत्री यांनी, गुजरात सरकार व केंद्रीय जल संधारण मंत्र्यांनी दमणगंगा-पिंजाळ व नार-पार धरणाच्या संदर्भात एक डीपीआर बनविण्यासाठी करार केला होता, तो करार सर्वेक्षण करण्यासाठी केला होता. आपण त्याला एमओयू म्हणा किंवा करार म्हणा. माझ्याकडे पेपर्स आहेत, त्याची प्रत सुध्दा आहे. डीपीआर करण्यासाठी हा लेखी करार होता. सर्वेक्षण केले, त्यांनी सजेशन दिले. नार-पार मधील जे पाणी वाहून जात होते त्याच्या संदर्भात त्यांचे म्हणणे असे होते की, छेद बंधारे करून सरदार सरोवरकडे ते पाणी आणावे. त्यांनी अशी मागणी केली होती. परंतु आम्ही ती मागणी मान्य केली नाही. एका दृष्टीने ते पाणी समुद्रातच वाहून जात होते, त्यामुळे ते पाणी उचलून वर टाकणे हे शक्य नव्हते. तापी खोऱ्यातील 16.6 टीएमसी पाणी केंद्र सरकारच्या अय्यंगार समितीने गुजरातला दिले आहे, ते पाणी तुम्ही आम्हाला तापी नदीत द्या, तरच आम्ही करू अशा प्रकारचे लेखी पत्र माननीय मुख्यमंत्र्यांचे आहे. त्यामुळे कोणी गैरसमज करून घेण्याचे कारण नाही. महाराष्ट्र राज्याचे एक थेंब सुध्दा पाणी गुजरातला दिलेले नाही. उलट जे 11 टीएमसी पाणी नार- पार मधून उचलायचे आहे, त्याच्या लिफ्टिंगचा खर्च केंद्र सरकारने करावा अशी मागणी केली आहे. आपला गैरसमज आहे. आपले गैरसमज असू नयेत. आपल्याला या संदर्भात जे प्रश्न विचारायचे आहेत ते आता विचारावेत.

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी या संदर्भात अत्यंत संक्षिप्त उत्तर दिले आहे. मनातील एका शंकेचे निरसन व्हावे अशी माझी अपेक्षा आहे. दमणगंगा-पिंजाळ वळण योजनेद्वारे मुंबई शहरास पाणी उपलब्ध झाल्यानंतर सध्या उर्ध्व वैतरणाद्वारे मुंबईस दिले जाणारे



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. धनंजय मुंडे ....

पाणी मुकणे धरणाद्वारे गोदावरी खोऱ्यात वळविले जाईल असे सांगितले आहे. मला या संदर्भात काही स्पष्टीकरण पाहिजे. आज रोजी मुंबईत पाण्याची मागणी 4700 एमएलडीच्या आसपास आहे. प्रत्यक्ष सर्व स्त्रोतातून उपलब्ध होणारे पाणी 3675 एमएलडी एवढे आहे. सन 2041 पर्यंत मुंबईच्या पाण्याची निकड 6680 एमएलडी होणार आहे. गारगाई व पिंजाळ प्रकल्प पूर्ण झाला आहे असे गृहीत धरले तरी मुंबईकरिता 1700 एमएलडी पाण्याचा शॉर्टफॉल राहणार आहे आणि अशा स्थितीत मुंबईचे पाणी कदापिही गोदावरी खोऱ्यामध्ये वळविले जाणे शक्य होणार नाही. शासनाची या संदर्भात नेमकी व्यवहार्य भूमिका काय असणार आहे असा माझा प्रश्न आहे.

श्री. विजय शिवतारे : महोदय, भुगड धरणापासून पुढे खारगीहील आणि खारगीहीलमधून पिंजाळमध्ये पाणी आणले आहे आणि पिंजाळचे पाणी आपण पुढे वैतरणामध्ये नेत आहोत. तसेच वैतरणामधून पाणी ग्रॅव्हीटीने गोदावरी खोऱ्यात सोडत आहोत. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी प्रश्न विचारला आहे की, सन 2041 ते सन 2050 पर्यंत मुंबईतील पाण्याची गरज काय असणार आहे ? मी सांगू इच्छितो की, तज्ज्ञ समितीने या संदर्भातील तांत्रिक अहवाल तयार केला आहे आणि त्याप्रमाणे 20 टीएमसी पाणी पुरेसे आहे. आपल्या लक्षात एक गोष्ट आली नाही, ती मी आपल्याला तांत्रिकदृष्ट्या सांगतो. सन्माननीय सदस्यांनी व आपण त्या संदर्भात विचारले असते तर बरे झाले असते. भुगड व भुगड पासून पुढे खारगीहील पर्यंत वहन होणार आहे, त्या बोगद्याची साईज लहान आहे. 10 टीएमसी पाण्याचा फरक येतो. 20 टीएमसी पाणी मुंबईला जाते. 10 टीएमसी पाणी वाहून नेण्यासाठी जी वहन क्षमता आहे, त्या साईजच्या बोगदा असला पाहिजे. प्रस्तावामध्ये 100 टक्के वहन क्षमता गृहीत धरली होती. 20 टीएमसी पाणी पुढे न्यायचे आहे. डिझाईन केलेल्या बोगद्याची साईज लहान होती. भविष्यात पाऊस भरपूर पडला आणि बोगद्यात भरपूर पाणी गेले तरी 20 टीएमसीच्या वर पाणी जाणार नाही. मग ते पाणी गोदावरी खोऱ्यात कसे सोडायचे यावर अभ्यास करून असे सांगितले गेले की, त्या बोगद्याची साईज 30 टीएमसी पाणी नेण्याची करावी म्हणजे पावसाळ्यात बरे होईल. बोगद्याची साईज कमी असेल तर पावसाळ्यात पडणारे पाणी, भुगड धरणाचे जास्तीचे पाणी परत गुजरातला निघून जाईल. तांत्रिकदृष्ट्या अभ्यास करून बोगद्याची साईज 31 टीएमसी पाणी वाहून नेण्यासाठी आवश्यक असेल तेवढी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. विजय शिवतारे ....

केल्यावर अडचण येणार नाही. मी पुन्हा सांगू इच्छितो की, मुंबईची गरज पूर्णपणे विचारात घेऊन, या संदर्भात विचार करून वैतरणा धरणातून हे पाणी पुढे गोदावरीकडे सोडण्यात येणार आहे. आपणाला काळजी करण्याचे कारण नाही. बारकाईने अभ्यास केला आहे. तुमची चिंता रास्त आहे. सत्ताधारी पक्ष असो किंवा विरोधी पक्ष असो, आपल्या घरातील पाणी देण्याची कोणाचीच इच्छा नाही. शासन कोणत्याही दबावाखाली नाही. मान्यतेनुसारच साडे सोळा टीएमसी पाणी जे तापीमध्ये आहे, जे अय्यंगार आयोगाने सांगितले, ते पाणी महाराष्ट्राला दिले तर आणि 11 टीएमसी पाणी नार-पार धरणातून उचलून गिरणा खोऱ्यात टाकले तरच हे होणार आहे. सभापती महोदय, हे सर्व प्रस्ताव आहेत. हा डीपीआर झालेला आहे. डीपीआरबद्दल चर्चा सुरू आहे. त्यामुळे कोणत्याही प्रकारची शंका बाळगण्याचे कारण नाही.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, गुजरात सरकार, महाराष्ट्र सरकार व केंद्र सरकार यांनी केलेला एमओयू रद्द करणार का ? गुजरातला एक थेंबही पाणी देणार नाही असा सभागृहाचा ठराव घेणार का ? गेली 2 महिने मी हे पाणी कसे आणायचे या संदर्भातील अभ्यास करीत आहे. माझ्या पक्षाचे 60-70 कार्यकर्ते यावर काम करीत आहेत. सदर बाबतीतील चर्चा एका लक्षवेधी सूचनेने होणार नाही. राज्य शासनाने केलेला एमओयू विधानपरिषद सभागृहाला न विचारता केला आहे, तो रद्द करण्यात येणार आहे का ? सभापती महोदय, आपण एकमताने जो ठराव केला आहे त्या ठरावाला शासन संमती देणार आहे का ? 133 टीएमसी पाणी आहे. 600 मीटर उंची आहे. आपल्याला ते पाणी साडे सहाशे मीटर लिफ्ट करावे लागेल. कृष्णा खोऱ्यातील पाणी कोठून सोडायचे, कोकणातील पाणी लिफ्ट करून वर आणायचे असे तुम्ही म्हणता. मात्र त्या ठिकाणीही तेवढीच उंची आहे. माननीय मंत्र्यांनी चार्ज घेऊन 2-3 महिने झाले आहेत. तुम्हाला तेथे खर्च परवडत आहे, विजेचे बिल परवडत आहे, मग येथे का परवडत नाही ? आपण 133 टीएमसी पाणी गोदावरी पात्रात सोडले तर संपूर्ण नांदेडपर्यंत हे पाणी जाईल. 36500 हेक्टर जमीन मराठवाड्यात येत आहे. 75 हजार कोटी रूपयांचा याला खर्च होणार आहे. हा अधिकाऱ्यांचा

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंत प्र. पाटील ....

अहवाल आहे, त्याचीच माहिती घेऊन मी येथे सांगत आहे. 75 हजार कोटी रूपये खर्च आहे, तो पैसा कोठून आणायचा, हे आम्ही तुम्हाला सांगतो. आपण या संदर्भात चर्चा करावी.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, पाण्याचा विषय अतिशय महत्वाचा आहे. पाणी गुराजतला जात आहे हे महत्त्वाचे नसून, मराठवाड्यात ते पाणी येणार आहे हे महत्त्वाचे असल्यामुळे यावर चर्चा घेण्यात यावी. आता होत असलेल्या लक्षवेधी सूचनेच्या चर्चेतून काहीही निष्पन्न होणार नाही. आपण या संदर्भात वेगळी चर्चा घडवून आणावी, असे मी सांगत आहे.

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील आणि सन्माननीय मंत्री श्री.दिवाकरजी रावते साहेबांनी या संदर्भात आपण एक चर्चा घडवून आणावी, असे मत व्यक्त केले आहे. या लक्षवेधी सूचनेवरील चर्चेदरम्यान मंत्री महोदयांनी अपेक्षित उत्तरे दिली असली तरीही उत्तर महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील सर्वसामान्य माणसाच्या मनामध्ये असलेल्या शंकांचे निरसन या उत्तरातून झालेले नाही. म्हणून माझी अशी विनंती आहे की, या विषयासंबंधी, याच अधिवेशनात आपण एक चर्चा घडवून आणावी.

श्री.गिरीश महाजन : सभापती महोदय, आम्ही या लक्षवेधी सूचनेला उत्तर देत आहोत. हा प्रश्न केवळ गुजरातला पाणी जाणार आहे, एवढ्यापुरताच मर्यादित नाही.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, मंत्री महोदयांच्या उत्तराने समाधान झालेले नाही, असे आम्ही म्हणालेलो नाही. परंतु, उत्तर महाराष्ट्र, गोदावरी खोऱ्यातील आणि मराठवाड्यातील सर्वसामान्य माणसाच्या मनामध्ये असलेल्या शंकांचे निरसन झाले पाहिजे. लघवेधी सूचनेवरील चर्चेच्या माध्यमातून या शंकांचे निरसन होणार नाही. म्हणून याच अधिवेशनात, या विषयावर एक चर्चा आपण घडवून आणावी, अशी मागणी आम्ही करीत आहोत.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी या प्रश्नाला उत्तर देत असताना व्यापक स्वरूपाची माहिती दिली आहे, त्यांनी काहीही लपवून ठेवण्याचा प्रयत्न केलेला नाही. परंतु, आजही लोकांच्या मनामध्ये मोठ्या प्रमाणावर शंका आहेत. मधुबन प्रकल्पाची बाब पुढे आली नसती तर कोणाच्याही मनामध्ये शंका निर्माण झाली नसती. मंत्री महोदयांनी कितीही पत्रे लिहिली तरी त्या पत्रांचे उत्तर काय येईल, हे आम्हाला माहीत नाही. महाराष्ट्राचे पाणी आपण गुजरातला जाऊ देणार आहात का ? माझे एकच म्हणणे आहे की, या चर्चेच्या माध्यमातून सर्व शंकांचे निरसन झालेले नाही. त्यामुळे या संदर्भातील वेगळी चर्चा आपण लावावी आणि शासनाने या संदर्भातील स्पष्ट भूमिका या सदनात घ्यावी. या सभागृहाने एकमताने ठराव मंजूर करावा की, महाराष्ट्राचे एक थेंब पाणी गुजरातला देणार नाही. यासाठी आपण एक चर्चा लावावी, अशी आम्हा सर्व सन्माननीय सदस्यांची मागणी आहे. या सदनात या संदर्भातील चर्चा लावली पाहिजे.

श्री.गिरीश महाजन : सभापती महोदय, हा अतिशय महत्त्वाचा प्रश्न आहे. सर्व सन्माननीय सदस्यांच्या भावना आम्ही समजावून घेतल्या आहेत. सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नांची मुद्देसूद उत्तरे

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गिरीश महाजन........

राज्यमंत्री महोदयांनी दिलेली आहेत. तांत्रिक माहिती देखील त्यांनी दिलेली आहे. मी पुन्हा एकदा सांगतो की, महाराष्ट्रातील एक थेंबही पाणी गुजरातला दिले जाणार नाही. आपण चिंता करु नये. एक थेंबही पाणी जाऊ देणार नाही, हे मी वारंवार सांगितले आहे. मुख्यमंत्री महोदयांनी देखील सांगितले आहे. वर्षानुवर्षे हे पाणी गुजरातकडे जात होते. आता केंद्र शासनाने असा निर्णय घेतला की, नदीजोड प्रकल्प राबवयाचा आहे. या योजनेसाठी केंद्र सरकार निधी देणार आहे. आतापर्यंत हे सर्व पाणी वाहून जात होते. 5 वर्षापूर्वी तत्कालीन सरकारने केवळ डीपीआरसाठी एमओयु केला आहे. या संदर्भात नारपार-तापीच्या बाबतीत फक्त पीएफआर झालेला आहे. डीपीआरसाठी टेंडर काढले आहे. आता टेंडर होईल, डीपीआर होईल आणि त्यानंतर त्यामधून काय समोर येईल, तो नंतरचा विषय आहे. दमणगंगा, पिंजाळच्या बाबतीत डीपीआर झालेला आहे. परंतु, त्याबाबतीत कोणत्याही वाटाघाटी झालेल्या नाहीत, कोणताही करार झालेला नाही. विनाकारण पाणी चालले, पाणी दिले, असे बोलले जात आहे. म्हणून माझे असे म्हणणे आहे की, अर्ध्या तास चर्चेतून किंवा दोन तासाच्या चर्चेतून हा प्रश्न सुटणार नाही. सर्व संबंधित अधिकाऱ्यांच्या उपस्थित या संदर्भातील एक सादरीकरण मी आपणास देण्यास तयार आहे. या संदर्भातील सर्व तांत्रिक बाबी आपल्याला समजावून सांगण्यास तयार आहे. हा विषय आपण सर्वांनी समजून घ्यावा. सभागृहाच्या बाहेर एक सादरीकरण आपण ठेवू. ज्याप्रमाणे या विषयी आपल्याला काळजी आहे, त्याप्रमाणे ती आम्हालाही आहे. किती वर्ष पाणी वाहून चालले आहे. पण आपण काहीही केलेले नाही. 20 टीएमसी पाणी मुंबईला मिळणार आहे, 10 टीएमसी पाणी मराठवाड्याला मिळणार आहे. म्हणून माझे म्हणणे असे आहे की, आपण सादरीकरण बघावे, सर्व तांत्रिक बाबी समजावून घ्याव्यात. ही लक्षवेधी सूचना राखून ठेवण्याची काहीही आवश्यकता नाही.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, सादरीकरण पहाण्याची आमची तयारी आहे. पण तत्पूर्वी आपण या संदर्भात सभागृहात चर्चा करु आणि नंतर मग आमच्या शंकांचे निरसन करण्यासाठी सादरीकरण पाहू. सभागृहात चर्चा केल्याने काय बिघडणार आहे ? मंत्री महोदयांनी सविस्तरपणे उत्तर देण्याचा प्रयत्न नक्की केलेला आहे. वर्षानुवर्षे हे पाणी वाहून जात आहे,

आम्ही काहीच केलेले नाही, अशी वस्तुस्थिती नाही. मुंबई महानगरपालिकेने ज्यावेळी राज्य

...3...



श्री.सुनील तटकरे........

सरकारकडे प्रस्ताव पाठविला त्यावेळी महानगरपालिकेच्या खर्चातून हा प्रकल्प कार्यान्वित करण्याची परवानगी मी जलसंपदा मंत्री असताना दिली होती. तेथील पाणी वाया जात आहे, ही वस्तुस्थिती आहे. देशातील अनेक राज्यातील डोंगर असलेल्या ठिकाणचे पाणी वाहून जात आहे. हे पाणी अडविण्याची आर्थिक तयारी नसल्यामुळे हे होत आहे. परंतु, मुंबई महानगरपालिकेला हा प्रकल्प कार्यान्वित करण्याची परवानगी मी जलसंपदा मंत्री असतानाच दिलेली आहे. या विषयामध्ये आणखी दोन-तीन मुद्यांबाबतचे उत्तर मिळालेले नाही. चर्चा यासाठी घेणे आवश्यक आहे. उत्तरात असे नमूद केले आहे की, "अव्यवहार्य उपसा उंचीमुळे उर्वरित पाणी गोदावरी/गिरणा खोऱ्यात वळविणे व्यवहार्य ठरत नाही. सदर पाणी सध्या नैसर्गिकरित्या अरबी समुद्रात वाहून जात आहे. सदर अरबी समुद्रात वाहून जाणारे पाणी गुजरातला देऊन तेवढेच गुजरातच्या हिश्याचे पाणी तापी खोऱ्याच्या महाराष्ट्रातील भागास मिळविणेबाबत शासन प्रयत्नशील आहे." याच मुद्यावर सर्व सन्माननीय सदस्यांचा आक्षेप आहे. याचा अर्थ असा आहे आणि शासनाने हे कबूल केले आहे की, या खोऱ्यातील पाणी गुजरातला देऊन तापीचे पाणी आपल्या राज्याकडे वळविण्यासाठी आपण प्रयत्नशील आहोत. असे उत्तरातच म्हटले आहे. म्हणूनच सर्वंकष चर्चेची गरज आहे. एवढ्या मोठ्या उंचीवरुन पाणी उचलणे व्यवहार्य ठरु शकणार नाही, हे आम्हालाही मान्य आहे. आज लोकांची आवश्यकता काय आहे, भर कशावर आहे ? गोदावरी खोरे हे तुटीचे खोरे आहे. तापी खोऱ्यातील पाणी मिळवून गोदावरी खोऱ्यात टाकल्याने गोदावरी खोऱ्याची तुट जात नाही. नैसर्गिकरित्या गोदावरी खोऱ्यातील पाणी गुजरातला देऊन त्यामधून तापी खोऱ्यातील पाणी घेण्याचा प्रयत्न आपण करीत आहोत. यामधून मराठवाड्याची पाण्याची तहान, नाशिक जिल्ह्यातील लोकांची गरज पूर्ण होत नाही. म्हणून अशी विनंती आहे की, या संदर्भात सभागृहात सविस्तर चर्चा करावी. सादरीकरणाबाबत त्यांनी जी घोषणा केली आहे, त्याबाबत मी त्यांचे आभार मानतो.

श्री.गिरीश महाजन : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे हे असे म्हणत आहेत की, गोदावरी हे तुटीचे खोरे आहे. हे अगदी खरे आहे. आपणही या खात्याचे मंत्री होता. मला आपण असे सांगा की, 714 मीटर म्हणजे 3 स्लॅबने हे पाणी उचलायचे आहे. हे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

कोणत्या गणितामध्ये बसते ? 25500 रुपये प्रति हेक्टर एवढा इलेक्ट्रिसिटी बिलाचा खर्च आहे.

...4....



श्री.गिरीश महाजन........

बाकी मेंटेनन्स आणि सर्व खर्च लक्षात घेता 50 हजार प्रति हेक्टर खर्च करुन पाणी उचलणे व्यवहार्य आहे का ? जगाच्या पाठीवर हे कोठेही व्यवहार्य नाही. सादरीकरण करण्यास मी तयार आहे, त्या माध्यमातून आपण सर्वांनी हा प्रश्न समजावून घ्यावा, अशी माझी विनंती आहे.

यानंतर श्री.वि.खर्चे......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. गिरीश महाजन..

यात आणखी काही अडचणी असतील तर दोन किंवा तीन दिवसात या संदर्भातील सादरीकरण करण्यात येईल. त्यानंतर या संदर्भातील सविस्तर माहिती सर्व सन्माननीय सदस्यांना मिळू शकेल.

**तालिका सभापती** : सभागृहाची इच्छा अशी दिसते की, महाराष्ट्रातील पाण्याचा प्रत्येक थेंब महाराष्ट्रातील जनतेपर्यंत पोहचला पाहिजे. कारण अर्धा महाराष्ट्र तहानलेला आहे, मराठवाड्याचा भाग तहानलेला आहे, अनेक वेळा याबाबत चर्चा केलेली आहे. महाराष्ट्राचे पाणी महाराष्ट्रातील सर्व भागांपर्यंत पोहचविण्याबाबत चर्चेतून चांगल्या सूचना येणार असतील तर या संदर्भातील चर्चा सभागृहात झाली पाहिजे. या व्यतिरिक्त जे सादरीकरण मंत्री महोदय करु इच्छित आहेत, ते सादरीकरण देखील सदस्यांनी पहावे. मंत्री महोदयांनी माननीय सभापती यांच्याशी चर्चा करुन सादरीकरण करण्याची वेळ ठरवावी. त्याचप्रमाणे या संदर्भातील चर्चेची वेळ माननीय सभापती यांच्याशी चर्चा करुन निश्चित करण्यात येईल. सभागृहातील प्रत्येक सन्माननीय सदस्यांना सादरीकरण समजून घ्यावयाचे आहे, या सभागृहाचा प्रत्येक सदस्य अत्यंत अभ्यासू आहे. त्यामुळे महाराष्ट्राचा फायदा होईल. ही चर्चा योग्य प्रकारे व्हावी अशी माझी इच्छा आहे.

श्री.गिरीश महाजन : सभापती महोदय, आपण केलेल्या सूचनांप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

--------------

**<u>अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेबाबत</u>**

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, माझी आपणाला विनंती आहे की, आज कामकाज पत्रिकेमध्ये अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा दर्शविलेली आहे, ती अत्यंत महत्वाची आहे. आज ती वेळे अभावी होणे शक्य नाही असे मला वाटते. शुक्रवारचा दिवस अशासकीय कामकाजाचा आहे, चार वाजता अशासकीय कामकाज हक्काने सुरु करण्यात येते. त्यामुळे अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा सोमवारी व मंगळवारी अशी दोन दिवस घ्यावी अशी माझी विनंती आहे.

**तालिका सभापती** : ठीक आहे.

-----

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : अमळनेर बस आगारात अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळे प्रवाशांची होणारी गैरसोय

**मु.शी.** : अमळनेर बस आगारात अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळे प्रवाशांची होणारी गैरसोय यासंबंधी श्रीमती स्मिता वाघ, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्रीमती स्मिता वाघ (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय परिवहन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

***"अमळनेर (जि.जळगाव) बस आगारात बसेस उपलब्ध असूनही कर्मचाऱ्यांच्या अभावी प्रवाशांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात उघडकीस येणे, अमळनेर-पारोळा दरम्यान प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या जास्त असून यात विद्यार्थ्यांचाही समावेश असणे, अपूर्ण कर्मचाऱ्यांमुळे बस फेऱ्या पूर्ण होत नसणे, अमळनेर बस स्थानकात सद्य:स्थितीत १७५ चालक आणि १६८ वाहक असणे, बस आगारात प्रवाशांच्या सोयीसाठी ७७ बसेस उपलब्ध असणे, दिवसभरातून शेड्युल्डनुसार कर्मचाऱ्यांना ७९ फेऱ्या पूर्ण कराव्या लागणे, यात कर्मचाऱ्यापैकी काहींना डबल ड्यूटीला सामोरे जावे लागणे, त्याचप्रमाणे पुरेसे कर्मचारी नसल्याने चालक, वाहक यांचा लिपिक म्हणून वापर करावा लागणे त्यामुळे कर्मचारी वाहक व चालक मानसिक तणावाखाली काम करीत असणे, या सर्व बाबींचा विचार करुन कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याची आवश्यकता, त्याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, परिणामी कर्मचारी, वाहक व चालकांत पसरलेला तीव्र असंतोष, पदे भरण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची तातडीची कार्यवाही, याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया."***

श्री.दिवाकर रावते (परिवहन मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

------

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती स्मिता वाघ : सभापती महोदय, जळगांव जिल्ह्यातील अमळनेर तालुक्यातील बस आगारात बसेस उपलब्ध असून कर्मचाऱ्यांच्या अभावी प्रवाशांची गैरसोय होत आहे. पुरेसे कर्मचारी नसल्यामुळे चालक आणि वाहकांना लिपिक आणि वाहतूक नियंत्रक म्हणून काम करावे लागते. अमळनेर बस आगारात सध्या 175 चालक व 168 वाहक आहेत, बस आगाराच्या प्रवाशांच्या सोईसाठी 77 बसेस आहेत. दिवसभराच्या कर्मचाऱ्यांच्या शेड्यूलनुसार कर्मचाऱ्यांना 79 फेऱ्या पूर्ण कराव्या लागतात. उपलब्ध कर्मचाऱ्यांना डबल ड्यूटीला सामोरे जावे लागते. कर्मचाऱ्यांची संख्या कमी असल्यामुळे शाळेतील विद्यार्थी व प्रवाशांची फार मोठी गैरसोय होत आहे. कर्मचाऱ्यांना डबल ड्यूटी लागल्यामुळे कर्मचारी उपलब्ध होत नाहीत. विद्यार्थ्यांनी पासेस काढलेले असतात व अशा वेळी बस रद्द झाली तर खाजगी वाहनाने त्यांना प्रवास करावा लागतो. त्यांच्यावर विनाकारण आर्थिक भार पडतो. अमळनेर बस आगारातील रिक्त पदे किती दिवसात भरण्यात येतील याचे उत्तर मंत्री महोदय देतील काय ?

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नानुसार अमळनेर आगारात 350 पासधारक विद्यार्थी आहेत. त्यांच्याकरिता सकाळी 6 ते 7 वाजेपर्यंत 19 बस फेऱ्या सुरु आहेत, या सर्व विद्यार्थ्यांची व्यवस्था होत आहे. कर्मचाऱ्यांच्या संख्येबाबत वाहतूक आदेशाप्रमाणे 204 चालक व 203 वाहक यापैकी 175 नियुक्त करण्यात आले आहेत. 65 उपलब्ध आहेत, 29 चालक व 38 वाहक कमी आहेत. बस फेऱ्या वाढविण्याकरिता त्यांना अतिरिक्त काम देऊन आवश्यक त्या बस फेऱ्या पूर्ण करण्यात येतात. 84 वाहनांची आवश्यकता असून तेवढी वाहने उपलब्ध आहेत. सन्माननीय सदस्यांच्या सूचनेप्रमाणे रिक्त पदांची भरती लवकरात लवकर करण्यात येत आहे. सन 2012 च्या सरळसेवा भरतीप्रमाणे जळगांव विभागात 404 चालक कनिष्ठ, 356 वाहक कनिष्ठ, 75 लिपीक टंकलेखक व 70 सहाय्यक कनिष्ठ यांची नियुक्ती करण्यात आली आहे. एकंदरीत प्रमुख कारागीर क-वर्गात कनिष्ठ 6 आणि 125 नियुक्त करण्यात आले आहेत. सन 2012 मध्ये अमळनेर आगारात 45 चालक कनिष्ठ, 29 वाहक व तीन लिपिक टंकलेखक कनिष्ठ, 5 सहाय्यक कनिष्ठ, तसेच सन 2014 मध्ये सहाय्यकाची 11 पदे नियुक्त करण्यात आली आहेत. उर्वरित पदे भरण्याची कार्यवाही सुरु असून ती पदे लवकरात लवकर भरण्यात येतील.

...5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, माझा प्रश्न कदाचित या प्रश्नांशी संबंधित नसेल, माननीय परिवहन मंत्री संवेदनशील आहेत, विद्यार्थ्यांच्या हिताचा प्रश्न आहे, परिवहन महामंडळाशी संबंधित आहे. विद्यार्थ्यांना शाळेत येण्यासाठी व शाळेतून परत घरी जाण्यासाठी बस आगारातील काही ठिकाणी मासिक पास तर काही ठिकाणी त्रैमासिक पास दिला जातो. दरमहा किंवा दर दोन महिन्यांनी पास काढण्यासाठी जावे लागते, त्यासाठी सुटी घ्यावी लागते, पालकांना त्यांच्या सोबत जावे लागते. साधारण दहा महिने शाळा असते, हा सर्व व्याप टाळण्यासाठी दहा महिन्यांचा सवलतीचा पास परिवहन महामंडळाकडून विद्यार्थ्यांना देण्याबाबत मंत्री महोदय दखल घेतील काय ?

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनेची दखल घेण्यात आली असून याबाबत छाननी करुन योग्य निर्णय घेण्यात येईल.

श्री.ख्वाजा बेग : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या निमित्ताने मी एवढेच विचारु इच्छितो की, ज्या जिल्ह्याचा कर्मचारी असेल, त्याला त्याच जिल्ह्यात ड्यूटी दिली पाहिजे. यवतमाळचा कर्मचारी गोंदियाला कार्यरत आहे, गोंदियाचा कर्मचारी जळगांव येथे कार्यरत आहे. त्यामुळे या कर्मचाऱ्यांना सोई सुविधा देणे अडचणीचे होते. यामुळे कर्मचाऱ्यांची गैरसोय होते, याबाबत मंत्री महोदयांनी लक्ष घालावे. खाजगी ट्रान्सपोर्ट व्यवसाय फायद्यात आहे, एसटी महामंडळ तोट्यात आहे. त्यामुळे ज्या जिल्ह्याचा कर्मचारी त्याच जिल्ह्यात नियुक्त करण्याबाबत मंत्री महोदय दखल घेतील काय ?

श्री.दिवाकर रावते : सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला प्रश्न अयोग्य आहे, असे मी म्हणणार नाही. वाहतूक सुरु करण्यासाठी ज्या नियुक्त्या झालेल्या आहेत, त्यामुळे शक्यतोवर ज्या जिल्ह्याचा कर्मचारी असेल, त्या जिल्ह्यात त्याची नियुक्ती करावी, असा प्रयत्न विभागाकडून सुरु केलेला आहे. याबाबत योग्य त्या सूचना देण्यात आल्या आहेत. आपणाला कल्पना असेल की, आता जिल्हावाईज जाहिरात देण्यात आली आहे, त्यामुळे पुन्हा बदल्यांचा प्रश्न निर्माण होणार नाही. याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे.

----

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : अकोला शहरातील पाणी पुरवठा योजना चालविण्याकरिता अकोला महानगरपालिकेकडे मनुष्यबळ व निधीची कमतरता असणे

**मु.शी.** : अकोला शहरातील पाणी पुरवठा योजना चालविण्याकरिता अकोला महानगरपालिकेकडे मनुष्यबळ व निधीची कमतरता असणे यासंबंधी श्री.गोपीकिसन बाजोरिया, ॲड.अनिल परब,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

ॲड.अनिल परब (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

***"अकोला मनपाकडे असलेली अकोला शहरातील पाणीपुरवठा योजना चालविण्याकरिता अपुरे मनुष्यबळ व निधीची कमतरता असणे, सद्य:स्थितीत पाणी पुरवठ्याची पाईपलाईन अत्यंत जुनाट व तुटलेली असल्याने वितरण व्यवस्था विस्कळीत असणे, त्यामुळे शहराला अनियमित पाणीपुरवठा होत असणे, योजना राबविण्यासाठी स्थापत्य, विद्युत व तांत्रिक अभियंत्यांची अकोला मनपाकडे कमतरता असणे, दिनांक १० जून, २०१२ च्या सुमारास अकोला महानगरपालिकेने अकोला शहर पाणीपुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्याचा ठराव केलेला असणे, मजीप्राच्या दिनांक २६ फेब्रुवारी, २०१३ च्या संचालक मंडळाच्या १२७ व्या बैठकीत अकोला शहर पाणी पुरवठा योजना ३० वर्षासाठी मजीप्राने हस्तांतरित करुन घेण्यावर एकमत होणे, सर्व्हे करुन निर्णय घेण्यासाठी तांत्रिक सल्लागार म्हणून दिल्ली येथील श्रेयी एजन्सीची नेमणूक करण्यात येणे, एजन्सीने प्राथमिक अहवाल व क्षेत्रीय अहवाल सादर केल्याची माहिती तत्कालीन मुख्यमंत्र्यांना दिली असणे, मा.आयुक्त, अकोला मनपा यांनी पंपिंग मशिनकरिता ४ कोटी व वितरण व्यवस्थेकरिता ६ कोटी असे एकूण १० कोटी रु. देण्याचे मान्य केले असणे, शासनाने सुध्दा या योजनेबद्दल सकारात्मक भूमिका घेतलेली नसणे, यावर शासनाने त्वरित करावयाची कार्यवाही, प्रतिक्रिया व भूमिका."***

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.बबनराव लोणीकर (पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

------

...8...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, अकोला शहराला पाणी पुरवठा करणारी योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून सन 2006 मध्ये महानगरपालिकेकडे हस्तांतरित करण्यात आली आहे. सदर योजना हस्तांतरित करण्यात आली तरी दैनंदिन दुरूस्तीसाठी आवश्यक मनुष्यबळ देण्यात आलेले नाही. ही पाणी पुरवठा योजना सुरळीत व नियमित करण्यासाठी एक कार्यकारी अभियंता, दोन उप अभियंते तसेच फिटर असे मनुष्यबळ महानगरपालिकेला देणार आहात काय ? जुनी व कालबाह्य झालेली पाईपलाईन दुरूस्ती करण्यासाठी निधीची आवश्यकता आहे तो निधी देण्यात येईल काय ?

श्री.बबनराव लोणीकर : सभापती महोदय, सदर पाणी पुरवठा योजना चालविण्याची जबाबदारी महानगरपालिकेची आहे. महानगरपालिकेने ही योजना सुरळीत चालवावी. ज्युनिअर इंजिनिअर, डेप्युटी इंजिनिअर किंवा कार्यकारी अभियंता यांची मागणी महानगरपालिकेने केल्यास त्यांना तांत्रिक मनुष्यबळ पुरविण्यात येईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब यांनी विचारल्याप्रमाणे कार्यकारी अभियंता, उप अभियंता व कनिष्ठ अभियंता ही पदे रिक्त आहेत, मंत्री महोदयांनी सांगितले की, अकोला महानगरपालिकेने मागणी केली तर ती पदे उपलब्ध करुन देण्यात येतील. 20 जून 2012 रोजी अकोला महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत झालेल्या चर्चेनुसार सदर पाणी पुरवठा योजना स्त्रोतपासून थेट ग्राहकांपर्यंत दैनंदिन देखभाल दुरूस्तीसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे हस्तांतरित करावी असा ठराव करण्यात आला आहे. त्याचे कारण असे आहे की, अकोला महानगरपालिका ही योजना चालवू शकत नाही. आज तेथील लोकांना चार ते पाच दिवस पिण्याचे पाणी मिळत नाही.

या नंतर श्री.बोरले....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**( सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.रामनाथ मोते )**

श्री.पांडुरंग फुंडकर.........

त्या ठिकाणी असलेली पाण्याची पाईप लाईन फुटलेली आहे, पाणी पट्टीमध्ये लक्षणीय तूट आहे, अनधिकृत नळ धारकांची संख्या मोठ्या संख्येने आहे. त्यामुळे ही पाणी पुरवठा योजना तोट्यात गेलेली आहे. अकोला महानगरपालिकेने 3 कोटी 54 लाख रुपयांच्या सुधारणा कामांबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केलेला आहे. ही योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने चालविण्यासाठी घ्यावी असा ठराव महानगरपालिकेने केला. परंतु दिनांक 3 मार्च, 2015 रोजी झालेल्या बैठकीत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने ही योजना देखभाल दुरूस्तीसाठी ताब्यात घेणे योग्य ठरणार नाही, असे मत व्यक्त केलेले आहे. ही योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणही चालविणार नाही, महानगरपालिकाही चालविणार नाही, तर मग जनतेला पाणी कसे मिळणार ? अकोला येथील जनतेला किमान दोन दिवसातून पिण्याचे पाणी मिळेल यासाठी शासन कोणती व्यवस्था करणार आहे ?

श्री.बबनराव लोणीकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी पाण्याची पाईप लाईन नादुरूस्त आहे, देखभाल दुरूस्तीसाठी तांत्रिक मनुष्यबळ नाही, असा प्रश्न उपस्थित केलेला आहे. मी मघाशी सांगितले की, महानगरपालिकेने त्यासाठी लागणाऱ्या मनुष्यबळाची मागणी केल्यास ते उपलब्ध करुन देण्यात येईल. दुसरा प्रश्न दुरूस्तीच्या संदर्भातील आहे. महानगरपालिकेने दुरूस्तीच्या संदर्भात नगरोत्थानमध्ये प्रस्ताव पाठविल्यास नगर विकास विभागाकडून त्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले की, हा प्रस्ताव नगरोत्थान अंतर्गत घेण्याचे ठरविले आहे. महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियान आता बंद होणार आहे आणि महानगरपालिकेने 3 कोटी 54 लाख रुपये या अंतर्गतच मागितलेले आहेत. माझा प्रश्न असा आहे की, अकोला महानगरपालिकेला हे 3 कोटी 54 लाख रुपये किती दिवसात देण्यात येणार आहेत ?



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.बबनराव लोणीकर : सभापती महोदय, खरे तर ही जबाबदारी महानगरपालिकेची आहे. ही योजना नियमाप्रमाणे महानगरपालिकेनेच चालविली पाहिजे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला महानगरपालिकेकडून 400 कोटी रुपये येणे आहेत. या संदर्भात महानगरपालिकेला वारंवार विनंती करण्यात आलेली आहे. परंतु, महानगरपालिकेने हा निधी दिलेला नाही. आता ही योजना महानगरपालिका चालवित आहे. ही योजना नीट चालविणे ही महानगरपालिकेची जबाबदारी आहे. महानगरपालिका क्षेत्रात जवळपास 60 हजार नळ जोडण्या आहेत. त्यापैकी फक्त 34 हजार अधिकृत नळ जोडण्या आहेत. उर्वरित लोक नियमबाह्य पद्धतीने पाणी घेत आहेत. म्हणून महानगरपालिकेने आपल्या व्यवस्थापनात सुधारणा करुन ही योजना नीट चालविली पाहिजे. आता ही जबाबदारी प्रामुख्याने महानगरपालिकेची आहे. मी मघाशी सांगितले की, दुरुस्तीच्या संदर्भात नगरोत्थान अंतर्गत प्रस्ताव दिल्यास नगर विकास विभागाकडून निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

श्री.महादेव जानकर : सभापती महोदय, मी जालना महानगरपालिका क्षेत्रातील पाणी पुरवठ्याबाबत प्रश्न उपस्थित करीत आहे. इंग्रजांच्या आणि निजामांच्या काळात जे तलाव आणि बंडिंग बांधण्यात आले होते ते मागील 20 वर्षात व्यवस्थित करण्यात आलेले नाहीत. जालना शहराला ज्या तलावातून पाणी पुरवठा होतो तो तलाव निजामांनी बांधला होता. त्या तलावातील गाळ काढला तर जालना शहराला 24 तास पाणी पुरवठा होऊ शकतो. म्हणून पाणी पुरवठा विभागाच्या माध्यमातून यासाठी तरतूद करण्यात येणार आहे काय ?

श्री.बबनराव लोणीकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न वेगळा असला तरी माझ्या जिल्ह्यातील आहे. घानेवाडी तलावात गाळ साठलेला आहे आणि तो गाळ काढल्यानंतर जालना शहराला पाणी मिळू शकते, असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. तलावातील गाळ काढण्यासाठी आमदार निधीतून निधी देण्याचेही त्यांनी मान्य केलेले आहे. त्यांनी तसे पत्र दिले तर आम्ही जलसंधारण महामंडळाकडून या तलावातील गाळ काढण्याचे काम हाती घेऊ.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी अतिशय स्पष्ट आणि व्यवस्थित उत्तर दिलेले आहे. मंत्री महोदयांनी सांगितले की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची महानगरपालिकेकडे

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विक्रम काळे.........

जवळपास 400 कोटी रुपये थकबाकी आहे. ही रक्कम कमी नाही. त्यामुळे यामध्ये अडचणी येत आहेत. शेवटी, हा पाणी पुरवठ्याचा प्रश्न आहे. तेथील जनतेला पाणी कसे उपलब्ध करुन देता येईल याबाबत तातडीची उपाययोजना करण्यासाठी नजीकच्या काळात शासनामार्फत कोणते ठोस पाऊल उचलण्यात येणार आहे ?

श्री.बबनराव लोणीकर : सभापती महोदय, मी मघाशीच सांगितले की, ही जबाबदारी महानगरपालिकेचीच आहे. पाईप लाईनची दुरुस्ती करणे, अनधिकृत नळ जोडण्या तोडणे, देखभाल दुरुस्ती करणे ही महानगरपालिकेची जबाबदारी आहे. शेवटी, छोट्या-छोट्या ग्रामपंचायती पाणी पुरवठा योजना चालवितात, ही तर महानगरपालिका आहे. महानगरपालिकेकडे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे 400 कोटी रुपये थकीत आहेत. ही योजना चालविण्याची जबाबदारी महानगरपालिकेची आहे, त्यांनी ती नीट चालवावी. त्यासाठी लागणारे मनुष्यबळ, ज्युनिअर इंजिनिअर, डेप्युटी इंजिनिअर किंवा कार्यकारी अभियंता आहेत. यासाठी जे मनुष्यबळ लागेल ते पुरविण्याची विभागाची तयारी आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, अकोला महानगरपालिकेकडे असलेल्या पाणी पुरवठा योजनेच्या संदर्भातील ही लक्षवेधी सूचना आहे. अकोला शहर पाणी पुरवठा योजनेसाठी एकूण किती अधिकारी, कर्मचारी कार्यरत आहेत आणि किती रिक्त पदे आहेत ? मघाशी मंत्री महोदयांनी सांगितले की, 24 हजार अनधिकृत कनेक्शन्स आहेत. जे अनधिकृत कनेक्शन्स आहेत त्याबाबतीत आपण महानगरपालिकेला कारवाई करावयास सांगणार आहात काय ? कारण, अधिकृत कनेक्शन धारकांना देखील व्यवस्थित पाणी मिळत नाही. जे अनधिकृत कनेक्शन धारक आहेत ते पैसे भरुन अधिकृतरित्या पाण्याची मागणी करीत असतील तर ते अनधिकृत कनेक्शन्स अधिकृत करुन घेण्याबाबत आपण महानगरपालिकेला आदेशीत करणार आहात काय ?

श्री.बबनराव लोणीकर : सभापती महोदय, मी काल आयुक्तांबरोबर चर्चा केलेली आहे. जी अनधिकृत कनेक्शन्स आहेत ती कट करणे आणि सर्वसामान्य लोकांच्या पिण्याच्या पाण्याची व्यवस्था

..4...

श्री.बबनराव लोणीकर........

करणे, अशा प्रकारच्या सूचना आयुक्तांना देण्यात आलेल्या आहेत. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी या संदर्भात प्रश्न उपस्थित केलेला आहे. त्याबाबत मी सांगू इच्छितो की, देण्यात येतील आणि लोकांना पाणी उपलब्ध करुन देण्याबाबत महानगरपालिकेला सूचना देण्यात येतील. तसेच, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी महानगरपालिकेकडे कर्मचाऱ्यांची संख्या अपुरी आहे असा प्रश्न उपस्थित केलेला आहे. या संदर्भात माहिती घेऊन ती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.गोपीकिसन बाजोरिया यांनी अकोला महानगरपालिकेच्या संदर्भातील प्रत्येक प्रश्न सभागृहात उपस्थित केलेला आहे. अकोला महानगरपालिकेच्या प्रत्येक विभागाचे कामकाज बघितले तर ही अतिशय अकार्यक्षम महानगरपालिका आहे, हे लक्षात येते. त्यामुळे अकोला महानगरपालिकेचे कोणतेच प्रश्न सुटत नाहीत. ज्यावेळी महानगरपालिका किंवा नगरपालिका अस्तित्वात येते त्यावेळी दिवाबत्ती, पाणी पुरवठा, स्वच्छता इत्यादी सुविधा उपलब्ध करुन देणे हे त्यांचे प्राथमिक कर्तव्य असते आणि या मूलभूत गरजांकडेच दुर्लक्ष होत असेल तर महानगरपालिकेचा दर्जा मिळवून देखील त्या शहरातील नागरिकांच्या जीवनमानात कोणताही फरक पडत नाही. उलट तेथील नागरिकांचे जीवनमान दिवसेंदिवस घसरत जाते. पुरेसा पाणी पुरवठा न झाल्यामुळे आरोग्याचे, स्वच्छतेचे प्रश्न निर्माण होतात. त्यामुळे हा विषय केवळ पाणी पुरवठ्यापुरता मर्यादित नाही तर त्यातून आणखी काही नवीन प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असते. माझा प्रश्न असा आहे की, तेथे जी अनधिकृत कनेक्शन्स असतील, देखभाल दुरूस्ती असेल या सर्व बाबतील एक प्रयोग म्हणून या महानगरपालिकेत आपण एक विशेष दक्षता कक्ष तयार करावा. त्यासाठी कालावधी निश्चित करुन त्याचा कृती कार्यक्रम तयार केला तर त्यांची अकाऊंटिबिलिटी दिवसेंदिवस वाढती राहील आणि शासनाचा सहभाग हळूहळू कमी होईल. शासनाने या महानगरपालिकेसाठी अशा पद्धतीची एखादी नाविण्यपूर्ण योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला सोबत घेऊन तयार केली तरच या प्रश्नाची

..5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले.......

उकल होण्याची शक्यता आहे. नाही तर तेच तेच प्रश्न पुन्हा येतील, तीच तीच उत्तरे दिली जातील आणि नागरिकांचा कोणताही प्रश्न सुटणार नाही. त्यामुळे शासनाने या विषयाकडे अतिशय गांभीर्याने लक्ष देऊन त्या पद्धतीचा एक कृती कार्यक्रम अकोला महानगरपालिकेतील पाणी पुरवठ्यासाठी तयार करणार आहे काय ?

श्री.बबनराव लोणीकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे त्याबाबत सरकार निश्चितपणे विचार करेल.

--------

यानंतर श्री.भोगले........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** नियम स्थगित ठेवणे

**मु.शी.:** नियम स्थगित करण्याबाबत वित्त मंत्र्यांचा प्रस्ताव

श्री.दीपक केसरकर (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विधानपरिषद नियम 289 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो :-

"महाराष्ट्र विधानपरिषद नियमातील नियम 228(1) मधील सात दिवसांच्या कालावधीबाबतची तरतूद अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेच्या संदर्भात स्थगित करण्यात यावी."

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : औचित्याचे मुद्दे

**तालिका सभापती (श्री.रामनाथ मोते)** : आता औचित्याचे मुद्दे घेण्यात येतील.

श्री.जगन्नाथ शिंदे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"सभापती महोदय, ठाणे जिल्हयात चोरट्यांच्या दहशतीत वाढ होत असल्याचे पुन्हा एकदा निदर्शनास आले असून अंबरनाथ शहरात महालक्ष्मीनगर परिसरातील लक्ष्मी छाया इमारतीच्या चौथ्या मजल्यावर राहणाऱ्या कु.निहारिका साळुंखे या 22 वर्षीय तरूणीची धारदार शस्त्राने गळा कापून निर्घृण हत्या करुन घरातील किंमती ऐवज लंपास केल्याचे उघडकीस आले असून दिवसाढवळ्या भरवस्तीत घडलेली ही घटना, यातून पोलीस खात्याचा गुन्हेगारांवरील वचक कमी झाल्याचे पुन्हा एकदा समोर आलेले असणे, या घटनेची आजूबाजूला कुणाला पुसटशी कल्पना येणार नाही एवढ्या बेमालूमपणे चोरट्यांनी हे कृत्य केलेले असून ठाणे जिल्हयात यापूर्वी रात्री घडत असलेल्या घटना भरदिवसा घडू लागल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झालेले असल्याने ही बाब मी औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाच्या निदर्शनास आणून देत आहे."

-----

...3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"सभापती महोदय, राज्यात मोठया प्रमाणात इन्व्हेस्टमेंट व फायनान्स या सारख्या कंपन्या कार्यरत असणे, त्यातच चंद्रपूर जिल्हयात रिअल इस्टेटच्या विविध नावांनी 36 बनावट कंपन्या असून सदर कंपन्यांच्या माध्यमातून शहरातील लाखो ग्राहकांची फसवणूक केली जाणे, त्यातच कार्यरत असलेल्या सिकअस्त रिअल ॲग्रो लि., जी लाईफ कंपनी, रोझ व्हॅली कंपनी, कलमाम कंपनी, सनशाईन कंपनी, साईप्रसाद कंपनी, पीआयसीएल कंपनी, साई सुंदरम कंपनी, तिरुमला तिरुपती मल्टीस्टेट को-ऑ.क्रेडिट सोसायटी लि. अशा लिमिटेड कंपन्या कार्यरत असून सदर कंपन्यांकडून रिझर्व्ह बँक परवानगी किंवा नागरी पत संस्थेद्वारे रजिस्ट्रेशन न करता सर्रास रिअल इस्टेटचा व्यवसाय सुरु करुन नागरिकांकडून मासिक ठेव, आर.डी.मुदत ठेव, बचत खाते, दामदुप्पट अशा योजना राबवून लाखो रुपयांची ग्राहकांकडून गुंतवणुकीच्या माध्यमातून करीत असलेली मोठया प्रमाणात लूट, यावर शासनाने करावयाची कारवाई, त्याकरिता मी औचित्याच्या मुद्याद्वारे सदर विषय उपस्थित करीत आहे. मी या संदर्भात एस.पी.कडे अर्ज दिलेला आहे. त्याची चौकशी झालेली नाही. त्यामुळे लोकांची फसवणूक मोठया प्रमाणात होत आहे."

-------

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"सभापती महोदय, गेल्या काही वर्षापासून रायगड जिल्हयाच्या तीन तालुक्यातील 57 गावे दिल्ली मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडॉर प्रकल्पातून वगळूनही शेतकऱ्यांच्या 7/12 उताऱ्यावरील प्रकल्पाची नोंद अजूनही कायम असणे, सदर नोंद हटविण्याकरिता माननीय उद्योग मंत्री श्री.सुभाष देसाई यांची माहे फेब्रुवारी, 2015 मध्ये भेट घेऊन कृती समितीने लेखी निवेदन दिलेले असणे, त्या निवेदनानुसार सदरच्या नोंदी हटविण्याबाबत दिलेले आश्वासन, या आश्वासनाची पूर्तता करण्याची आवश्यकता असल्याने शासनाने तत्काळ निवेदन करावे.

सभापती महोदय, दिवेआगार एमआयडीसी प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न सोडवावेत म्हणून श्रीमती उल्का महाजन, कृती समितीचे श्री.संदेश कुळकर्णी, भाऊ सावंत यांनी उद्योगमंत्र्यांची भेट घेतली. मे, 2013 मध्ये त्या भागातील स्थानिक आमदार श्री.भरत गोगावले यांच्या समवेत ग्रामस्थांनी माननीय श्री.उध्दवजी ठाकरे यांची भेट घेऊन त्यांच्या लक्षात आणून दिले. शेतकऱ्यांच्या नावाने मुखत्यारपत्र घेऊन गुंतवणूकदारांनी गुंतागुंतीची परिस्थिती निर्माण केली होती. जमिनी घेतलेल्या व्यक्तींच्या नावावर जमिनी हस्तांतरित करण्यास गावातील शेतकऱ्यांचा विरोध आहे. तेथे सक्तीने जमिनी संपादित करण्यात येणार नाहीत अशा प्रकारचे आश्वासन उद्योगमंत्र्यांनी दिले आहे. सध्या विधिमंडळाचे अधिवेशन सुरु आहे. गेली दोन वर्षे 7/12 उताऱ्यावरील नोंदी हटविण्यात आलेल्या नसल्यामुळे 57 गावातील, प्रकल्पातून वगळलेल्या गावातील शेतकऱ्यांच्या 7/12 उताऱ्यावरील शिक्के हटविण्यात यावेत आणि उर्वरित 21 गावातील शेतकऱ्यांचा विरोध आहे तेथील जमिनी सक्तीने संपादित करण्यात येणार नाहीत या आश्वासनाची पूर्तता व्हावी, त्याची अंमलबजावणी अधिवेशन संपण्यापूर्वी करावी अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे विनंती करते."

-----

...5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"सभापती महोदय, भारताचे महामहिम राष्ट्रपती, भारत सरकार यांच्याकडून प्रत्येक वर्षाच्या प्रजासत्ताक आणि स्वातंत्र्यदिनाच्या दिवशी भारतातील सर्व राज्यातील पोलीस दलात शौर्याचे, उल्लेखनीय, गुणवत्तापूर्ण कामगीरी बजावणाऱ्या पोलीस अधिकारी व अंमलदारांना शौर्य, उल्लेखनीय आणि गुणवत्तापूर्ण कामगीरीबद्दल पोलीस पदक देऊन गौरविले जाते. सध्या राज्य शासनाने आदर्श शिक्षक पुरस्कार मिळविणाऱ्या शिक्षकांना, शिक्षिकेला त्यांच्या पती/पत्नी समवेत संपूर्ण महाराष्ट्रात राज्य परिवहन विभागाच्या सर्व गाडयातून मोफत प्रवास व रू.1,00,000/- (रुपये एक लाख) अनुदान दिले जाते. भारतातील काही राज्यांमध्ये सदर पदक प्राप्त पोलीस अधिकारी, अंमलदार यांना एक टप्पा पदोन्नती देण्यात येते. मात्र राज्य शासन अशा पदकप्राप्त पोलीस अधिकारी, अंमलदार यांना कसल्याही प्रकारची सवलत देण्यात येत नाही असे समजते. तरी महाराष्ट्र शासन अशा पदकप्राप्त पोलीस अधिकारी, अंमलदार यांना आगावू वेतनवाढ तसेच राज्य परिवहन विभागाच्या गाडयातून मोफत प्रवास करण्याची परवानगी किंवा शिक्षकांना देण्यात येणाऱ्या अनुदानाप्रमाणे सवलत देण्यात यावी अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे मागणी करीत आहे."

------

नंतर 2सी.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, राज्यात खुल्या बाजारातील दुधाच्या दर्जावर नियंत्रण ठेवणारी कोणतीही यंत्रणा नसणे, यासाठी एफडीएने पथके नेमण्याची आवश्यकता, तसेच ग्राहकांनाही दुधाची घनता मोजण्यासाठी घरी लॅक्टोमीटर वापरून भेसळीच्या दुधावर तसेच दुधाच्या किंमतीवर नियंत्रण ठेवता यावे, आपल्या घरातील दूध बनावट आहे अशी शंका ग्राहकास आल्यास ते त्वरित तपासून याची तक्रार कुठे करावयाची याची माहिती ग्राहकाला असणे गरजेचे आहे. याबाबत जनजागृती करून ठोस कार्यक्षम यंत्रणा असावी तसेच केंद्र व राज्य सरकारने स्वच्छता अभियान सुरू केले आहे. त्याच धर्तीवर ग्राहक पंचायत दिनाचे औचित्य साधून दुधाच्या किंमतीवर व भेसळीवर नियंत्रण ठेवण्यासाठी वितरण व्यवस्थेत बदल करण्यात यावा अशी मागणी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनास करीत आहे.

--------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु. शी.** : मराठी भाषेचे विद्यापीठ, अंबेजोगाई,जि.बीड येथे करण्याबाबत श्री.विक्रम काळे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"महाराष्ट्रातील सर्व मराठी जनतेची बोलीभाषा ही मराठी आहे. मराठी भाषेचा मराठी माणसाला सार्थ अभिमान आहे. मराठी भाषेच्या विकासासाठी व उन्नतीसाठी शासनाने ठोस पावले उचलावित ही राज्यातील मराठी जनतेची अपेक्षा आहे. महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. महाराष्ट्रातील थोर संतांनी मराठी व संस्कृत भाषेमध्ये चिरकाल टिकणाऱ्या साहित्याची निर्मिती वाचकांसाठी करून ठेवलेली आहे. कुसुमाग्रज, वि.स.खांडेकर, प्र.के.अत्रे, केशवसुत, बहिणाबाई चौधरी, माडगुळकर, पु.ल.देशपांडे इत्यादी ज्येष्ठ साहित्यिकांचे योगदान मराठी भाषेला व जनतेला लाभलेले आहे. मराठी भाषा संवर्धनासाठी सर्व प्रशासकीय कामकाज व न्यायालयीन कामकाज हे मराठीतूनच चालावे अशी जनतेची अपेक्षा आहे. नुकताच महाराष्ट्र शासनाने मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्यासाठी प्रयत्न केला आहे व त्यासाठी मराठी भाषेच्या स्वतंत्र मंत्रालयाचीही निर्मिती केली आहे. तेव्हा आद्य कवी मुकुंदराज ज्यांनी मराठी भाषेतील पहिला ग्रंथ बीड जिल्ह्यातील अंबेजोगाई येथे लिहिलेला आहे. त्यामुळे मराठी भाषा विद्यापीठाची निर्मिती शासनाने करावी व ते मराठी भाषेचे विद्यापीठ, अंबेजोगाई, जि.बीड येथे करण्यात यावे अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे मांडीत आहे."

सभापती महोदय, सभागृहाचे नेते आता उपस्थित आहेत. मराठी भाषेसाठी त्यांचा नेहमी आग्रह असतो. मराठी विद्यापीठ आपल्या काळात व्हावे अशी आमची इच्छा आहे. तेव्हा यासंबंधी शासन कोणती कार्यवाही करणार आहे ते सभागृहाला अवगत करण्यात यावे.

-------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

<u>भटक्या विमुक्तांना क्रीमिलेअर संज्ञेमधून वगळण्याबाबत औचित्याचा मुद्दा</u>

श्री.हरिसिंग राठोड : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा मांडण्यापूर्वी माझी आपणाला एक विनंती आहे. आम्ही आपल्याला रोज औचित्याचे मुद्दे देत असतो. कधी ते स्वीकारण्यात येतात तर कधी ते नाकारण्यात येतात. त्यामुळे आमचे औचित्याचे मुद्दे स्वीकारले आहेत किंवा नाहीत हे कळायला मार्ग नसतो.

**तालिका सभापती :** आपला औचित्याचा मुद्दा पुकारण्यात आला नाही तर याचा अर्थ तो नाकारण्यात आला आहे असा होतो. जेव्हा आपले नाव पुकारण्यात येते तेव्हा तो मांडण्यास आपणाला संधी मिळते. आता आपण आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.हरिसिंग राठोड : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, भटक्या विमुक्तांना क्रीमिलेअर संज्ञेमधून वगळण्याबाबत राज्य मागास आयोग, पुणे यांनी राज्य शासनाला अहवाल सादर केला आहे. सदर अहवाल शासनाला दिनांक 28.10.2014 रोजी प्राप्त होऊन सुद्धा शासनाने याबाबत काहीच निर्णय घेतलेला नाही. यामुळे भटक्या विमुक्तांमध्ये प्रचंड असंतोषाची भावना निर्माण झाली आहे. तरी सदर प्रश्न त्वरित निकाली काढण्याबाबत मी औचित्याच्या मुद्याद्वारे सभागृहाचे लक्ष वेधीत आहे.

.....

4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(दोन्ही बाजूकडील काही माननीय सदस्य विशेष उल्लेख व औचित्याचे मुद्दे घ्यावेत अशी मागणी करतात.)

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, एका सन्माननीय सदस्यांना संधी दिल्यानंतर सर्वच सन्माननीय सदस्यांना संधी द्यावी लागेल.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, जे सन्माननीय सदस्य आता उपस्थित नाहीत त्यांचे विशेष उल्लेख मांडायला आम्हाला परवानगी द्यावी.

श्री.एकनाथराव खडसे (बसून) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती स्मिता वाघ यांना विशेष उल्लेख सूचना मांडण्यास अनुमती द्यावी.

**तालिका सभापती** : एका सन्माननीय सदस्यांना संधी द्यावी व दुसऱ्या सन्मानीय सदस्यांना संधी देऊ नका असे आपण विवादित बोलू नये. त्यामुळे मी आता कोणालाही संधी देत नाही.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांना कोणत्याही गोष्टीला विरोध करण्याची सवयच लागलेली आहे.

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्या श्रीमती स्मिता वाघ यांना सोमवारी विशेष उल्लेखाची सूचना मांडण्यास अनुमती देतो.

...5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत धोरण म्हणून विकेंद्रित पाणीसाठे निर्माण करण्यासाठी व सिंचन क्षेत्रात आमूलाग्र बदल करण्यासाठी घेतलेले महत्त्वाचे निर्णय.

**मु.शी.:** जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत धोरण म्हणून विकेंद्रित पाणीसाठे निर्माण करण्यासाठी व सिंचन क्षेत्रात आमूलाग्र बदल करण्यासाठी घेतलेले महत्त्वाचे निर्णय यासंबंधी माननीय ग्रामविकास मंत्र्यांचे निवेदन.

श्रीमती पंकजा मुंडे (ग्रामविकास मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करते :-

महाराष्ट्र कायमचा टंचाईमुक्त व्हावा व कायमस्वरूपी दुष्काळावर योजना व्हाव्यात यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांच्या आदेशानुसार ही योजना करण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.तथापि अंडर लाईन छापू नये.)

यानंतर श्री.जुन्नरे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभापती (श्री. रामनाथ मोते ) :** आता अशासकीय कामकाज घेण्यात येईल.

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक-6, शीख समाजाच्या संदर्भात असून हे शासकीय विधेयक प्रथम चर्चेला घेण्यात यावे अशी माझी विनंती आहे.

श्री. धनंजय मुंडे : शुक्रवारी 4.00 वाजेनंतरचा वेळ अशासकीय कामकाजासाठी असतो. मागच्या शुक्रवारी देखील अशासकीय कामकाज झाले नव्हते आणि आज सुध्दा अशासकीय कामकाज होणार नसेल तर कामकाज सल्लागार समितीमध्ये कामकाजाच्या संदर्भात निर्णय घेतला जातो, त्याला अर्थ तरी काय राहतो ?

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, अशासकीय कामकाजाच्या अगोदर शासकीय बिल घेण्यात यावे. शीख समाजाच्या संदर्भात छोटेसे बिल आहे, ते घेण्यात यावे. बिलावर सर्वांनी कितीही बोलले तरी चालेल. बिलावर बोलण्याबाबत आमचे दुमत नाही.

श्री.धनंजय मुंडे : सभागृहाचे कामकाज किती वाजता स्थगित करावयाचे याबाबत सुध्दा निर्णय झालेला आहे.

सभापती महोदय, शीख समाजाच्या संदर्भातील बिलावर आम्ही सुधारणा सुचवलेल्या असून हे बिल संयुक्त समितीकडे विचारार्थ पाठविण्यात यावे, असा मी प्रस्ताव दिलेला आहे.

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय,धार्मिक बिलावर सुधारणा कशाला सुचवायच्या. या धार्मिक बिलाला आपला विरोध आहे काय ?

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, आमचा शीख समाजाच्या बिलाला विरोध नाही. महाराष्ट्रात 200 वर्षापासून जे शीख येथे राहतात त्यांचा या बिलामध्ये आपल्याला विचार करावयाचा नाही काय ? महाराष्ट्रात गेल्या 200 वर्षापासून जो शीख समाज राहतो आहे, त्यांना सुध्दा न्याय दिला पाहिजे अशी आमची भूमिका आहे.

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय,शासकीय कामकाजानंतर अशासकीय कामकाज घेण्याबाबत हरकत नाही.

**तालिका सभापती :** आज अशासकीय कामकाज घ्यावे व शासकीय विधेयके सोमवारी घेण्यात येतील, असा निर्णय माननीय सभापती महोदयांनी घेतलेला आहे. आता अशासकीय कामकाज घेण्यात येईल. ..2..

------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

## अशासकीय कामकाज-विधेयके

**पृ.शी.:**दुकाने व आस्थापना (सुधारणा) विधेयक

**L. C. BILL NO.I OF 2015**

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA SHOPS AND ESTABLISHMENTS ACT, 1948.)

(सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त अनुपस्थित)

-------

**पृ.शी.:** प्रकल्पबाधित व्यक्तिंचे पुनर्वसन(सुधारणा) विधेयक

**L. C. BILL NO.II OF 2015**

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA PROJECT AFFECTED PERSONS REHABILITATION ACT, 1999.)

(सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त अनुपस्थित)

------

.....3.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** दारूबंदी (सुधारणा) विधेयक

**L. C. BILL NO.III OF 2015**

(A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY PROHIBITION ACT, 1949.)

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, सन 2015 चे वि.प.वि.क्रमांक 3-मुंबई दारूबंदी अधिनियम, 1949 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागते.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती :** अनुमती देण्यात आली आहे.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.प.वि.क्रमांक 3 मांडते.

**तालिका सभापती :** विधेयक मांडण्यात आले आहे.

----------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** भ्रष्टाचार प्रतिबंध(महाराष्ट्र सुधारणा) विधेयक

**L. C. BILL NO.XX OF 2014**

(A BILL FURTHER TO AMEND THE PREVENTION OF CORRUPTION ACT, 1988, IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.)

(सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित अनुपस्थित)

---------------

....5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** गुंठेवारी विकास(नियमाधीन) करणे,श्रेणीवाढ व नियंत्रण)(सुधारणा) विधेयक

**L. C. BILL NO. III OF 2014**

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA GUNTHEWARI DEVELOPMENTS (REGULARISATION, UPGRADATION AND CONTROL) ACT, 2001.)

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2014 चे वि.प.वि.क्रमांक 3 महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम,2001 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडते.

सभापती महोदय, गुंठेवारीच्या बिलामध्ये काही अटी घालण्यात आल्या असून त्यामध्ये एक यादी देण्यात आली होती. 1 जानेवारी, 2001 नंतर करण्यात आलेले भूखंडाच्या संदर्भात पुढे स्पष्टपणे असे म्हटले आहे की, "पुढील भूखंडाच्या व इमारतीच्या प्रवर्गाच्या बाबतीत देखील गुंठेवारी विकास नियमाधीन करण्याकरिता पात्र असणार नाही" असे स्पष्ट म्हटले आहे. येथे नागरी सोयींची तरतूद करणे किंवा विस्तार करणे .....

सभापती महोदय, माझ्या बिलाच्या चर्चेला कोणते मंत्री महोदय उत्तर देणार आहेत ?

श्री.विक्रम काळे: सभापती महोदय, बिलाच्या संदर्भात संबंधित खात्याचे मंत्री सभागृहात उपस्थित नाहीत.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, आता अशासकीय कामकाज होणार आहे याची मंत्री महोदयांना माहिती असताना,या विधेयकाच्या संदर्भात सन्माननीय मंत्री महोदयांना अगोदरच सूचना गेलेली असताना व या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी अशासकीय ठराव मांडल्यानंतर सभागृहात सन्माननीय मंत्री उपस्थित नसणे हा सन्माननीय सदस्यांचा अवमान नाही काय ?

श्रीमती पंकजा मुंडे : सभापती महोदय, विधानसभेत नगरविकास विभागाचे विधेयक सुरु आहे. संबंधित माननीय मंत्री येथे थोडयाच वेळात उपस्थित होणार असून तोपर्यंत आम्ही सन्माननीय सदस्यांचे मुद्दे लिहून घेत आहोत. बिलावर चर्चा करीत असताना सन्माननीय सदस्यांना रोखता येत नाही.

...6...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभापती :** सन्माननीय सदस्यांचे मुद्दे दुसरे मंत्री महोदय लिहून घेत आहेत. या विधेयकाला माननीय महसूलमंत्री उत्तर देणार असून ते थोडयाच वेळात सभागृहात उपस्थित होतील. सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मांडण्यास सुरुवात करावी अशी मी विनंती करतो.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, या बिलामध्ये संदर्भात स्पष्टपणे तरतूद केली आले आहे की, भूखंडाच्या व इमारतीच्या प्रवर्गाच्या बाबतीत देखील गुंठेवारी विकास नियमाधीन करण्याकरिता पात्र असणार नाहीत. नागरी सेवेची तरतूद करणे किंवा विस्तार करणे तांत्रिकदृष्टया शक्य नसेल किंवा आर्थिकदृष्टया व्यवहार्य नसेल तर अशा जमिनीवर अस्तित्वात असलेले भूखंड. पायाभूत सोयीच्या तरतुदीमध्ये अडथळा असलेल्या किंवा उक्त भूखंड किंवा इमारतीचे काम चालू राहाणे शक्य व्हावे म्हणून अशा सुविधांच्या योजनेमध्ये बदल करणे शक्य नसलेले भूखंड किंवा इमारती त्याच बरोबर गुंठेवारी विकास नियमाधीन करण्याच्या किंवा श्रेणीवाढ करण्याच्या प्रक्रियेमध्ये किंवा प्रयोजनासाठी केलेल्या कोणत्याही विकासामुळे किंवा दुरुस्तीमुळे विस्थापित किंवा बाधित झालेल्या भूखंड धारकाला पर्यायी भूखंड देण्याची किंवा अन्य प्रकारे नुकसानभरपाई देण्याची जबाबदारी नियोजन प्राधिकरणाची असणार नाही. कोणत्याही गुंठेवारी विकास नियमाधीन करण्यामुळे जमिनीच्या किंवा इमारतीच्या संदर्भात अशा प्रकारे नियमाधीन करण्यापूर्वी धारकाडून असा माहिती हक्क किंवा दावा प्रदान केला जाणार नाही.

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. प्रकाश बिनसाळे )**

गुंठेवारी विकास नियमाधीन करणे, राज्य शासनाने वेळोवेळी निर्धारित केलेली प्रशमन फी व विकास आकार यांचा पुनर्रभरणा करण्याच्या देखील अधीन असणे, असे असून सुध्दा ब्रम्हपुरीमध्ये नगरपालिकेला 2001 च्या अधिनियमानुसार अधिकार मिळाला.

यानंतर श्री. अजित....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस....

सभापती महोदय, एखाद्या शनिवारी विशेष बैठक ठेवून त्यादिवशी फक्त अशासकीय कामकाज घेतले तर अशासकीय कामकाजाला न्याय मिळू शकतो. तेव्हा आपण शनिवारी किंवा सोमवारी फक्त अशासकीय कामकाज घ्यावे अशी विनंती आहे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी सुचविलेल्या सूचनेवर योग्यवेळी निर्णय घेण्यात येईल. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस ह्या ऑन लेग आहेत.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक सोमवार, दिनांक 23 मार्च, 2015 रोजी दुपारी 1.00 वाजता पुनः भरेल.

( सभागृहाची बैठक दुपारी 4 वाजून 30 मिनिटांनी, सोमवार, दिनांक 23 मार्च, 2015 रोजीच्या दुपारी 1.00 वाजेपर्यत स्थगित झाली )

---------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION